# श्री साईलीला

7

★ पुण्यतिथी विशेषांक



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

"मी जरी निजधामास गेलों, देहानें तुमच्यांत वावरत नसलों, तरी एक गोष्ट निश्चित समजा, व माझ्या शब्दावर पूर्ण विश्वास ठेवा कीं समाधिमधून माझीं हाडें कोणत्याही प्रसंगीं तुम्हांला निर्भयतेचें आश्वासन देत राहातील. मीच काय परंतु माझी समाधि तुमच्याशीं सुखदु:खाच्या गोष्टी बोलत राहील. मात्र तुम्हीं माझ्याठायीं पूर्ण श्रद्धा ठेवा. शरणांगतीचा मार्ग स्वीकारा; मग मी नेहमीं तुमच्या सांगाती आहें असें समजून चाला. मी दृष्टिआड होईन आणि मग आमचें कसें होईल ही चिंता करूं नका. जो अनन्यभावें मला शरण येतो व माझें चिंतन अहोरात्र करतो त्याचें माझ्यावर ऋण झालेलें असतें. अशा माझ्या भक्ताचा उद्धार करून तें ऋण मी फेडीत असतों."

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ] आक्टोबर १९६० [ अंक ७ वा

"पुण्यतिथ्योत्सव विशेषांक"

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

## या अंकांत —


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रिय वाचक — | ... | ३ |
| कर्तव्यनिष्ठेचा भव्य आदर्श भरत | ... | ५ |
| जीवन मम विकसित कर | ... | ८ |
| 'एकला चलो रे' | ... | ११ |
| ज्ञानेश्वरांच्या कार्याची महति | ... | १२ |
| बाबांचें पुण्यस्मरण | ... | १५ |
| श्रीसाईबाबा आणि त्यांची शिकवण | ... | १७ |
| माणुसकीचीं मोत्यें ! | ... | २६ |
| जेथें भाव अपरंपार | ... | ३१ |
| समर्थांचें सामर्थ्य | ... | ३४ |
| ज्ञानेश्वर माऊलीचें पसायदान | ... | ३६ |
| माता मदालसेचा पुत्रांस सदुपदेश | ... | ३८ |
| कै. तात्याबा कोते यांचे अनुभव | ... | ४३ |
| नीलवर्ण घनश्याम | ... | ४८ |
| श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद | ... | ५३ |
| अष्टांग योगवर्णनाची 'झलक' | ... | ५८ |
| 'तेथें कर माझे जुळती' | ... | ६२ |
| संत तिरुवल्लुवार | ... | ६४ |
| नानासाहेबांचा भ्रमनिरास | ... | ६५ |
| बाबांची लीला | ... | ६९ |
| कार्यकुशलता हाच योग | ... | ७४ |
| रमण महर्षींचा प्रसाद | ... | ७६ |
| जाऊं जाऊंया शिरडी उत्सवा | ... | ७८ |
| शिरडी – वृत्त | ... | ७९ |
| श्रीसाईनाथ वाचनालय, शिरडी | ... | ८० |

# प्रिय वाचक—

श्रीसाईबाबा समाधिस्त होऊन ४०।४२ वर्षांचा काळ मागें पडला. विजयादशमी हा त्यांच्या निर्याणाचा दिवस. त्यानिमित्त सतत ३।४ दिवस, ज्या पुण्यभूमींत त्यांनीं वास्तव्य केलें व जी भूमि आपल्या लीलांनीं पुण्यपावन केली, त्या शिरडींत त्यांचा पुण्यतिथ्योत्सव वर्षानुवर्ष मोठ्या थाटानें साजरा केला जातो. बाबांचें स्मरण आपणास पुण्यतिथीच्या निमित्तानेंच होत असतें असें नाहीं. साईभक्तांना त्यांची आठवण हरघडी होत असते व ती लाभदायक असते असाच प्रत्येकाचा अनुभव आहे.

श्री साईबाबा हें आजच्या काळांतील जागतें व तारतें दैवत होऊन राहिलें आहे. त्यांच्या हयातींत भक्तांना जे अनुभव आले, तसेच त्यांच्या मागेंही येत आहेत. बाबांचा अवतार लोककल्याणासाठीं व जनतेच्या उद्धारासाठीं होता. तेंच त्यांचें अवतार कार्य आजही अव्याहत चालू आहे. त्यांनीं आपल्या भक्तांना आश्वासन देऊन ठेविलें आहे. कीं, 'जो मजलागीं अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मद्भजन । माझें चिंतन माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥'

आणि त्यांनीं देऊन ठेवलेलें हें आश्वासन लटकें नाहीं. त्याची प्रचीति त्यांच्या भक्ताला प्रसंगानुरूप येतच असते. अशा थोर विभूतीचें आपण आज पुण्यस्मरण करीत आहोंत. त्यांच्या पुण्यस्मृतीस आमचे शतशः प्रणाम.

× × ×

गेल्या पुण्यतिथीपासून तों या पुण्यतिथीच्या वर्षभरांत, श्रीसाईबाबांच्या सेवेला वाहिलेल्या 'श्रीसाईलीला' मासिकानें जी अल्पस्वल्प सेवा त्यांच्या चरणीं अर्पण केली, तिचा थोडासा आढावा याप्रसंगीं घेतल्यास तो अनाठायीं होणार नाहीं, अशी आशा आहे. या मासिकांत बाबांच्या लीलांना महत्वाचें स्थान देण्यांत आलेलें असतें. ठिकठिकाणचे भक्त आपापले अनुभव पाठवितात. त्यांचें संकलन करून ते यथावकाश प्रकाशिले जातात. मासिकाच्या व शिरडी संस्थानच्या दृष्टीनें वर्षांतील तीन घटना विशेष महत्वाच्या असतात. रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथी या तीन महत् प्रसंगीं श्रीसाई लीलेचे विशेषांक प्रसिद्ध होतात. गेल्या वर्षांत प्रसिद्ध झालेले हे तिन्ही विशेषांक आपआपल्या परीनें वैशिष्ट्यपूर्ण व प्रसंगानुकूल होते. आमच्या वाचकांकडून त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत झालें. ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. श्रीसाईबाबा व त्यांची शिकवण यासंबंधीं प्रत्येक अंकांतून जसा एखादा दुसरा लेख असतो, त्याचप्रमाणें इतर संत महात्म्यांच्या जीवनांतील महत्वाचे व मार्गदर्शक प्रसंग व त्यांची शिकवण यांचाही सढळपणें परिचय करून देण्यांत आला. आमचे एक मित्र प्राध्यापक वि. गो. शेट्ये यानीं श्रीअरविंदांच्या तत्वज्ञानावर 'संत वाणीचे अमोल बोल' या मथळ्याखालीं ३।४ लेख लिहिले. 'श्री ज्ञानेश्वरीसंबंधीं कांहीं प्रासंगिक विचार' या

मथळ्याखालीं, ज्ञानेश्वरीचा अत्यंत बारकाईनें अभ्यास केलेलें आमचे मित्र श्री. वि. पां. सातपुते यांनीं ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांस मार्गदर्शक होऊन रहाणारे ६–७ लेख लिहिले. व अजूनही लिहीत आहेत. गेल्या तीन अंकांपासून श्री. केशवराव प्रधान बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं भगवान श्रीकृष्णाच्या जीवन कार्यावर आधारलेली व अध्यात्माचा सुंदर रीतीनें उहापोह करणारी "नीलवर्ण घनःश्याम" ही लेखमाला सुरू झालेली आहे. अधिकारी व व्यासंगी लेखकानें लिहिलेल्या या लेखमालेकडे वाचकांनीं जरूर लक्ष पुरवावें अशी विनंती आहे.

× × ×

ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यांच्या ओवीबद्ध अर्वाचीन श्री भक्त लीलामृताच्या आधारें श्री माणिक प्रभू, श्री अक्कलकोटचे स्वामीमहाराज व श्री. नरसिंह सरस्वती या तीन थोर संतांचा गेल्या वर्षभरांत परिचय करून देण्यांत आला. श्री. दासगणू महाराज यांना श्रीसाईबाबांचे सान्निध्य सुदैवानें लाभलें होते; त्याचप्रमाणें त्यांना त्यांच्या कृपाप्रसादाचाही लाभ घडलेला होता. त्यांनीं चार अध्यायांत बाबांच्या लीलांचा व त्यांच्या शिकवणीचा फार सुंदर परिचय करून दिलेला आहे. त्यांचा निरूपणपूर्वक गद्यानुवाद सुरू केल्यास आमचे साईभक्त-वाचक तो उपक्रम गोड मानून घेतील या आशेनें, त्या दृष्टीनें या अंकापासून पाऊल टाकण्यांत येत आहे. श्री साईसच्चरिताचा आमच्या साईभक्त मित्रानीं गेल्या पुण्यतिथी अंकापासून सुरू केलेला गद्यानुवादहि अखंड चालू आहेच.

या वर्षभरांतील बाराही अंक एकत्र जमवून ते वरवर चाळून पाहूं लागल्यास प्रत्येक अंक मागील अंकापेक्षां सरस, वाचनीय व मार्गदर्शक असल्याचें आढळून येईल. आमच्या वाचकांची अल्पस्वल्प सेवा हातून घडावी या पवित्र भावनेनें हें कार्य आमच्या अल्प मतीप्रमाणें आम्हीं करीत आहोंत, असें म्हणण्यापेक्षां बाबाच हें सेवाकार्य आमच्याकडून करवून घेत आहेत, असें म्हणणें योग्य होईल. या कार्यांत लेखन सहाय्याच्या व अन्य प्रकारें ज्यांनीं ज्यांनीं सहकार्य केलें त्या सर्वांचे आम्हीं आभारी आहोंत. सर्वांना प्रेरणा देणारे बाबा आहेत. ही यथामति केलेली अल्पस्वल्प सेवा आमच्या वाचकांस आवडूं लागली आहे असें वर्गणीदारांच्या वाढत्या संख्येवरून म्हणतां येईल. श्री साईलीलेवर असाच वाढता लोभ सर्वांनीं ठेवावा एवढीच आमची विनंती आहे.

—संपादक

---


## श्री साईलीला त्रैमासिकाचे अंक

सन १९४८ ते १९५८ पर्यंतचे श्री साईलीला त्रैमासिकांचे कांहीं अंक निम्या किंमतीस मिळतील. अंक मिळण्याचा पत्ताः — श्री साईनाथ वाचनालय,
शिरडी, ता—कोपरगांव, जि. अहंमदनगर

# कर्तव्यनिष्ठेचा भव्य आदर्श भरत

—एक रामायणाचा विद्यार्थी

वाल्मिकी रामायणाचें अत्यंत बारकाईनें पारायण करणाऱ्याच्या मनावर ज्या पुरुषश्रेष्ठाचा कायमचा ठसा उमटतो ती व्यक्ति म्हणजे भरत होय. निःसंशय निर्लेप व सर्वांग सुंदर असें चारित्र्य त्या महापुरुषानें प्रगट केलें आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वास कुठेंही तोड सांपडणार नाहीं. तेथें कलंकास किंवा नांव ठेवण्यास थोडी-सुद्धां जागा नाहीं.

## भरताची क्षमाशीलता

भरताच्या जीवनाचा जों जों विचार करावा, तों तों मति गुंग होऊन जाते. तेथें धर्मनिष्ठा व खडतर कर्तव्यनिष्ठा या दोन्हीं सद्गुणांनीं परमोच्च शिखर गांठलें आहे. त्या कर्तव्यनिष्ठेची कोणत्याहि वाङ्मयांतील पुरुषश्रेष्ठाशीं तुलना करतां येणार नाहीं. त्याचें राजवाड्यांत आगमन होतांच राणी कैकयीकडून त्याचें स्वागत होतें. ती त्याला आपल्या दृष्टीनें मोठ्या हितगुजाच्या व त्याच्या वैभवाच्या गोष्टी सांगते. त्याला त्याचें मुळींच कांहीं वाटत नाहीं. ज्या गोष्टीनें ती आनंदित झालेली असते त्या गोष्टीमुळें तो पराकाष्ठेचा दुःखीकष्टी झालेला असतो. पित्याचा स्वर्गवास, पूज्य बंधूंचा वनवास, वगैरे प्रसंग ऐकून त्याच्या प्रेमळ व कोमल अंतःकरणावर आघातावर आघात होतात. आणि हें सर्व आपल्या-मुळें घडून आलें याची जाणीव होतांच तो दुःखानें अत्यंत व्याकूळ होतो. त्याला तें दुःख असह्य होतें. त्याला पश्चात्ताप होतो. त्याक्षणीं हें सर्व आपल्या आईनें घडवून आणलें हें समजून तिला तो बोलूं नये ते कठोर शब्द बोलून जातो; परंतु दुसऱ्याच क्षणीं त्याही गोष्टीबद्दल त्याच्या मनाला उद्वेग वाटून तो आईच्या अपराधाची तिला उदार अंतःकरणानें क्षमा करतो. आपल्या आईचे कान फुंकणारी मंथरा हें त्याला समजून येतें; परंतु भरत तिलाही कृतापराधाची क्षमा करतो. दुसऱ्या तिसऱ्यानें रागाच्या भरांत काय वाटेल तें केलें असतें. परंतु भरताच्या ठायीं क्षमाशीलता हाही दुर्मिळ गुण प्रकर्षानें वास करीत होता.

## प्रखर कर्तव्यनिष्ठा

गुरुदेव वसिष्ठ, माता कौसल्या व सारे मंत्री, नागरिक भरताला सिंहासनावर बसवि-ण्याची पूर्वतयारी करूं लागतात; त्याला सिंहासनावर बसण्याची आग्रहपूर्वक प्रार्थना करतात. गुरूजनांची प्रार्थना ! तिचा अवमान कोण करील? अशी वैभवश्रीची चालून आलेली संधि

कोण बरें गमावून बसेल ? परंतु भरत संधिसाधु नव्हता; लोभी नव्हता. त्याची धर्मनिष्ठा व कर्तव्यनिष्ठा जाज्वल्य होती. तिच्यापुढें त्याला कशाचीहि पर्वा वाटत नव्हती. त्याला राजवैभव सुखोपभोग नको होते. जीवनांत कर्तव्यपालन हेंच सर्वश्रेष्ठ आहे. मनुष्य जगांत अमर होतो तो वैभव भोगून नव्हे, तर कर्तव्यपालन करून, हा जीवनांतील महामंत्र त्याला माहीत होता.

त्यानें मातेचें, गुरुजनांचें व नागरिकांचें म्हणणें अत्यंत शांतपणें ऐकून घेतलें. त्यानें भरपूर आभार मानले त्यांचे. श्रीरामचंद्रानें वनवासाला जावें आणि मी त्याच्या राजसिंहासनावर बसून राज्यसुख भोगावें, या कल्पनेनें बेहोष दुःखी होऊन तो ढळढळां रडूं लागला. त्यांचें त्या विचारानें अंतःकरण शतशः विदीर्ण झालें ! आणि दुःखानें व्याकुळ व हताश झालेल्या बिकट परिस्थितींतूनही त्यानें स्वतः चोखाळण्याचा व हिऱ्यामोत्यांची पखरण घातलेला असा उज्वल मार्ग शोधून काढिला.

बिकट परिस्थिति प्राप्त झाली असतां, हें स्वीकारूं का तें, अशी संभ्रमाची व गुंतागुंतीची स्थिति प्राप्त झाली असतां तुमचा मार्ग तुम्हींच शोधून काढावयाचा असतो. तुमचें अंतःकरण शुद्ध असलें व पूर्वपुण्याईचें पाठबळ तुमच्यामागें असलें म्हणजे तुम्हांला आपोआप योग्य मार्ग दिसूं लागतो. भरताची पुण्याई फार दांडगी होती.

भरतानें राज्यत्याग करून अरण्यवास पत्करण्याचें ठरविलें व तत्पूर्वी श्रीरामचंद्राचें दर्शन घेण्याचें ठरविलें खरें; परंतु श्रीरामाच्या गैरहजेरींत राज्याचा कारभार उत्तम प्रकारें चालू राहिला पाहिजे, कोणतेंही कार्य स्थगित होतां कामा नये, कशालाही धोका पोहोंचतां कामा नये, याचीहि चिंता त्याला होती. त्याला सुव्यवस्था लावून पुढें जावयाचें होतें. मंत्र्यांच्या व गुरुजनांच्या सहाय्यानें तो सारा बंदोबस्त त्यानें प्रथम केला..

## दोघांचाही निर्धार

भरत रामचंद्राच्या भेटीसाठीं व त्याला विनवणी करून परत घेऊन येण्यासाठीं बाहेर पडला. त्याला राजवैभवांत तो प्रवास करतां आला असता; परंतु तसें न करतां एखाद्या तापसाप्रमाणें त्यानें चित्रकूटपर्यंतचा प्रवास केला. कोणाचेंहि स्वागत स्वीकारलें नाहीं किंवा कोणाचाहि थाटामाटाचा पाहुणचार स्वीकारला नाहीं.

भारद्वाज मुनींच्या आश्रमांत व इतरत्र त्याच्यासाठीं सर्व प्रकारच्या सुखसोयी सज्ज होत्या; परंतु कोणाचेंहि मन न दुखवितां सान्या थाटमाटाला त्यानें बगल दिली.

चित्रकूटला पोहोंचल्यानंतर श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन त्यानें त्याना परत फिरण्याबद्दल व प्रजेच्या कल्याणासाठीं राजसूत्रें हातीं घेण्याबद्दल परोपरीनें विनविलें. श्रीरामचंद्राची कर्तव्यनिष्ठाही तितकीच प्रखर होती. तोडीस तोड. येथें दोघांचाही निर्धार अवर्णनीय होता. कोणी कोणाला हार गेला नाहीं. श्रीरामानें भरताची समजूत घालण्याचा प्रयत्न किती तरी कसोशीनें व जीव तोडून केला. भरताच्या मनावर त्याचा कांहीं परिणाम घडून आला नाहीं.

या ठिकाणीं भरताच्या बंधुप्रेमाची व प्रखर कर्तव्यनिष्ठेची खरी कसोटी लागते. भरतावर कसोटीचे प्रसंग अतोनात येतात. प्रसंगांवर प्रसंग; परंतु सर्व प्रसंगीं तो उज्ज्वल व धवल यशानें बाहेर पडतो हें त्याचें जीवनवैशिष्ट्य आहे. मोहांत सांपडण्यासारखे, शब्दांत गुंतविण्यासारखे व संभ्रमांत पाडणारे प्रसंग त्याच्यावर किती वरें येतात ! परंतु त्याची सद्विवेकबुद्धि थोडीसुद्धां झोपी गेलेली नव्हती. सदा जागृत, सदा तत्पर व सदासर्वकाळ विवेकी.

## दोघेही निर्धोर

किती लहानपण स्वीकारून व किती गयावया करून श्रीरामचंद्राची परत अयोध्येस येण्याबद्दल त्यानें विनवणी केली व करुणा भाकिली ! किती निर्लेप व निर्व्याज प्रेम त्यानें प्रगट केलें ! परंतु श्रीरामचंद्र आपल्या वचनास चिकटून राहिले.

भरत त्यानंतर भलता आग्रह करण्याच्या भानगडींत पडला नाहीं. श्रीरामचंद्राचा कल त्यानें जाणला. जसा आपला निर्धार तसा त्याचा निर्धार. जसे आपण कर्तव्यकठोर तसेच तेही कर्तव्यकठोर ! येथें कोणी कोणाला दोष द्यावयाचा ! दोघेहि समजले—उमजले. दोघांनींहि आपापल्या मार्गानें जाण्याचा निर्धार कायम केला.

भरतानें श्रीरामचंद्राच्या पादुका मागून घेतल्या. त्यांना राजसिंहासनावर बसविलें व स्वतः तापसी वृत्तीनें व्रतनियमांचें पालन करीत चौदा वर्षांचा काळ कंठिला !

किती उदात्तता ओतप्रोत भरली आहे या प्रसंगांत ! नाहींतर राज्य लोभानें प्रेरित होऊन आपसांत तंटेभांडणें, झगडे खून व नाना प्रकार घडवून आणण्याची कमालमर्यादा गांठणारे आजकालचे अमानुषी व लोभी प्राणी !

---


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop*. S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# 'जीवन मम विकसित कर'

## त्यागांत जीवनाची सफलता

जो सुखोपभोगांत, ऐषआरामांत व विषयसुखांत नेहमीं सुख मानून त्यासाठीं सदासर्वकाळ धडपडत असतो, अशा माणसाचा सहवास नेहमीं टाळावा. सहवास नेहमीं असावा तो सत्प्रवृत्तीच्या निवडक माणसांशीं. तोच कल्याणप्रद असतो. विषय व सुखलोलुपता ही आसुरी प्रवृत्ति आहे. ती मारक व शेवटीं खड्डयांत लोटणारी आहे. संतांनीं सत्संगाची महति गायिली आहे ती उगाच नाहीं. कामोपभोग हेंच ज्यांचें लक्ष्य असतें त्याच्यापासून भगवंतांचीं पावलें फार दूर असतात. आपणांस तर त्या पावलांजवळ जायचें असतें.

### चार पुरुषार्थ

मनुष्यानें चार प्रकारचे पुरुषार्थ साध्य करण्यासाठीं तत्परतेनें झटावें असें सांगितलें आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष. येथें धर्माला प्रमुख स्थान देण्यांत आलें आहे. अर्थ काय किंवा काम काय या दोन्हीं पुरुषार्थांची प्राप्ति करावयाची ती धर्माच्या सहकार्यानें. या शरिराचा निर्वाह झाला पाहिजे, त्याची वाढ झाली पाहिजे, त्यासाठीं अर्थ पाहिजे तसेंच कामही पाहिजे; परंतु त्यांची साधना अधर्मानें किंवा अनीतीनें होतां कामा नये. सरळ मार्गानें, सत्यानें व संयमपूर्वक त्यांची संपादना केल्यानें मोक्षाचा मार्ग मोकळा होत असतो. न्याय नीतीनें वागण्याचा प्रश्न येथें निर्माण होतो. परमेश्वर हातांत तराजू धरून तुमच्या नीतीची व न्यायाची पहाणी करीत आहे. त्याचें छत्र तुमच्या मस्तकावर आहे हें तुम्हीं विसरतां कामा नये.

### आमची वर्णव्यवस्था

शरिराचा निर्वाह करणें, कुटुंबपोषण करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. त्यासाठीं जरूर तीं साधनें प्रत्येकास विनासायास व धर्माचें उल्लंघन न करतां उपलब्ध व्हावी अशीच पूर्वकाळीं आपली समाजव्यवस्था होती. समाज सुसंघटित रहावा व सुव्यवस्थित रीतीनें चालावा यासाठीं तर चार वर्णांची वर्गवारी. आजकाल आपण काय बरें पहात आहोंत ? सारी वर्णव्यवस्था कोलमडून पडलेली आहे ! कोणी कोणाला विचारीत नाहीं. एक वर्ण दुसऱ्यावर व दुसरा तिसऱ्यावर आक्रमण करूं पहात आहे. परस्परांतील संघर्ष वाढत चाललेला आहे. पोट कसें भरावें, कुटुंबपोषण कसें करावें ही प्रत्येकाला भ्रांत पडलेली आहे.

हें कसें घडत गेलें तें क्षणभर विचार करून पहा. हा एक दृष्टांत आहे म्हणाना. चारी वर्णांतील लोकांना वंशपरंपरेनें कांहीं ना कांहीं रोजगार धंदे लावून देण्यांत आले होते. काळ असा आला कीं, त्या रोजगार धंद्यांची मातब्बरी पूर्वीप्रमाणें राहिली नाहीं.

ते रोजगार त्यामुळें सोडून जो तो इंग्रजी शिक्षणाच्या मार्गे लागला. कारण? इंग्रजी शिक्षणानें नोकरी मिळते व पोटाचा प्रश्न सुटतो. पहिल्या पहिल्यानें मिळाल्या नोकऱ्या. परंतु नोकऱ्या तरी किती लोकांना पुरविणार? वर्षानुवर्षे इंग्रजी शिक्षण घेतलेल्यांची संख्या अमर्याद वाढत चालली. नोकऱ्या संपल्या! आणि बेकार लोकांचा जमाव वाढत चालला. एका जागेसाठीं शेंकडों लोकांचे अर्ज. एक जागा भरायची आणि नव्याण्णव लोकांच्या पदरांत निराशा पडायची! असा हा प्रकार सतत वाढत चालला आहे. अलिकडे कुठें लोकांचें लक्ष कला, उद्योगधंदे, शास्त्र यांच्याकडे वळूं लागलें आहे. तसें तें वळल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं.

## कठीण मामला

परंपरेनें ज्यांचे रोजगारधंदे चालत आले आहेत असे सुतार, लोहार, सुवर्णकार, शिंपी, मोची, कुंभार, कासार वगैरे व्यवसांतील लोकांचीं मुलें त्या व्यवसायाकडे पाठ फिरवून नोकरीसाठीं इंग्रजी शिकायला जावीं यापेक्षां यापेक्षां दैवदुर्विलास किंवा दुर्भाग्य दुसरें कोणतें असणार?

आज पोटासाठीं जबरदस्त चढाओढीचा सामना खेळावा लागत आहे. परस्परांतील संघर्ष वाढत चालला आहे. व शांततेला खग्रास ग्रहण लागलें आहे. जिकडे जावें तिकडे अशांतता व असमाधान. अशा या जमान्यांत वावरत असतां आपणांला शांतता व समाधान मिळवावयाचें आहे! किती कठीण आहे हा मामला!

या पोटासाठीं आजकाल आपणास नाना प्रकारचीं पापें आचरावीं लागत आहेत. आणि तीं पापें असून आपणास तीं पापें भासेनातशीं झालीं आहेत.

आमच्या शास्त्रकारांनीं धर्माची फार सुंदर व्याख्या करून ठेविली आहे. ज्याच्या आचरणानें या जगांत आपण सुखासमाधानानें जगूं शकतों व ज्याच्यामुळें आपणास मोक्षाची (निःश्रेयस्) प्राप्ति होऊं शकते तो धर्म. पाश्चात्यांचें लक्ष केवळ ऐहिक अभ्युदयाकडेच असतें. आमचें तसें नाहीं. आमची दृष्टि ऐहिक व पारमार्थिक अशी दोन्हींकडे असतें. उदरंभरण, कुटुंबपोषण हें झालेंच पाहिजे. त्यासाठीं जरूर ती धडपड करावयाची, परंतु ती करीत असतां नाना पापें आचरावयाचीं नाहींत. सदाचाराचा व नीतीचा खून पाडावयाचा नाहीं. आमचें साध्य ऐहिक अभ्युदय एवढेंच नाहीं तर मोक्ष, परमार्थ हें आमचें मुख्य साध्य आहे.

## जीवन फुलवायचें आहे

जीवन हें केवळ खाणेंपिणें व मजा मारणें एवढ्याचसाठीं नाहीं; शरीर धारणेसाठीं त्याची जरूरी आहे हें खरें असलें तरी तेंच केवळ आपलें ध्येय नाही. तें करतां करतां आम्हांला जीवनविकास करावयाचा आहे. जीवन फुलवायचें आहे. तें विकसितें जीवन-पुष्प आपणास अखेर ईशचरणीं अर्पण करावयाचें आहे. तेंच तर आपलें अंतिम साध्य आहे. त्या साध्याचा विसर आम्हांला केव्हांही पडतां कामा नये. आमची ईश्वराला नेहमीं अशी प्रार्थना असली पाहिजे कीं, 'जीवन मम विकसित कर, हे परात्परा!'

आमचें जीवन स्वार्थी असतां कामा नये. तें त्यागमय असलें पाहिजे. जगायचें तें केवळ स्वतःसाठीं, स्वार्थासाठीं नाहीं तर परोपकारासाठीं. दुसऱ्यांच्या परोपरीनें उपयोगी पडणें, दुसऱ्याची सेवा करण्याची प्रत्येक संधि साधणें हा आमच्या लक्ष्यबिंदु असला पाहिजे.

कबीर एका ठिकाणीं म्हणतात—'साई इतना दीजिये जासे कुटुंब समाय। मैं भी भूखा ना रहूं, साधु न भूखा जाय।।' भगवंता! मला एवढें दे कीं ज्यामुळें मी व माझें कुटुंब यांचे रक्षण होईल व माझ्या घरीं जे कोणी साधुसंत येतील त्यांचीही मी योग्य ती संभावना करूं शकेन.

उलटपक्षीं पाश्चात्यांचा जीवनादर्श स्वार्थापुरता आहे. स्वतःला जास्तींत जास्त सुखोपभोग घेतां आले पाहिजेत. सुखोपभोगाला अंत तरी आहे का? अधिकाधिक सुखोपभोग आपली इच्छा वाढवीत जातात. त्यांची पूर्तता कधींच होत नाहीं. त्यामुळें मनुष्य शांति-सुखाला व समाधानाला आंचवतो—पारखा होतो.

## ययाती राजाचें उदाहरण

ययाति राजाचें उदाहरण या दृष्टीनें नमुनेदार आहे. त्या राजाला सुखोपभोगाची सर्व साधनें अनुकूल होतीं. त्यानें आपलें सारें जीवन भोगविलासांत घालविलें, तरीहि तृप्ति होऊं शकली नाहीं. आणखी भोग भोगण्यासाठीं त्यानें आपल्या पुत्राचेंहि आयुष्य मागून घेतलें. तरीहि तृप्ति नाहीं. शेवटीं त्यानें हात टेकले व त्यानें एका महान् तत्त्वाचा शोध लाविला. कोणतें तें तत्त्व? वाटेल तेवढीं साधनें जमवून भोग भोगा. त्यामुळें तुमची तृप्ति होणार नाहीं; तृप्तीचा व समाधानाचा एकच मार्ग आहे. त्यांचा त्याग करणें. त्यागांत तृप्ति, समाधान व आनंद सामावलेला आहे.

पशूंचें जीवन व मानवी जीवन यांत फरक कोणता? खानापीना व प्रजोत्पादन करना हेंच पशूंचें ध्येय असतें. त्यापुढें त्यांची नजर जात नाहीं. माणसें काय करतात? तेंच नाहीं का? मग पशूंत व माणसांत फरक कुठें राहिला? माणूस खराखुरा माणूस केव्हां होऊं शकतो? अशा वागण्यानें केव्हांही नाहीं! माणसाला मनुष्यत्व येतें त्यागानें, दुसऱ्यासाठीं झटण्यानें, दुसऱ्याचें दुःख निवारण करण्यानें. आमच्या साधुसंतांनीं मनुष्यत्वाचा हाच मार्ग सांगितला आहे. मनुष्याला देवपण येतें या करणीनें.

यासाठींच मनुष्य जन्माला आल्याचें सार्थक कशांत आहे हें ओळखून तें सार्थकीं लावण्यासाठीं आपण डोळ्यांत तेल घालून अहर्निश झटलें पाहिजे. जेणेंकरून आपला उत्तरोत्तर विकास होत जाईल, एकेक पाऊल पुढें पडत जाईल, असाच मार्ग आपण स्वीकारला पाहिजे.

# ‘ एकला चलो रे ’

आपलें जीवन ही एक यात्राच आहे. या यात्रेंत आपणास आरंभीं २।४ सोबती मिळतात. कांहीं काळ त्यांच्याशी आपला संबंध राहू शकतो. प्रत्येकाची प्रकृति वेगळी, आवडनिवड वेगळी असते. एक शांत तर दुसरा रागीट—नेहमी पटावें कसें ? कधीं ना कधीं कोणत्या तरी कारणानें फाटतें. तुमच्याचसारखी दुसरी व्यक्ति तुम्हांला सांपडणार नाहीं; आणि मग तुम्हाला एकट्यानेंच मार्ग कंठावा लागणार.

कोणाचें आयुष्य मध्येंच संपतें आणि तो कायमचा सोडून जातो. एकामागून दुसरा, दुसऱ्यामागून तिसरा अशी जाणाऱ्यांची रांग लागून राहिली आहे. कधीं कोणाचा क्रमांक लागेल हें सांगतां येणें कठीण असतें; आणि मग आपण विचारांत पडतों. अरेरे ! शेवटीं मी मागें एकटाच राहिलों ! एकटेपणाचें दुःख वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. आपण एकटे आलों तसेंच शेवटीं एकटे जावयाचें आहे. आपला कायमचा साथी, सहप्रवासी कोणीही नाहीं. आम्हांला स्वतःच्याच दोन पायांवर उभे रहावयाचें आहे व तेच दोन पाय शेवटपर्यंत आयुष्याचा प्रवास घडवून आणणार आहेत.

एकटेपणाचें दुःख वाटण्याचें कारण नाहीं. त्यामुळें घाबरून जाण्याचें, ही मुळींच कारण नाहीं. एकलेपणाचे कितीतरी फायदे आहेत. त्यामुळें तुम्हीं अंतर्मुख होऊं शकतां. कोणीही कोणावर अवलंबून राहूं नये. स्वावलंबन हेंच आपलें ध्येय असावें. कोणी हात देतो कीं नाहीं याची वाट कधीं पाहूं नये. कोणी हात दिला, कोणी सहकार केला तर ठीक; नाहीं तर त्याबद्दल दुःख, खेद न मानतां आनंद मानावा. दुसऱ्याच्या छायेखालीं वाढण्याचें भाग्य वाट्याला आलें नाहीं हें फार चांगलें. जे निराधार, एकटे, त्यांचा साथीदार परमेश्वर असतो. तो तुमच्या अंतःकरणांत जागा होऊन तुम्हांला जरूर ती प्रेरणा देतो. तुमच्या अंतरंगांतील देव जागा झाल्यावर तुम्हांला आणखी काय पाहिजे ? यासाठीं ‘ एकला चलो रे ! ’ हेंच आपलें ध्येयवाक्य असावें; कारण तेंच आयुष्यांतील महान सत्य आहे.



# ज्ञानेश्वरांच्या कार्याची महति

—एक ज्ञानराज भक्त

**ज्ञानेश्वरांच्या** काळास साडे सहाशें पेक्षां अधिक वर्षांचा काळ लोटला तरीही त्यांचें पुण्यस्मरण आपण अधिकाधिक आस्थेनें आजही करीत आहोंत. तें करण्याची आपणास जरुरी वाटते; कारण त्यानीं आमच्यावर तसेच महदुपकार करून ठेविले आहेत. त्यांच्यामुळें आपला इतिहास, माणसांचे स्वभाव, वळण, वागणूक वगैरे गोष्टींचें आपणास ज्ञान होतें. ज्ञानदेवांचें कार्य, त्याचें महत्व कोणाला अवगत नाहीं. ज्या महाराष्ट्रीयास तें अवगत नाहीं तो महाराष्ट्राबाहेरचा समजला पाहिजे. ज्ञानेश्वरांचें चरित्र तसें मोठें मुळींच नाहीं. अवघें वीस बावीस वर्षांचें. बरें त्यांत राजेरजवाडे, सरदार, मानकरी अगर मोठे राजकारणी पुरुष यांच्या चरित्रांतल्यासारख्या गोष्टी नाहींत. तें अगदीं साधेंसुधें आहे.

ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे व्रतस्थ राहून दिवस कंठीत असत. त्यांना विवाह करण्याविषयीं दृष्टांत झाला म्हणून त्यानीं विवाह केला. परंतु त्यांना संसाराचा कंटाळा आला म्हणून ते काशी मुक्कामीं सन्यास घेण्यासाठीं गेले. तेथें त्यांच्या गुरूनें सांप्रदायाला अनुसरून त्यांना प्रश्न विचारला कीं आई, बाप किंवा बायको ह्या तिघांपैकीं कोणाची तुमच्याठायीं इच्छा नाहीं ना? त्यावर त्यानीं उत्तर दिलें कीं, संन्यास धारण करण्याची सर्वांची परवानगी मला आहे. त्यानंतरच गुरूनें त्यांना सन्यास दिक्षा दिली.

## विसंगत आशीर्वाद

पुढें कर्मधर्मसंयोगानें एके दिवशीं ज्ञानेश्वरांची मातुश्री व त्यांच्या पित्यांचे गुरुजी यांची आळंदी येथें गांठ पडली. त्यांनीं तिला आशीर्वाद दिला. तेव्हां ती म्हणाली, " महाराज, आपला आशीर्वाद विसंगत आहे. कारण माझे पति संसाराला वैतागून संन्यासी बनले आहेत ! " नंतर त्या साध्वीचा पति तो आपला शिष्य असें गुरूजींना समजून आलें. तेव्हां विठ्ठलपंतांस बोलावून त्यांनीं सांगितलें कीं, तुमच्या घरीं पत्नी असंतुष्ट स्थितींत असतां संन्यासधर्म स्वीकारणें योग्य नाहीं. तेव्हां संन्यास सोडून आपण संसार करावा, त्यांत आपलें कल्याण आहे.

गुरुची आज्ञा शिरसावंद्य मानून विठ्ठलपंत संसारांत पडले व संसार चालवूं लागले; त्यामुळें लोकापवादाचें पीक पिकलें. त्यांना नंतर लागोपाठ तीन मुलें झालीं. लोकापवादाचें लफडे मागें लागलें होतें तें कांहीं केल्या टळेना. मोठी विचित्र स्थिती निर्माण झाली. विठ्ठलपंत त्या परिस्थितींत प्रयाग क्षेत्रीं गेले व तेथें त्यांनीं देहत्याग केला ! मुलें ल्हान. त्यांचा व्रतबंध व्हावयाचा होता. त्यासाठीं तत्कालीन ब्रह्मवृंदाला तीं शरण गेलीं, व आपला व्रतबंध करा अशी विनंती करूं लागलीं.

ब्रह्मवृंद त्या काळचा तो! त्यांनीं सांगितलें कीं क्षेत्राचा दाखला घेऊन या आणि मग तुम्हांला अधिकृत करून घेऊं!

तीं मुलें फिरत फिरत पैठणाला गेलीं. मुलें कसलीं? अवतारी महापुरुष होते ते! तेथें त्यांनीं नाना प्रकारचे अद्‌भूत चमत्कार केले. ईशभक्तींत तीं मुलें तल्लीन होऊन जात असत. सूज्ञ पैठणकरांनीं त्यांना उपदेश केला कीं, आपण जो भजनाचा मार्ग स्वीकारला आहे तो कदापि सोडूं नका. तोच तारक होणार आहे. 'अनन्य भक्तीतें अनुसरा.'

## ज्ञानदेवांबद्दल बाबांचा आदर

तेथून तीं मुलें आपल्या गावीं आलीं व सतत सात वर्षेपर्यंत त्यांनीं कार्यांचे प्रचंड डोंगर उभे केले. ज्ञानेश्वरांनीं गीतेवरील टीका, अमृतानुभव व इतर महत्त्वाचे स्फूट ग्रंथ याच कालखंडांत लिहिले. तेवढ्यानेंही त्यांचें समाधान होईना. नंतर ते संत नामदेवा-बरोबर तीर्थाटनास गेले. अल्प कालावधींत आपलें जीवन साफल्य झालें असें समजून त्यांनीं अल्पावधींत समाधि घेतली.

अल्पावधींत चिरंतन काळ टिकून रहाणारी केवढी प्रचंड कामगिरी त्यांनीं करून ठेविली आहे! आज श्री साईबाबांचें आपण पुण्यस्मरण करीत आहोंत. सारे सत्पुरुष आपापल्या परीनें जगदुद्धारासाठीं महान् कार्य पार पाडून व त्या कार्यांच्या रूपानें आपली स्मृति कायम ठेऊन गेले आहेत. बाबांना ज्ञानदेवांबद्दल केवढा आदरभाव वाटत असे! त्यांचा व त्यांच्या कार्यांचा प्रेमादरपूर्वक उल्लेख करून बाबा म्हणतात 'जो दशावतार धरिता। जो अल्लाइलाही तत्त्वतां। मूढ जीवांचे उद्धारार्थां। सगुण झाला ज्ञानेश्वर ॥ "

संत एकमेकांस कसे ओळखत असत व मानीत असत, त्याचा दाखला आहे हा!

## मराठीचे महान् कारागीर

न्या. मू. म. गो. रानडे यांनीं संतांच्या कार्यांचा व त्यांच्या वाङ्मयाचा अत्यंत बारकाईनें व संशोधन पूर्वक अभ्यास केलेला होता. ज्ञानेश्वरांच्या जीवन कार्यासंबंधीं व त्याच्या थोरवी संबंधानें ते म्हणतात 'ज्ञानेश्वरांच्या चरित्रांत नाहीं वीर रस, नाहीं करुण रस, कीं नाहीं शृंगार रस, तरीही वीराहून वीर, करुणाहून करुण व शृंगाराहून शृंगार असें कांहीं तरी भव्य व उदात्त त्या चरित्रांत आहे. तेव्हांचीं व आतांचीं साधनें आपण पहा. हल्ली शाळा, पाठशाळा वाटेल तेवढ्या आहेत तशा त्याकाळीं नव्हत्या; असें असतां हल्लींच्या आपल्या मराठीला जी थोरवी व जो भारदस्तपणा आलेला आहे त्याचे मूळ कारागीर कोण माहीत आहे? तो महान् कारागीर म्हणजे ज्ञानेश्वर! कित्येक असें गान्हाणें करतात कीं, मराठींत आपले विचार चांगल्या प्रकारें प्रदर्शित करतां येत नाहींत; परंतु मराठींत अर्थगांभीर्य किती आहे हें पहावयाचें असल्यास ज्ञानेश्वरीचें अध्ययन करावें. त्यांत त्यांना दिसून येईल कीं, मोठमोठीं गूढ प्रमेयें, तत्कालीन प्राकृत, तत्सम, तद्भिव शब्दांनीं अगदीं सोप्या भाषेत त्यांनीं प्रदर्शित केलीं आहेत. इतकी ज्यांनीं आमच्या भाषेला योग्यता आणिली त्यांनीं भाषेवर थोडेथोडके उपकार करून

ठेविले आहेत काय ? ज्ञानेश्वरीच्या रूपानें त्यानीं आपणास सान्या गीतेचें रहस्य समजावून सांगितलें. महाभारतादि ग्रंथांप्रमाणें गीताग्रंथ विस्तृत नाहीं. तरी त्यांत उत्तम रहस्य आहे; आणि तें जगाला स्पष्ट करून दाखविण्यासाठीं ज्ञानेश्वरांचा अवतार झाला.

'तुम्हीं आम्हींही अवतार घेतले आहेत; परंतु आपल्यापैकीं कोणाचा अवतार लोभाचा, कोणाचा कामाचा, कोणाचा आळसाचा तर कोणाचा व्यसनाचा अवतार!'

न्यायमूर्ति रानडेच काय परंतु तत्पूर्वी होऊन गेलेल्या तुकाराम, रामदास व एकनाथ यांच्यासारख्यानीं ज्ञानराजांच्या सर्वश्रेष्ठ कार्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद देऊन ठेविले आहेत. श्रीसाईबाबानीं त्याचप्रमाणें आजच्या काळांतील थोर थोर विद्वानांनीं व महापंडितांनी त्यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे व पुढेंहि तो सतत होत राहील यांत तिळमात्र संदेह नाहीं.

आपल्या महाराष्ट्र सरकारनें 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचें विद्वानाकडून संशोधन करवून तो यच्चयावत् लोकांच्या आटोक्यांत यावा व या ग्रंथराजाचें घरोघर सुस्वागत व्हावें या स्तुत्य उद्देशानें त्याची संशोधित आवृत्ति अलिकडेच प्रसिद्ध केली आहे व ती अवघ्या पांच रु. किंमतीनें मिळण्याची सोय करून ठेविली आहे. या ज्ञानगंगेकडे आतां तरी पाठ न फिरवितां त्यांत यथामति यथाशक्ति अवगाहन करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे.

---

## विवेकानन्द वाक्सुधा

ईश्वर आमच्या अंतरांत आहे. तो बाहेर नाहीं. मात्र आपण त्याला शोधून काढला पाहिजे.

ईश्वर आहे कीं नाहीं हें वादविवाद करून सिद्ध करावयाचें नसतें. तो ज्याचा त्यानें श्रद्धेच्या बळावर पहावयाचा असतो.

आमचें हृदय हेंच सर्वांत मोठें मंदिर आहे.

तुम्हांला आत्मप्रचीति आली मग दुसऱ्या प्रचीतीची जरूर नसते. स्वत्वाची ओळख पटली म्हणजे इतर आत्म्यांची ओळख सहजासहजीं पटेल.

मनावर ताबा मिळवितां आला पाहिजे. मनाची एकाग्रता हेंच ईशप्राप्तीचें एकमेव साधन आहे. त्याच साधनाच्या सहाय्यानें आपण त्याचे चरणकमल पहावयाचे आहेत.

एकाग्रतेप्रत पोहोंचलेलें मन हा एक दिव्य दिवा आहे. आत्म्याचा कोनाकोपरा त्या दिव्याच्या सहाय्यानें पहातां येतो.

---

# बाबांचें पुण्यस्मरण

श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथीचा सोहळा म्हणजे आपल्या जीवनांतील दिवाळी दसरा ! किती आनंदाचा व त्यांच्या जीवन स्मृतींत तल्लीन होऊन जाण्याचा हा सोहळा आहे. बाबांनीं समाधि घेण्यासाठीं नेमका दसरा साधला व आपल्या लोकोपकारी जीवनाची विजयपताका फडकाविली !

शिरडी ही बाबांची कर्मभूमि. तेथें ते प्रगट झाले व अल्पावधींत फार महत्वाचें कार्य पार पाडून त्याच भूमींत ते विलीन झाले. अशा रीतीनें 'जे एकाठायीं होते । ते सर्वांठायीं भरले ॥'

### उत्सव महात्म्य

बाबा समाधिस्थ झाल्यापासून त्यांच्या वास्तव्यानें पूनित झालेल्या त्या पवित्र भूमींत सतत तीन दिवस त्यांचा पुण्यतिथ्योत्सव मोठ्या थाटात प्रतिवर्षी होत असतो. त्या दिवसांत 'साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं' या पावन गीतानें तेथील सारें वातावरण रात्रंदिवस दुमदुमून जात असतें.

श्री साईबाबांचें पुण्यस्मरण म्हणजे त्यांच्याठायीं जे दैवी गुण होते त्यांचें स्मरण व यथाशक्ति आचरण. केवळ बाबांची आठवण करून काय होणार आहे ? दर वर्षी त्यांनीं जें लोककल्याणाचें, लोकोद्धाराचें व पर दुःखनिवारणाचें तत्त्वज्ञान अहर्निश आचरणांत आणिलें, त्यापैकीं कोणत्या गोष्टींचें किती प्रमाणांत आपल्याकडून आचरण घडलें, हा विचार आमच्या मनांत अवश्य आला पाहिजे. बाबा प्रत्येकाच्या कल्याणासाठीं झटत होते; आणि आम्हीं काय करीत आहोंत ? आम्हीं आमच्या कल्याणापुरतें व आमच्या सुखा-पुरतें पहात आहोंत; परंतु इतरांच्या सुखासमाधानांत आपलें सुख आहे, इतरांसाठीं झटण्यांत आपलें कल्याण आहे या मंत्राचा उलगडा आम्हांला अद्याप झालेला नाहीं.

### बाबांचा आदेश

बाबांनीं सर्वांचा निरोप घेतांना सांगितलें आहे कीं, 'मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण । ठेवा, करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥'

या त्यांच्या आदेशाचा कधीं कोणी गंभीरपणें विचार केला आहे कां ? बाबांचें स्मरण करायचें म्हणजे जी शिकवण व जें तत्त्वज्ञान त्यांनीं जीवनभर आचरणांत आणिलें त्याचें स्मरण, त्याचें मनन व त्याचें आचरण, परंतु त्यांच्या शिकवणीचा विचार करायला या धकाधकीच्या काळांत वेळ कुठें आहे आम्हांला ?

बाबा आमच्या दृष्टिआड झाल्यासारखे वाटत असले तरी ते कुठें गेलेले नाहींत. ते आमच्याजवळ आहेत. त्यांचें वास्तव्य आमच्या अंतःकरणांत आहे. त्यांनीं आमच्या अंतःकरणांत स्थान मिळविलें आहे. परंतु त्याची जाणीवच नाहीं आम्हांला.

तशा श्रद्धेनें पहा त्यांच्याकडे; मग ते तुम्हांला दिसल्याशिवाय रहाणार नाहींत. त्यांचें भजन पूजन करायचें तें कोणत्याहि स्वार्थासाठीं नव्हें तर सर्वांच्या कल्याणासाठीं करावयाचें.

जो बाबांना अनन्यभावें शरण जाईल व श्रद्धापूर्वक त्यांचें स्मरण करून त्यांच्या शिकवणीप्रमाणें आचरण करील, त्याच्यापासून बाबा केव्हांही दूर जाणार नाहींत.

**आम्हीं काय करावें ?**

बाबांची पुण्यतिथि प्रतिवर्षी येते व जाते; परंतु दर वर्षी बाबांचा मार्ग चोखाळ-ण्यांत आमचें पाऊल किती पुढें पडलें हें आपण पाहिलें पाहिजे. आम्हीं त्या दृष्टीनें स्वतःच्या आचरणावर बारीक नजर ठेविली पाहिजे. प्रतिवर्षी आपलें एक एक पाऊल पुढें पडत गेलें पाहिजे. तें पडत आहे कीं नाहीं, जमेला कांहीं सादर होत आहे कीं नाहीं, याचा हिशोब आपण ठेविला पाहिजे. बाबांच्याठायीं भाव पाहिजे, संपूर्ण श्रद्धा पाहिजे. अर्थात् त्यांनीं जें जें सांगितलें तें तें आचरणांत आणण्यासाठीं आम्हीं झटत राहिलों तरच बाबांचें पुण्यस्मरण केल्याचें फळ आपल्या पदरांत पडणार आहे. नाहींपेक्षां पुण्यतिथि येईल आणि जाईल. आम-च्यांत कांहीं एक थोरपालट न होतां आम्हीं जेथें आहोंत तेथेंच राहूं. पुण्यतिथि दिन हा आम्हांला जागे करण्यासाठीं येत असतो. तुम्हीं आम्हीं चार दिवस उत्सव करून मोकळे व्हावें यासाठीं नाहीं येत.

तेव्हां सांगायचें काय ? श्रद्धायुक्त अंतःकरणानें बाबांच्या शिकवणीचें आम्हीं स्मरण करूं या. ती आचरणांत आणण्याची जास्तींत जास्त शिकस्त करूं या. मग बाबा सांगत आहेत कीं, **तुम्हीं जोर काढूं लागा । दुधाची काळजी सर्वस्वीं त्यागा । वाटी घेऊन उभाच मी मागा । पृष्ठ भागा आहे कीं ॥**

आणखी कोणतें आश्वासन पाहिजे आपणाला ?

---


## नवीन वर्गणीदारांसाठीं—

श्री साईलीलेचे वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां येतें; अवघ्या वार्षिक पांच रु. वर्गणींत (ट. ख. सह) श्री साई लीलेचे प्रत्येक महिन्यास वक्तशीर अंक मिळून शिवाय तीन विशेषांक मिळतात. हें मासिक प्रत्येक स्त्री पुरुषानें व मुलांबाळांनी वाचून आपलें जीवन सुसंपन्न करावें असेंच त्यांतील लेख असतात. वा. व. रु. ५ पुढील पत्त्यावर मनिऑर्डरीनें पाठविण्यांत यावी.

व्यवस्थापक : श्री साईलीला. ईस्ट ॲंड वेस्ट ई. कं. बिल्डींग,
अपोलो स्ट्रीट, फोर्ट मुंबई १

सत्पुरुषांचीं चरित्रें, त्यांचें जीवनकार्य व त्यांच्या लीला परम पवित्र व आपणांस पावन करणाऱ्या असतात. त्यांचें पारायण कितीहि केलें तरी त्याची गोडी अवीट असते व तेवढें अधिक पुण्य आपल्या पदरीं पडत असतें. साईभक्तांना श्रीसाईबाबांच्या लीला व त्यांचें जीवनकार्य माहीत असलें तरी त्यांचें पुन्हां पुन्हां पारायण करण्याचें महत्व ते जाणतात. ह. भ. प. श्रीदासगणूमहाराज यांनीं अर्वाचीन भक्त व संत लीलामृताच्या द्वारें ओवीबद्ध चार अध्यायांत बाबांच्या शिकवणीचा अत्यंत सुंदर रीतीनें परिचय करून दिलेला आहे. त्याचाच हा गद्यावतार असून ठायीं ठायीं त्याचें यथामति निरुपणही करण्यांत आलें आहे. आमच्या साईभक्त वाचक बंधुभगिनींस हा प्रयत्न आवडेल अशी अपेक्षा आहे. त्यांनीं कृपा करून दुर्लक्ष न करतां त्याचें अध्ययन अवश्य करावें. त्यापासून झाला तर फायदाच होईल.

# श्रीसाईबाबा आणि त्यांची शिकवण

**आ प्पा रा व**

देवाचे भक्त, मग त्यांचा जन्म कोणत्याही जातींत झालेला असो; ते प्रती परमेश्वर बनतात. निस्सीम भक्ति असली म्हणजे झालें. देव तुमची जात गोत कांहीं पहात नाहीं. तुमचा भाव शुद्ध असला म्हणजे तुम्हांला देवाच्या चरणीं वाव मिळाला म्हणून समजावें. ईश्वराला सर्व जाती सारख्या. तेथें श्रेष्ठ कनिष्ठ हा भाव नाहीं. हृदयांतील प्राण-ज्योत ही सर्वत्र सारखी असते नाहीं का ! एकच परमेश्वर सर्वांच्या हृदयांत वास करीत आहे. तुमचा पंथ कोणता, तुमची मतें काय, तुम्हीं कोणत्या पक्षाचे, हें देव पहात नाहीं. तेथें द्वैताला अवसरच नसतो.

## देव भावाचा भुकेला

पूर्वी कबीर, कमाल हे भक्त मुसलमान समाजांत होऊन गेले. ते देवाचे परम-भक्त होते. देवानें त्यांची जात किंवा ते कोणत्या समाजांत जन्मले हें नाहीं पाहिलें. त्यांची भक्ति पाहिली. देव भावाचा भुकेला आहे. तुमच्याठायीं भावाचा सुकाळ असला म्हणजे झालें. भगवंत भावानें विकत घेतां येतो. तुम्हांला भगवंत भेटला पाहिजे ? मग निस्सीम भक्तिभाव हेंच त्याचें मोल. तें मोल भरपूर प्रमाणांत द्यावें आणि त्याला खुशाल विकत घेऊन आपलासा करून ठेवावें. देवाचे भक्त कोणत्याही जातींत किंवा कोणत्याहि स्थिरलीत निर्माण होवोत; ते परमभक्त या नात्यानें त्याचे आवडते होऊन रहात असतात. देव भावाचा भुकेला !

गंगेच्या दक्षिणेस चार कोसांवर शिरडी या नांवाचें एक गांव कोपरगांवापासून जवळ आहे. त्या शिरडी गांवांत एकदां एका पुण्यवंताचें आगमन झालें. त्यांना त्यांचे भक्त 'साईबाबा' या नांवानें संबोधूं लागले. ते मूळ रहाणारे कुठले, त्यांचा आगापिछा काय, हें कधीं कोणाला समजलें नाहीं. ते नेहमीं आनंदांत असत. कशाचीहि चिंता नाहीं. 'बाबा, तुम्ही आलांत कोठून ? आपलें नांव-गांव तरी सांगा !' असे प्रश्न कोणी विचारले असतां ते सांगत असत कीं, 'आकाशांत मेघांचा गडगडाट होतो आणि जमिनीवर पाऊस कोसळतो, तसाच मीहि कुठून तरी आलों. आमचा ठावठिकाणा कांहीं नाहीं. आम्हीं निर्गुण. कांहीं ना कांहीं कर्म आमच्या हातून घडलें व त्यामुळें हा देह प्राप्त झाला. यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. या पिंडाला देह म्हणतात. या देहानें आम्ही आपल्यामध्यें वावरतों म्हणून आम्हीं देही व सारें विश्व हेंच आमचें गांव. आमचे आईबाप कोण म्हणून विचारतां ? आमच्या वडिलांस ब्रह्म म्हणतात आणि आमची आई माया. त्यांच्यामुळें आम्हांला हा आकार प्राप्त झाला.'

लोकांनीं त्यांच्यासंबंधीं त्यांना कितीही प्रश्न विचारले तरी हेंच त्यांचें ठराविक उत्तर असे. हें सारें जग नाशिवंत आहे. येथें टिकणारें, रहाणारें असें कांहीं नाहीं, हीच त्यांची नेहमींची भावना असे. शिरडींत आल्यापासून या महाराजांनीं नाना प्रकारचे चमत्कार केले. त्या सर्वांचें वर्णन करण्याची शक्ति आमच्याठायीं मुळींच नाहीं.

## बाबांचा दीपोत्सव

शिरडी हें गांव अगदींच लहान. तेथें दुकानेंही फार थोडींच होतीं. आणि जीं होतीं तीं हिंग, मिरच्यांचीं होतीं. त्या दुकानदारांजवळ जाऊन महाराज तेल मागून घेत असत व तेलाच्या सहायानें मशिदींत व देवळांत दिवे लावीत असत. अशा रीतीनें साईबाबांनीं किती तरी वेळां दीपोत्सव साजरे केले परंतु पुढें व्यापारी तेल द्यायला कुरकूर करूं लागले. यांना उठल्यासुटल्या फुकटचें तेल द्यायचें म्हणजे काय ? आम्हीं यांचें वेऊन खाल्लें आहे, असे त्यांना वाटायचें. एकदां दुकानदारांनीं एकत्र जमून काय आपसांत विचारविनिमय केला. हा त्रास कसा बरें दूर करायचा ? यांना रोज तेल द्यावयाचें कुठून, शेवटीं त्यांनीं ठरविलें कीं हे तेल मागायला आले म्हणजे त्यांना तेल नाहीं, संपलें, म्हणून सांगायचें आणि त्यांना वाटेला लावायचें !

बाबा नेहमींप्रमाणें तेल मागण्यासाठीं दुकानावर आले, तेव्हां पूर्व नियोजित योजनेप्रमाणें दुकानदारांनीं त्यांना तेल नाहीं, संपलें म्हणून सांगितलें. त्यांचें तें उत्तर ऐकून बाबांना आश्चर्य वाटलें. स्वतःशींच म्हणाले, खोटें बोलणें म्हणजे यांच्या हातचा जणूं काय मळ होऊन राहिला आहे. त्यांत अवघड असें त्यांना कांहीं वाटत नाहीं. त्यामुळेंच यांची ही अधोगति झालेली आहे. अशा स्थितींत त्यांना डोकें वर करायला मिळत नसलें तर त्यांत नवल कसलें ? देव त्यांना दुरावला आहे त्यांचें तरी कारण काय ? उत्तरोत्तर यांचें पतन होत जावयाचें. हे असेच आपल्या कर्मांमुळें खालीं खालीं पडत जाणार ! ज्याची जीभ खोटें

बोलण्यांत सराईत झाली आहे, त्याच्यासारखा महापातकी तोच. त्याला पातक्यांचा मुकुटमणी म्हणणेंच शोभेल. त्याची व देवाची भेट केव्हांहि होणार नाहीं. जो नेहमीं सत्य बोलतो व न्यायनीतीनें वागतो त्याचा भगवंत दासानुदास होऊन रहात असतो. तो सर्वस्वी त्याचाच होतो. सत्य वचनाचें, सत्यानें वागण्याचें फळ फार मोठें आहे. जप, तप हीं त्यापुढें कांहींच नाहींत. 'सत्य पुण्याईचा घाट । सत्य ही मोक्षाची वाट । सत्य आनंद–नदीचा घाट । तें सत्य न सोडावें ॥' सत्याची महति एवढी मोठी आहे. यासाठीं नेहमीं सत्याचरण करण्याकडे लक्ष असावें.

## एक अलौलिक कृत्य

त्या वाण्यांच्या तोंडून असत्य वाणी निघाली त्यामुळें बाबांना खंत वाटली; परंतु कांहीं न बोलतां ते तसेच तेथून घाईघाईनें निघाले व आपल्या निवासस्थानीं आले. या घटनेनंतर त्यांनीं एक अलौकिक कृत्य केलें. बाबांची लीला खरोखर अगाध आहे.

मग बाबांनीं काय केलें ? मशिदीच्या सभोंवार त्यांनीं पणत्या मांडून ठेविल्या. त्यांत मोठाले कांकडे ठेविले. त्यावेळीं आसपास उभे राहून सारे लोक आतां पुढें काय मजा होते हें उत्सुकतेनें पहात होते. त्यांची आपसांत कुजबूज चालली होती कीं, तेलाशिवाय दिवे पेटणार कसे ? ही काय थट्टा आहे ! पणत्या आणल्या, त्यांत वाती घातल्या, एवढ्यानें काय होणार ? तेल आहे कुठें ? आणि त्याशिवाय पणत्या पेटवूं पहाणारा हा वेडाचीर नाहीं का ? खडकांवर बी पेरलें तर तें कधीं रुजणें व त्याला कोंब फुटणें शक्य आहे ? वांझोटीला कधीं मूलबाळ झालें आहे का ? शहाणा माणूस असें भलते सलतें केव्हांही करणार नाहीं. हा वेडा नाहींतर काय ? नुसता वेडाच नव्हे तर वेड्यांचा मुकुटमणी ! याला अज्ञानी व मूर्ख लोकांचा राजा म्हणणें शोभेल ! तेलाशिवाय दिवे पाजळायला निघाला आहे ! याची अक्कल कुठें गेली समजत नाहीं.

अशा रीतीनें ते लोक आपसांत बडबड करीत होते. इकडे बाबा आपल्या कामांत गर्क होऊन गेले होते. एखादी सांजवात लावायला पुरेल एवढेंच तेल त्यांच्या हातांतील टमरेलांत होतें. तें घेऊन ते मशिदींत गेले. तेवढ्यांत तेथें हजर असलेले नानासाहेब डेंगळे चेष्टा करण्यांत गुंतलेल्या लोकांना उद्देशून म्हणाले, 'तुम्हीं सारे लोक आंधळे अहांत; काय समजतें आहे तुम्हांला ? उगाच एखाद्यांची निंदा करायची म्हणजे काय ? कोणाची काय योग्यता आहे हें समजून घ्यावें, उगाच अविचारानें तोंडाला येईल तें बडबडत सुटूं नये. कोणाची काय योग्यता आहे हें तुम्हीं जाणूं शकत नसलां तरी भगवंताला त्याची जाणीव असते. एखादा हिरा चकचकीत गारांमध्यें पडलेला असला तरी त्याला गार म्हणतां येईल का ? हिरा तो हिरा व गार ती गार. दोघांची तुलनाच करतां येणार नाहीं. धीर धरून थोडा वेळ स्वस्थ रहा व यानंतर हा फकीर काय चमत्कार घडवून आणतो तें स्वस्थपणें पहा ! उतावळेपणानें वाटेल ते कयास बांधण्यांत व उगाच बडबड करण्यांत काय बरें फायदा आहे ?'

अशा रीतीनें तेथील 'बघ्या' लोकांची समजूत घालून डेंगळे मशिदींत आले व कांहींएक न बोलतां पुढें काय चमत्कार घडतो हें उत्कंठेनें पहात राहिले.

### पणत्या पेटूं लागल्या

तेवढ्यांत बाबांनीं काय केलें पहा! टमरेलांतील त्या तेलांत अर्धें पाणी घातलें व तें पिऊन आणि आत्मारामाला अर्पण करून ते मोकळे झाले. तेलमिश्रित पाणी गिळंकृत केल्यानंतर टमरेल भरून साधें पाणी घेतलें व तेलाऐवजीं तें पणत्यांत ओतण्यास आरंभ केला. साऱ्या पणत्या पाण्यानें भरल्यानंतर बाबांनीं एकेक पणती आगकाडीच्या सहाय्यानें पेटविली. आणि काय चमत्कार पहा! साऱ्या पणत्या संथपणें पेटूं लागल्या व आपल्या प्रकाशानें त्यांनीं सर्वांचे डोळे दिपविले. डेंगळे आश्चर्यानें थक्क झाले व त्यांनीं त्या भरांत धांवत जाऊन बाबांचे पाय धरले. डेंगळेच कां? त्या चमत्कारानें सर्व लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. त्या पणत्या रात्रभर शांतपणें पेटत होत्या व प्रतिक्षणाला लोकांच्या आश्चर्यांत भर घालीत होत्या. 'केवढा हा बाबांचा अधिकार! तेलाऐवजीं पाण्याचा वापर करून पणत्या पेटविणें ही साधीसुधी नव्हे तर अघटित घटना होती. ईश्वराशिवाय असला चमत्कार करण्याचें सामर्थ्य दुसऱ्या कोणांत असूं शकेल? बाबा म्हणजे प्रति परमेश्वर आहेत.' असें जो तो स्वतःशींच म्हणूं लागला.

बाबांची योग्यता अनन्यसाधारण आहे. ते दिसतात तसे नाहींत अशी जाणीव लोकांत होऊं लागली. आतां कुठें शिरडींतील लोकांना बाबांची ओळख पटली. सारे लोक एकत्र जमले व आपल्या हातून घडलेल्या अपराधांची क्षमा मागण्यासाठीं बाबांपाशीं आले. सर्वजण अत्यंत नम्रतापूर्वक हात जोडून म्हणाले, 'बाबा! आम्हीं अपराधी आहोंत. क्षमा करा आम्हांला. रागावूं नका. आम्हीं तुमचीच पोरेंबाळें आहोंत. तुम्हींच आमची आई. आई आपल्या मुलांवर कधीं रागावते का? आणि रागावली तरी बाळांचे अपराध पोटांत घालून त्यांना ती प्रेमानें कुरवाळीत नाहीं का? तुम्हीं कृपासागर आहांत. आमच्यावर दया करा आणि आम्हांला जवळ घ्या. ज्ञानाचा प्रखर सूर्यप्रकाश जर कुठें पहायचा असेल तर तो तुमच्याठायीं पहायला मिळेल. साऱ्या सद्गुणांचें माहेरघर आपणच आहांत. शांततेचा व क्षमाशीलतेचा मेरूपर्वत जर कुठें पहायचा असेल तर तो तुमच्याठायींच पहायला सांपडेल. मग बाबा! नाहीं का आम्हांला क्षमा करणार?'

त्यांना पश्चात्ताप झालेला पाहून बाबा गहिंवरले. अपरंपार करुणेनें ज्यांचें अंतःकरण सदासर्वकाळ व्यापलेलें, त्यांना दया आल्याशिवाय कशी राहील?

### बाबांची तळमळ

त्या सर्वांना उद्देशून बाबांनीं जो उपदेश केला तो प्रत्येकानें आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखा आहे. बाबांच्या आवाजांत करुणा होती, तसाच निर्धारही होता. सर्वांची सुधारणा व्हावी व सर्वांनीं योग्य मार्गानें जाऊन आपापलें कल्याण साधावें हीच तळमळ त्यांच्या बोलण्यांत दिसून येत होती. ते म्हणाले, "बाबांनो! शांत चित्तानें मी काय म्हणतों तें सावधानपूर्वक ऐका. सत्याचरण केव्हांही सोडूं नये. आपल्या

तोंडून खोटा शब्द केव्हांही निघूं नये. आपलें सारें बोलणें, वागणें असें असावें कीं जेणेंकरून श्रीहरीला आनंद वाटेल. त्याला आवडणार नाहीं अशी गोष्ट आपल्या हातून केव्हांही घडूं नये. कोणाचा घातपात करूं नका. कोणाचें वाईटही चिंतूं नका. देवानें संपत्ति दिली असली तर तिचा व्यय सत्कार्यासाठीं अवश्य करावा; शक्तीनुसार दुसऱ्यां-साठीं जें कांहीं करतां येईल ते करीत जावें. तुमच्या कल्याणाचा हा मार्ग मी दाखवून देत आहे. या मार्गानें तुम्ही जाऊं लागलांत म्हणजे तुमची व नारायणाची एक दिवस भेट झाल्याशिवाय रहाणार नाहीं. मी सांगत असलेलें हें त्रिकालाबाधित सत्य आहे. तें आपल्या अंतःकरणावर सदासर्वकाळ कोरून ठेवा."

बाबांचा हा सदुपदेश सर्वांना आवडला. सर्वांनीं माना डोलविल्या व बाबांना वंदन करून सर्वजण मोठ्या आनंदानें व समाधानानें आपल्या घरीं गेले.

साईमहाराज हे महान् योगी. त्यांचा योगाभ्यास दांडगा. त्यांचें वर्णन आम्ही कुठवर व कसें करावें? त्यांच्या अगम्य लीला वर्णन करण्याचें सामर्थ्य आमच्याठायीं नाहीं. आणि त्यांचें वर्णन करून तरी त्या संपणार आहेत थोड्याच?

## बाबांचा बिछाना

ही घडलेली सारी हकीगत डेंगळे यांनीं चितांवर हे भाविक असल्यामुळें त्यांना सांगितली. त्यांनाहि ती ऐकून समाधान वाटलें. बाबांचा बिछाना किंवा त्यांच्या झोपण्याची जागा मोठी विचित्र होती. ऐकून नवल वाटेल तुम्हांला! अवघी एक वीत रुंद व चार हात लांब अशी लाकडाची फळी! त्यांची बिछाईत, त्यांचें अंथरूण—पांघरूण म्हणजे तेवढेंच काय तें! ती मशिदींत जराजीर्ण चिंध्यांच्या सहाय्यानें लटकाविलेली असे. ती मशीद तरी काय? तीही जुनी पुराणी होऊन मोडकळीस आलेली होती. तिचे खांबले कधीं पडतील याचा नेम नव्हता. आणि जेथें धोक्याचा संभव होता, अशा अढ्यासमोर ती फळी टांगलेली होती. तिच्यावर नुसतें संभाळून बसलें तरी देह धनुष्याप्रमाणें वांकवावा लागत असे; आणि अशा त्या विचित्र शय्येवर बाबा रात्रींच्या आरामासाठीं पहुडत असत. त्या फळीच्या दोन्ही बाजूंस म्हणजे उशाजवळ व पायांजवळ दोन दिवे लावून बाबा योगनिद्रा घेत असत.

त्या फळीचें आणखी वर्णन कुठवर करावें? तिच्यावर जरा अल्गद जरी पाय ठेविला तरी ती निश्चित तुटून खालीं पडली असती, अशा प्रकारची तिची बळकटी होती. आणि अशा त्या फळीवर बाबा खुशाल आराम घेत पडत असत. हें कोणाला सांगितलें तर त्यावर त्याचा विश्वास बसणार नाहीं; आणि बसत नसेही. आणि म्हणून बाबा त्या फळीवर झोपतात तरी कसे हें पहाण्यासाठीं रात्रींच्या प्रहरीं अनेक लोक त्याठिकाणीं येत असत. पहातात तर काय? बाबा खुशाल स्वस्थपणें फळीवर झोपलेले! हा चमत्कार पहाण्यासाठीं येणाऱ्या लोकांची गर्दी पुढें अधिकाधिक वाढूं लागली. त्यामुळें त्रासही वाढूं लागला. त्याला तोंड देणें उत्तरोत्तर

कठीण होऊं लागलें. शेवटीं त्या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठीं बाबांनीं ती फळी एके दिवशीं तोडून टाकिली. कारण त्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

साईबाबा हे थोर संत, महंत आहेत, अशी ख्याति जनतेंत उत्तरोत्तर वाढत चालली. अनेक लोक त्यांना नाना प्रकारचे नवस करूं लागले. शिरडींत आस्ते आस्ते लोक वाढत्या प्रमाणांत येऊं लागले. शिरडीला काशी, वाराणसीप्रमाणें तिर्थाचें स्वरूप येऊं लागलें. बाबांमुळें शिरडीची ख्याति वाढत चालली. सर्वतोमुखीं शिरडीचें नांव झालें. सुगंध देणाऱ्या फुलांमुळें मातीला महत्त्व येतें; हिऱ्यामुळें कोंदणाची महति वाढते किंवा सोन्यामुळें एखाद्या चिंधीलाही महत्त्व येतें, त्याचप्रमाणें बाबांच्या वास्तव्यामुळें शिरडीचें महत्त्व वाढत गेलें. शिरडी म्हणजे एक लहानसें व कोणाच्या लक्षांत न येणारे खेडें परंतु बाबांमुळें त्याला क्षेत्राचें स्वरूप आलें. अशा त्या सत्पुरुषाची थोरवी किती वर्णें गावी ?

## वाईकर हरिदासाची फजिती

एकदां त्या शिरडी गांवांत बाबांचें दर्शन घेण्यासाठीं बरीचशी मंडळी आली. त्यांत नारायण गोविंद चांदोरकर हे होते. त्यांना नानासाहेबही म्हणत असत. ते जिल्हा कलेक्टरचे चिटणीस होते. दुसरे वाईचे रामदास हरिदास, तिसरे बापू नगरकर व चौथे कानगांवकर या नांवाचे गृहस्थ; अशी बरीच मंडळी बाबांचें दर्शन घेण्यासाठीं आली. त्यांत जे रामदास होते त्यांना दुसऱ्याच दिवशीं हनुमान जयंतीसाठीं नगरला जायचें होतें. त्यांच्या मनाला स्वस्थता नव्हती. ते जाण्यासाठीं चुळबूळ करीत होते. म्हणत होते— ' आतां दर्शनबिर्शन पुरें झालें. मला लौकर निघालें पाहिजे. गाडी साधायची आहे. आटपा एकदां लौकर ! '

बाबांना त्यांची ती गडबड समजली; ते नानासाहेबांस उद्देशून म्हणाले, ' जायचें हें आहेच; परंतु भोजन उरकून गेलेलें बरें असें मला वाटतें. बाबांचा हा सल्ला ऐकून नानासाहेब त्यावर कांहीं एक बोलले नाहींत. कानगांवकर यांस बरोबर घेऊन बाबांच्या इच्छेप्रमाणें ते भोजन उरकण्याच्या तयारीस लागले. तिकडे त्या वाईकर रामदासांची काय गडबड चालली होती ती पहा ! त्यांना तेथून केव्हां एकदां निघेन असें झालें होतें. बाबांच्या शब्दांकडे लक्ष पुरविण्याची त्यांना जरुरी वाटली नाहीं. बापू नगरकर त्यांना समोर दिसले. त्यांना उद्देशून ते म्हणाले, ' अहो ! येथें आतां विचार कसला करायचा ? इथून निघायचें हाच विचार ! माझें उद्यां नगरांत आहे कीर्तन. या वेड्यापिराच्या नादास लागून आपलें कसें बरें चालेल ? अहो ! चिटणीस साहेबांचे काय ! त्यांच्या घरीं गडगंज संपत्ति आहे. त्यांना कसली आली आहे काळजी ! मी जर या फकिराच्या नादास लागून येथें लोंबकळत राहिलों, तर उद्यां भीक मागत फिरण्याची पाळी येईल माझ्यावर ! येथें नाहीं कवडीची प्राप्ति ! कसला आला आहे फायदा येथें रहाण्यांत ? चला, आपण स्टेशनच्या मार्गास लागूं या. आतांची गाडी आपण साधलीच पाहिजे. चला; निघूं या.

असें बोलून ते दोघेहि स्टेशनच्या मार्गास लागले व त्यांनीं स्टेशन गांठलेंहि. त्यांच्यापैकीं मागें कोण राहिले ? नानासाहेब ( चिटणीस ) व कानगांवकर.

बाबांनीं हें जाणलें. ते दोघे निघून गेल्याचें त्यांना समजलें. ते नानासाहेबांस हांक मारून म्हणाले, 'हें जग कसें स्वार्थी आहे पाहिलेंत ? त्यांना आपले साथीदार किंवा मित्र यांची पर्वा नाहीं. आपण बरोबर आलों व बरोबरीनें गेलें पाहिजे हें त्यांच्या ध्यानीं मनीं नाहीं. ध्यानीं मनीं केवळ स्वार्थ ! आपला मतलब कसा साधेल एवढेंच पहावयाचें. यासाठीं मित्र जोडावा तो असा जोडावा कीं जो आपणास कल्पांतींहि सोडणार नाहीं. सुगंध फुलापासून कधीं दूर होत नाहीं. त्याचप्रमाणें खरा मित्र केव्हांही आपणास सोडून दूर जाणार नाहीं. ठीक आहे. या जगाची रीत कशी आहे ती तुम्हांला सांगितली. यांत जें कांहीं समजायचें तें समजा. तुमचें जेवणखाण झालें ना ? आतां तुम्ही खुशाल येथून स्टेशनवर जा. गाडी तुम्हांला मिळणार. ती सुटायला अजून वेळ आहे. मात्र मी बोललों तें नेहमीं लक्षांत ठेवा.'

चिटणिसांनीं होकारार्थी आदरपूर्वक मान हालविली, बाबांच्या चरणकमलांवर मस्तक ठेविलें व त्यांचा आशिर्वाद घेऊन ते स्टेशनवर जाण्यासाठीं निघाले. रामदास कथेकरी व बापू नगरकर हे जेवण न घेतां तसेच गाडी गांठण्यासाठीं घाईघाईनें स्टेशनवर येऊन बसले होते. ते तसेच गाडीची वाट पहात बसून राहिले होते. ते उपाशीं निघाले व तसेच उपाशीं बसून राहिले होते. स्टेशनवर काय खायला मिळणार ? पोटांत तर कावळे काव काव करीत होते, व हे मनांतल्या मनांत चडफडत होते. त्या चडफडण्याचा कांहींएक उपयोग नव्हता. संतांच्या शब्दांची अवज्ञा केल्याचें त्यांना योग्य तें बक्षिस मिळालें होतें. नानासाहेबांस आलेले पाहून ते दोघेहि विरघळून गेले. अगदीं लाजल्या-सारखे झाले व खालीं मान घालून उगाच माती उकरायला लागले ! प्राप्त परिस्थितींत दुसरें तरी काय करणार !

त्यांना त्या स्थितींत पाहून नानासाहेब चांदोरकरांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " अहो ! हें काय ! आम्हीं जेऊन खाऊन आलों तरी अद्याप तुम्हीं येथेंच कसे ? तुम्हांला नगरास जायचें होतें ना ? गाडी नाहीं मिळाली वाटतें ! यावर नगरकर उत्तरले, ' काय सांगायचें आणि बोलायचें ? उगाच येण्याची घाई केली. त्या सत्पुरुषाचें ऐकलें नाहीं. त्याचें चांगलें फळ आम्हांला मिळालें ! अहो ! काय सांगूं ! गाडी स्टेशनांत यायला अजून तीन तास आहेत ! यांच्या नादीं लागून येथें आलों आणि या ओसाड स्टेशनांत उपाशीं तडफडत बसलों आहोंत ! अशी आमची फजिती झालेली आहे. तुम्हीं मात्र फार चांगलें केलें. धन्य आहे तुमची ! "

बऱ्याच वेळानें गाडी आली व सारेजण एकत्र गाडींत बसून नगरास आले. एकंदरींत काय ? बाबा त्रिकालज्ञ होते हें त्रिवार सत्य आहे. त्यांना आमचें वंदन असो.

### आप्पावरील संकट

पूर्वी शिरडींत अप्पा कुळकर्णी या नांवाचे एक गृहस्थ रहात असत. साईबाबांवर

त्यांचा शुद्ध भक्तिभाव होता. माणसानें श्रद्धाशील असावें लागतें. अप्पांची साईचरणांवर श्रद्धा. प्रत्येक मनुष्य पूर्वसंचिताच्या बंधनांत वावरत असतो. पूर्वकर्मांनुसार कोणाला कशी बुद्धि होईल व कोणावर काय प्रसंग येईल, हें सांगतां येणें कठीण असतें. त्या आपल्या पूर्वकर्मांनुसार त्यांच्यावर कोणता प्रसंग ओढवला तो पहा! एका कामाच्या बाबतींत त्यांच्यावर भलतीच आपत्ति ओढवली! ती खरी होती का खोटी होती हें भगवंताला माहीत; परंतु त्यांच्यावर संकट ओढवलें खरें. अप्पा कुळकर्णी यांच्याकडून अफरातफर घडली असा सर्वत्र गवगवा झाला. अधिकारीवर्गाही त्यांच्या बाबतींत संशय-ग्रस्त झाला. त्यांच्यावर खटला भरला जाणार असेंही कोणी म्हणूं लागले. या सभोंवार पसरलेल्या वार्ता ऐकतां ऐकतां अप्पांची भीतीनें गाळण उडाली. तेवढ्यांत प्रांतसाहेबां-कडून अप्पाला 'ताबडतोब येऊन भेटा' असा हुकूम आला! तुमचें म्हणणें काय आहे! त्याचा प्रत्यक्ष येऊन जबाब द्या, अशा स्वरूपाचा तो हुकूम होता.

तो हुकूम हातीं पडतांच आप्पाला दरदरून घाम सुटला! काय करावें हें सुचेना. आतां परत शिरडीला येणें घडत नाहीं या विचारानें त्यांचें मन दुःखीकष्टी झालें. हुकुमा-प्रमाणें निघणें जरूर होतें. जातां जातां बाबांचें दर्शन घेऊन जावें असें वांटून ते बाबापुढें जाऊन भक्तिपूर्वक दोन्हीं हात जोडून उभे राहिले. कंठ भरून आला होता. तोंडावाटे शब्द बाहेर पडत नव्हता. तरीही धैर्य करून म्हणाले, ' बाबा! माझ्यावर मोठा कठीण प्रसंग आला आहे हो! तुम्हीं साक्षात् परमेश्वर अहांत, तुम्हीं सत्पुरूष अहांत. साधु अहांत सर्व कांहीं अहांत. काळाचें नियंत्रण करणें तुमच्याच हातीं आहे. तुम्हीं करूं शकणार नाहीं अशी या जगांत एकहि गोष्ट नाहीं. मला या साऱ्या गोष्टींची पूर्ण जाणीव आहे. माझ्यावर हें जें अचानक संकट आलें आहे त्यांत खऱ्या खोट्याचा भाग किती आहे हें का मी सांगितलें पाहिजे तुम्हांला? आपण त्रिकालज्ञ अहांत. तेव्हां मी काय सांगूं? माझ्या आई! या प्रसंगीं माझ्या अब्रूचें रक्षण करा—यापेक्षां अधिक काय सांगूं?" असें विनवून अप्पांनीं महाराजांच्या पायांस घट्ट मिठी मारली व धाय मोकलून रडूं लागले.

थोड्या वेळानें दुःख आवरून व बाबांकडे भरल्या डोळ्यानीं पहात अप्पा म्हणाले, "बाबा! माझें कांहीं बरें वाईट झालें किंवा मला डाग लागला तर आपणासही कमीपणा नाहीं का? त्यामुळें आपलें नांवही कलंकित होणार नाहीं का? मी आपला दासानुदास; लोक काय बरें म्हणतील याचा जरा विचार करा व माझ्यावर ओढवलेलें हें संकट दूर करा. माझा समर्थ कुबेर माझ्याजवळ असतां मी कां म्हणून भिक्षापात्र घेऊन दारोदार हिंडावें? महासागरांत सुखानें विहार करणाऱ्या माशानें ल्हानशा डबक्याकडे जावें काय? माझे आईबाप आपणच आहांत. बाळाचें रक्षण दुसरें कोण बरें करतील? तुमच्या वशिल्यापेक्षां या जगांत दुसरा मोठा वशिला कोणता बरें असूं शकेल? तुमचे पाय सोडून मी दुसऱ्या कोणाचेहि पाय धरायला जाणार नाहीं. हेच पाय माझें रक्षण करण्यास समर्थ आहेत, अशी माझी श्रद्धा आहे. तेव्हां हे कृपासागरा! या संकटापासून माझा बचाव करा. अप्पा कुळकर्णी म्हणजे बाबांचा कल्याण, असें सारे लोक म्हणत असतात. समजा, मला शिक्षा झाली

तर तो कलंक आपणासहि लागणार नाहीं का? कामधेनू ज्यांची आई अशा पोराबाळांनीं दुसऱ्या गाईंच्या दुधाची अपेक्षा कां म्हणून करावी? कल्पवृक्षाच्या फळांनीं कांट्याकुट्यांत कां म्हणून जाऊन पडून रहावें? मी आपणास परोपरीनें सांगण्याची व विनवण्या करण्याची जरुरी का आहे? आपण सर्वज्ञ व विचारवंत अहांत. माझ्यावर कृपा करा; जननिंदेस उगाच पात्र होऊं नका; एवढीच माझी आपल्या चरणीं अखेरची विनंती आहे.'

## बाबानीं दुःख जाणलें

अप्पा दुःखानें बेजार झाले होते. त्या भरांत काय वाटेल तें बोलत सुटले होते. बाबांनीं त्यांचें दुःख जाणलें. त्यांच्या दीन परिस्थितीची त्यांना बरोबर कल्पना झाली. त्यांना अभय व धीर देऊन बाबा म्हणाले, 'अप्पा! तूं चिंता करूं नकोस. प्रांतस्वारी सध्यां नेवाशाला आहे. कांहींएक भय न बाळगतां तूं जा तेथें. प्रवरेच्या काठीं वसलेल्या नेवाशा गावाचें महात्म्य फार मोठें आहे. या जगाचीं सारीं सूत्रें हलविणारा तो सूत्रधार मोहिनीरूपानें तेथें वास्तव्य करून राहिला आहे. 'भावार्थ दीपिका' लिहीत असतांना ज्ञानेश्वर महाराजांनीं प्रथम त्यांना वंदन केलें. तोच दशावतार व तोच अल्लाइलाही. अज्ञानी लोकांचें अज्ञान दूर करण्यासाठीं व त्यांच्या उद्धारासाठीं ज्ञानेश्वरही तोच झाला. तरी त्यांना भक्तिभावपूर्वक वंदन करून तूं प्रांतसाहेबापुढें हजर हो. तोच तुझें रक्षण करील व या संकटांतून बचाव करील हें निश्चित समज.'

बाबांच्या सांगण्याप्रमाणें अप्पा तंतोतंत वागले. तडक नेवाशास जाऊन त्यांनीं मोहिनी महाराजांस प्रणीपात केला व नंतर प्रांतसाहेबांच्या कचेरींत जाऊन जो कांहीं जबाब लिहून द्यावतो लिहून सादर केला. अंतःकरणांत बाबांचें स्मरण सतत चालू होतें. त्यांच्या जबाबानें ते निर्दोषी असल्याची साहेबांची खात्री झाली. व अप्पास निर्दोष म्हणून सोडून देतांना ते म्हणाले, 'तुमच्याकडून पैसा खाण्याचा गुन्हा घडलेला नाहीं, अशी माझी खात्री झाल्यामुळें मी तुम्हांस सोडून देत आहें.'

हें ऐकून किती आनंद झाला आहे अप्पांना! ते कचेरीबाहेर येऊन आनंदभरांत शिरडीकडे तोंड करून व बाबांचें नांव घेऊन नाचूं लागले. म्हणाले, 'बाबा! केवढी तुमची माझ्यावर कृपा! माझा कल्पवृक्ष तुम्हीच. मी जी जी इच्छा केली ती तुम्ही पूर्ण केली. भक्तांचें कोडकौतुक तुम्हींच पुरवावें. माझ्या अब्रूवर केवढा घाला आला होता! मी धुळीस मिळालों असतों! तुम्हीच केला बचाव माझा!'

आपलें कामकाज संपवून अप्पा कुळकर्णी दुसऱ्या दिवशीं शिरडीस येतांच बाबांच्या दर्शनासाठीं गेले व त्यांना साष्टांग प्रणिपात करून घडलेली सारी हकीगत त्यांना निवेदन केली. ती ऐकून घेऊन बाबा म्हणाले, 'असें त्यांत मी कांहीं केलें नाहीं! कर्ता करविता परमेश्वर आहे. आम्हीं काय करणार! भगवंत आपल्या भक्तासाठीं अशक्य गोष्टी शक्य करून दाखवीत असतो. ही सारी त्याची लीला आहे. आपण त्याच्यावर श्रद्धा ठेविली पाहिजे!'

(अपूर्ण)

****************************************************

**माणुसकी म्हणजे मानवाच्या गळ्यांतील बहुमोल मोत्यांचा कंठा ! माणुसकी प्रगट करून ह्या मानाचा कंठा धारण करण्याचे प्रसंग आपल्या आयुष्यांत हरघडी येतात; परंतु आपण ते प्रसंग पायांखालीं तुडवितों. सौराष्ट्राचे राजा देपाळ म्हणजे माणुसकीचा पूर्णावतार होते. त्यामुळें जेथें जेथें त्यांचीं पावलें पडलीं, तेथें तेथें मोत्यांच्या राशी आढळून आल्या ! केवढें पुण्य त्यांच्या गांठीशीं होतें !**

# माणुसकीचीं मोत्यें !

***************** पु. बा. कुळकर्णी *******************

जसा महाराष्ट्र तसा सौराष्ट्र. महाराष्ट्रांत पूर्वी शाहीर होऊन गेले. त्याचप्रमाणें सौराष्ट्रांत शाहिरी पद्धतीचे पोवाडे करून गाणारा चारण नांवानें ओळखला जाणारा एक काव्यगायकवर्ग होऊन गेला. त्यांच्यामुळें पूर्वकालीन इतिहास थोडाफार अवगत होतो. सौराष्ट्रांतील एका गांवीं चारण कुळांत जन्माला आलेला, परंतु शेती मातीवर निर्वाह करणारा एक बागेदार चारण होऊन गेला. तो लिहायला वाचायला शिकला नव्हता. वडिलार्जित जमीन होती ती कसायची, खूप मेहनत करायची आणि उदरनिर्वाह करायचा. त्या आपल्या कामांत तो कधीं कसूर करीत नसे.

पावसाचा मोसम सुरू व्हायला फार थोडा कालावधि राहिला होता. शेतकरी पावसाची वाट मोठ्या उत्कंठेनें पहात असतात. तत्पूर्वी त्याच्या स्वागताची जरूर ती तयारी करीत असतात. शेत नांगरायचें तर बैलाची जोडी, नांगर वगैरे आयुधें सज्ज ठेवावीं लागतात, शेतीच्या उत्पन्नावर सारें वर्ष ढकलायचें असतें. या शेतकरी चारणाजवळ जरुरीपुरते दोन बैल होते. त्यांची शक्य तेवढी काळजी त्यानें घेतली होती; परंतु ऐन मोसमाच्या वेळीं त्यांपैकीं एक बैल दगावला ! गरीब शेतकऱ्याच्या वाट्याला ऐन प्रसंगीं आलेली ती मोठ्यांत मोठी आपत्ति होती. काय करणार ? 'आलिया भोगासी असावें सादर.' पाऊस केव्हां कोसळूं लागेल हें सांगतां येणें कठीण होतें. बिचाऱ्याची धांवपळ झाली. दुःखीकष्टी झाला. शेजारीपाजारी सगेसोयरे, मित्र, यांपैकीं त्यानें कोणी ठेविलें नाहींत. एक बैल घेण्यापुरते पैसे त्याला हवे होते. धनिकांच्या घरीं जाऊन व्याजानें पैसे मिळविण्याचे प्रयत्न करून पाहिले; परंतु सर्व ठिकाणीं निराशाच पदरीं पडली. काय करावें सुचेना. सुन्न होऊन घरीं आला.

१।२ दिवस त्याच स्थितींत गेले. आकाशांत मेघांचा गडगडाट सुरू झाला, विजा चमकूं लागल्या आणि त्याबरोबर चारणच्या मनांत कालवाकालव सुरू झाली. प्रसंगीं कोणी उपयोगी पडला नाहीं. शेजारचे शेतकरी नांगरणी करण्यासाठीं गाणीं म्हणत

घराबाहेर पडूं लागले. त्यांच्या घरांतील बायका त्यांच्या न्याहारीच्या तयारीस लागल्या. परंतु या चारणाच्या घरांत मात्र निराशेचा काळोख पसरलेला होता.

## ईश्वर मार्ग सुचवितो

संकट ओढवलें म्हणजे ईश्वर कांहीं ना कांहीं मार्ग सुचवितो. चारणाच्या संकटप्रसंगीं धावून येण्याची प्रेरणा एकालाहि झाली नाहीं, तरी त्याची बायको धनबाई नवऱ्याची चिंता जाणून पुढें सरसावली. तिच्याजवळ काय होतें? धनदौलत नव्हती तरी ती माणूस होती. माणुसकीची धनदौलत तिच्याजवळ होती. शेताची नांगरणी तर झाली पाहिजे. एका बैलाची उणीव भासत होती. ती भरून काढण्यासाठीं ती पुढें आली.

नवऱ्याला उद्देशून ती म्हणाली, 'कसली चिंता करायची? मी आहें ना? बैलाऐवजीं मला जुंपा जोताला आणि शेताची नांगरणी करा. असं घरांत स्वस्थ बसून कसं चालेल? चला! कांहींएक विचार करूं नका यावेळीं!'

किती धीर वाटला त्या बोलण्याचा त्या भांबावलेल्या शेतकऱ्याला! बायकोच्या अंगांत बैलाचें बळ संचारलें तसेंच त्याच्याही शरिरांत संचारलें.

काम वेळेवर पार पडलें पाहिजे. कोण काय म्हणेल याची त्या चारणाला पर्वा वाटत नव्हती. एक बैल, आपली बायको व जोताचें साहित्य घेऊन तो घराबाहेर पडला. एका बाजूला बैल व दुसऱ्या बाजूला बायको अशी ही जोडी जुंपली गेली. शेताची नांगरणी सुरू झाली.

बैल आणि बायको! ही का जोडी झाली! परंतु अडचणींत सांपडलेल्या त्या शेतकऱ्याला आपल्या शेतीच्या कामापुढें कसलाही विचार सुचत नव्हता. काम वेळेवर झालें पाहिजे. माझ्या कामाच्यावेळीं कोणीही माझी दयामाया केली नाहीं. जीव मुठींत घेऊन बायको पुढें आली व तिचा उपयोग करून घ्यावा लागला. माझा तरी काय दोष! अशा रीतीनें तो चारण आपलें समाधान करून घेत होता.

सूर्यनारायण डोकीवर आला. मध्यान्हाची वेळ झाली तरीही नांगरणीचें काम चालू होतें. बिचारी धनबाई अगदीं थकून भागून गेली होती. तिच्या सर्वांगांतून घामाच्या धारा लागल्या होत्या. परंतु सारा त्रास ती निमूटपणें सहन करीत होती. जितकें काम उरकून घेतां येईल तेवढें उरकून घ्यावें, ही तिच्या नवऱ्याची दृष्टि होती. कामापुढें त्याला दुसरें कांहीं सुचत नव्हतें. परिस्थितीनें तो कठोर बनला होता.

## देव हळहळला!

त्याला नाहीं दयेचा पाझर फुटला, तरी देवाची नजर सर्वांवर असते. तो कृपेचा सागर. त्याला त्या गरीब मुक्या माउलीची करुणा नाहीं आली तरच नवल! त्या कठोर मूक तपश्चर्येनें देव तळतळला—हळहळला!

त्याचवेळीं बाजूच्या रस्त्यानें राजा देपाल हे अवघ्या १।२ शिपायांसह सभोंवार पहात चालले होते. शेतांतील तें विचित्र दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें. राज्यांत कुठें काय चाललें

आहे हें पहात साध्या वेत्रांत फिरण्याची त्यांना संवय होती. पुण्यवान् प्राणी होता तो!

राजानें अनेक शेतकरी व बैल जुंपलेलीं जोतेंहि अनेक पाहिलीं होतीं; परंतु एक बाई व एक बैल जोडीनें जुंपलेले असें विचित्र जोत त्यानें साऱ्या हयातींत कधीं पाहिलें नव्हतें. त्यामुळें तें दृश्य तो तटस्थतेनें व आश्चर्यचकित मुद्रेनें पहातच राहिला. त्याचें अंतःकरण द्रवलें. राजा कसला तो? करुणासागर देवच होता म्हणा ना. एक शिपाई बरोबर घेऊन राजा त्या मळ्यांत गेला व शेतकऱ्याला क्षणभर थांबण्याची विनंती करून म्हणाला, 'भल्या माणसा! जमीन नांगरण्याचा हा काय विचित्र प्रकार चालविला आहेस? बैलाबरोबर कोणी बापडीमाणसाला आजवर जुंपली आहे काय रे? कुठून आठवली ही दुर्बुद्धि तुला? कांहीं दया माया आहे कीं नाहीं अंतःकरणांत तुझ्या?'

'होय. मला दयामाया नाहीं खरी!' तो शेतकरी म्हणाला,—'काय सांगूं बाबा तुम्हांला? दयामाया करणारा व माझें दुःख जाणून घेणारा मला एकही माणूस सांपडला नाहीं. त्यामुळें माझ्या अंतःकरणांतही दयेचा लवलेश राहिलेला नाहीं. माझा एक बैल मेला. अनिवार दुःख झालें मला. घरोघर हिंडलों चार पैशासाठीं; परंतु कोणी नाहीं केली माझी दया! सारे लोक माझ्याशीं बेपर्वाईनें वागले. माझ्या अंतःकरणांतील दयामाया त्यामुळें साफ आटून गेली आहे! बैल नाहीं तर शेती नाहीं. शेती नाही तर अन्नधान्य नाहीं, आणि धान्य नाहीं. तर उपासमार! माझ्या बायकोनें हें जाणलें व त्या मुक्या जनावराबरोबर मुक्याचें व्रत घेऊन ती राबते आहे बैलप्रमाणें या शेतांत!'

### त्या माऊलीची कर सुटका

'समजलों, मी तुझं सारं तत्त्वज्ञान! माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. तुला एक बैल हवा आहे. मी तो आतांच आणून देतों, परंतु या माउलीची सुटका कर एकदांची!' राजा म्हणाला.

परंतु त्या शेतकऱ्याचा या सांगण्यावर कांहीं केल्या विश्वास बसेना. राजानें वाटेल तेवढे पैसे देऊन तावडतोब एक चांगला धट्टाकट्टा बैल आणण्यासाठीं आपल्या शिपायास पाठवून दिलें व म्हणाला, 'सोड आतां तरी त्या बाईला. येईल बैल थोड्याच वेळांत. त्याची चिंता नको.'

त्या शेतकऱ्यानें राजाच्या बोलण्याकडे लक्ष न देतां आपलें नांगरणीचें काम तसेंच चालविलें. त्याला विश्वास वाटेना. सर्व ठिकाणीं त्याची निराशा झालेली होती. त्याला विश्वास कां वाटावा?

राजा पराकाष्ठेचा दुःखी झाला. बैलाशीं मनोभावें सहकार करणाऱ्या त्या बाईबद्दल त्याचें अंतःकरण दयेनें भरून गेलें होतें. तिचे ते हाल त्याच्यानें पहावत नव्हते. शेतकरी ऐकत नाहींसें पाहून राजा दीनवाणीनें म्हणाला, 'भल्या गृहस्था! अरे, बैलाचें काय घेऊन बसला आहेस? आत्तां येईल बैल! सोड पाहूं तिला. तिचे हाल पहावत नाहींत रे माझ्यानें!'

'अहाहा! दया वाटते ना तुला तिच्याबद्दल! मग बैल येईपर्यंत तिच्याऐवजीं तूंच कां नाहींस जोताला जुंपून घेत? कोरडी सहानुभूति दाखविणारे आजवर मी पुष्कळ पाहिले आहेत!'

'असें होय! मग सोड पाहूं तिला! ही पकड माझी मान आणि बांध तुझ्या जोताला!'

राजानें आपली मान पुढें केली. घनबाईची सुटका झाली आणि तिच्या जागीं राजाला जुंपून नांगरणीचें काम पूर्ववत सुरू झालें.

दोन फेऱ्या घालून झाल्या असतील नसतील तोंच एक धट्टाकट्टा बैल घेऊन राजाचा शिपाई धापा टाकीत तेथें येऊन पोहोंचला.

बैलोबाशीं सहजरीतीनें सहकार करणारें तें राजवैभव पाहून शिपायाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं. तात्काळ राजाच्या मानेवरील जूं खालीं उतरलें व तें बैलाच्या मानेवर जाऊन बसलें.

## राजाला कांहीं वाटलें नाहीं

त्या चारण शेतकऱ्याची गरज भागली. राजाची मनकामना पूर्ण झाली; आणि घनबाई पुढील त्रासांतून बचावली. घडलेल्या प्रकाराबद्दल देपाळ राजाला कांहीं वाटलें नाहीं. क्षणोक्षणीं सत्कृत्यांची माळ गुंफणाऱ्याला त्याचें काय वाटायचें? इतरांना त्याचें नवल. शेतकऱ्याचा हंसतमुखानें निरोप घेऊन राजा तेथून निघाला.

दिवसांमागून दिवस लोटत गेले. चारण शेतकऱ्याचें शेत ज्वारीच्या भरगच्च कणसांनीं प्रफुल्लित झालें. जिकडे तिकडे कणसेंच कणसें! परंतु एका मळ्यांतील कांहीं भागावर एकही रोप उगवलें नव्हतें; मग कणसें कुठून येणार? सारें शेत भरगच्च पिकानें हंसत असतां तेवढाच कोपरा कोरा करकरीत कसा राहिला? शेतकरी स्वतःशींच विचार करीत होता. बैलाची खैरात करणाऱ्या एका वाटसरूस थोडा वेळ वेठीस धरलें होतें! त्याचाच तर हा प्रताप नसेल ना? दुर्दैवी बिचारा!

अशा विचारांत शेत कापून, मळून झालें. मोत्याप्रमाणें तेजस्वी व पाणीदार ज्वारीनें सारें घर भरून गेलें. घरांत लक्ष्मी आली. केलेल्या कष्टाचें भरपूर फळ पदरांत पडल्याबद्दल शेतकरी व त्याची बायको आनंदांत होतीं. इतक्यांत ज्या जमिनीवर कांहीं उगवलें नाहीं ती जमीन खणून तरी पहावी, असें त्या शेतकऱ्यास वाटूं लागलें.

ज्या भागांत रोप वाढलें नाहीं तो भाग चारण शेतकऱ्यानें खणून पाहिला तों काय? त्याच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. खरीखुरी तजेलदार व टपोरी मोतीं इतस्ततः विखुरलेलीं आढळून आलीं! कोणाला नाहीं आश्चर्य वाटणार? चांगलीं टोपलीभर मोत्यें त्यानें जमा केलीं. राजाचीं पावलें ज्या ज्या ठिकाणीं उमटलीं त्या भागांत मौल्यवान् मोत्यें उगवलीं.

केवढा पुण्यवान् प्राणी असला पाहिजे हा! तो चारण पश्चात्तापानें स्वतःशींच पुटपुटत होता. अशा पुण्यवंताला मी जोत्याला जुंपलें! कोण बरें असेल तो व कुठें

मला त्याची भेट होईल. तीं टपोरीं मोत्यें म्हणजे त्यांची कमाई. तीं त्यांना देऊन टाकलीं पाहिजेत.

## माणुसकीच्या पोटीं मोत्यांचा जन्म

चारण बेचैन झाला. सैरावैरा फिरूं लागला. शेवटीं त्या पुण्यवंताचा पत्ता लागला एकदांचा. ज्यानें आपल्या प्रजेच्या कल्याणासाठीं कांहीं करायचें ठेविलें नाहीं. त्या लोकप्रिय राजाला—देपाळाला आपण जोताला जुंपलें आणि त्यानें भूतदयेनें प्रेरित होऊन निमूटपणें जुंपून घेतलें ! केवढी ही माणुसकी ! त्या माणुसकीच्या पोटीं मोत्यांचा जन्म झाला.

चारणच्या डोक्यांत चक्क प्रकाश पडलेला होता. त्यानें आपल्या बायकोला सारी हकीकत सांगितली व म्हणाला, 'भरघोस ज्वारीच्या रूपानें आपणास यंदा भरपूर मोत्यांचा लाभ झालेला आहे. तीच आपली दौलत. आणि या टोपलींतील मोत्यांचा मालक म्हणजे राजा देपाळच होय. तीं त्यांची त्यांना देऊन टाकून मी त्यांची क्षमा मागून येतों. त्याशिवाय मला अन्न गोड लागणार नाहीं.'

मोत्यांनीं भरलेली टोपली घेऊन तो चारण देपाळ राजाच्या राजवाड्यांत गेला. तो अशिक्षित असला तरी जातीचा चारण होता. त्याला काव्यस्फूर्ति झाली. राजापुढें मोत्यांनीं भरलेली टोपली ठेरून व साष्टांग प्रणिपात करून तो म्हणाला, ' जो जानत तुझ हाथ सांचा मोती निपजे। बघरावत दिनरात देव तने देपाळ दे ॥ '

' हे देवतुल्य देपाळ राजा ! तुझी पावलें जेथें जेथें उमटतील तेथें तेथें मोत्यें उगवतील हें जर मला अगोदरपासून माहीत असतें, तर मी रात्रंदिवस तुला कामास जुंपून तुझा भरपूर उपयोग करून घेतला असता ' असें म्हणून त्यानें समोर ठेवलेली टोपली उघडली. ती मोत्यांनीं भरलेली पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. नंतर सारी घडलेली हकीगत तेथील लोकांस सांगून त्या शेतकऱ्यानें राजाजवळ क्षमेची याचना केली व कृपादृष्टि ठेवण्याबद्दल विनंती केली.

राजा म्हणाला, ' हीं मोत्यें तुझ्या शेतांत सांपडलीं, तेव्हां त्यांचा मालक तूंच आहेस. तुझा माणुसकीवरचा विश्वास उडालेला होता. सारेच कांहीं एका माळेचे मणी नसतात. जगांत माणुसकीचा अगदींच कांहीं नायनाट झालेला नाहीं. मी माझें कर्तव्य बजावलें, त्यापेक्षां अधिक कांहीं केलें नाहीं. दुसऱ्याच्या उपयोगी पडणें, दुसऱ्याची गरज भागविणें व अशा रीतीनें दुसऱ्यांचा दुवा संपादन करणें, यासाठीं तर आमचा जन्म आहे. '**फुलें उधळावीं ! तुज म्हणुनी जन्मप्राप्ति**' हा चरण आम्हीं आमच्या अंतःकरणावर कायमचा कोरून ठेविला पाहिजे. जा ती टोपली घेऊन आणि सांगितलें तेवढें कर म्हणजे झालें ? "

देपाळ राजाची माणुसकी व त्याची प्रखर कर्तव्यनिष्ठा यांचा परिणाम त्या चारणावर झाल्याशिवाय कसा राहील ? त्यानें आपलें जीवन तो संदेश परोपरीनें झेलण्यांत घालविलें.

( श्री. चिमणलाल व्यास यांच्या एका लघुकथेच्या आधारें साभार )

बाबा तुमची श्रीमंती किंवा तुमच्या पूजेचा थाटमाट पहात नाहींत. त्यांचें सारें लक्ष असतें तुमच्या अंतःकरणांतील निर्मळ भक्तिभावाकडे !

# जेथें भाव अपरंपार—

लेखक : त्रिमूर्ति

१ ) न लगे मज पूजा संभार । षोडश वा अष्टोपचार ।
जेथें भाव अपरंपार । मजला थार ते ठायीं ॥ अ. १३–१३

२ ) विना अभिमान अणुप्रमाण । मज हृदयस्था यावें शरण ।
होईल अविद्या तात्काळ निरसन । श्रवण कारण संपेल ॥ अ. ४४–१७

३ ) जेथें भक्ति श्रद्धान्वित । तयाचा मी नित्यांकीत ।
ये अर्थी न व्हावें शंकीत । इतरत्र अप्राप्त मी ॥ अ. २–८३

—श्रीसाई सच्चरित्र

श्रीबाबांची पूजा व भक्ति कशी करावी हें वरील ओव्यांत स्पष्ट केलें आहे. लौकिक दृष्टया आपण बाबांची जी पूजा करतों ती ठीक आहे, त्यांत कांहीं वावगे नाहीं. परंपरेनें चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें बाबांची पूजा केल्यानें व भक्तीचा एकंदर थाट उडवून दिल्यानें बाबा प्रसन्न होतीलच असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. ऐश्वर्य व विधियुक्त पूजा हें बाबांच्या प्रसन्नतेचें गमक नाहीं. पुजेंत कोणती गोष्ट बाबांना प्रिय आहे, भक्तांनीं त्यांना काय अर्पण करावें हें बाबांनीं वरील ओव्यांत स्पष्ट सांगितलेलें आहे. त्यांत कुठलीहि शंका अगर वादावादी त्यांनीं ठेवलेली नाहीं. मोठी उत्कृष्ट आरास, पुष्कळसे हार, उत्तमोत्तम नैवेद्य, रात्रंदिन दीप वगैरे असलेली वैभवशाली पूजा इच्छा असेल तर करा, पण मला मात्र केवळ त्यांत महत्त्व वाटत नाहीं, तुम्हांस वाटेल तर करा तशी पूजा. माझा मात्र तसा मुळींच आग्रह नाहीं. शक्य असेल त्यांनीं सर्व प्रकारें ऐश्वर्ययुक्त अशी माझी पूजा आपल्या भावनेखातर करावी, त्याला माझी ना नाहीं. पण हें लक्षांत ठेवा कीं, मला तुमच्या त्या सोन्याचांदीच्या भांड्यांतील साहित्याची मुळींच जरूरी नाहीं. या गोष्टी बघून मी खूष होईनच असें समजूं नका.

## मी काय पहातों ?

माझें लक्ष या गोष्टीकडे नसतें. तुम्ही माझी पूजा करूं लागला कीं मी तुमच्या अंतःकरणाकडे पहात असतों. तें किती स्वच्छ आहे, त्यांत मी किती ठसलों आहे तें मी पहातों. स्वच्छ अशा अंतःकरणांत मला जितकी जास्त जागा भक्तानें दिली असेल तितका

मी त्यावर प्रसन्न होतों. स्वच्छ—अहंकार विरहीत अंतःकरणानें माझ्या चरणीं येणारा भक्त मला प्रिय आहे. तो मला जवळचा आहे. अशा भक्तानें मला गंधाचा टिळा न लावतां वा फुलाची पाकळीही न वाहतां श्रद्धापूर्वक नुसता नमस्कार केला तर ती त्याची पूजा तुमच्या लाखों पूजांच्या मोलाची मी समजतों. तुमच्याकडून मला हार व पेढे नकोत. ते मी तुम्हास देईन. तुम्ही मला काय देऊं शकणार ? माझेंच मला देणार ना ? त्यांत काय मला चव ? तुमचें अंतःकरण मला पाहिजे. त्यांत माझी छबी कोरा. ती जितक्या सफाईनें कोराल तितका मी तुमचा व तुम्ही माझे. गुळामागें जसा मुंगा तसा मी तुमच्यामागें असेन.

जेथें भाव अपरंपार । मजला थार तें ठायीं, ही बाबांच्या पूजेची गुरुकिल्ली आहे. ती आपण वापरली पाहिजे, निष्ठेनें व आर्ततेनें बाबाकडे गेलें कीं काम झालें. भरतीच्या लाटांची ओढ चंद्राकडे असते. तशी अंतःकरणाची ओढ बाबांकडे पाहिजे. मग लौकिक-दृष्ट्या जशी जमेल तशी पूजा खुशाल करा.

### बाबा दीनदुबळ्यांचे

बाबांनीं आपल्या पुजेंत कमालीचा साधेपणा व कर्मांत कमी आडकाठ्या ठेवल्या आहेत; बाबा व्यवहारी (Practical) होते. अव्यवहार्य गोष्टी त्यांनीं कधींच सांगितल्या नाहींत. सामाजिक परिस्थिति डावलून अध्यात्माची वाटचाल करणें सामान्य जनतेला शक्य नाहीं हें ते जाणून होते. आपले बहुसंख्य भक्त पैशानें गरीब आहेत हें बाबा विसरूं शकत नव्हते. परंपरेनें भक्तिमार्गांत रूढ झालेले पूजादि प्रकार परंपरेच्या पकडींत असलेल्या व पैशानें, वेळेनें व जागेनें गरीब असलेल्या भक्तांना पेलणार नाहींत हें बाबांनीं ओळखलें होतें. ऐश्वर्ययुक्त अशा श्रीमंती पूजा गरिबांना परवडतील काय ? एक वेळ जेवण्याची मारामार त्यांनीं काय करावें ? अहोरात्र पोटासाठीं काबाडकष्ट करणाऱ्यांनीं वेळ कोठून आणावा ? देव काय श्रीमंतांच्या मालकीचा ? बाबा तर गरिबांचे, दीनदुबळ्यांचे, अडल्यानाडल्यांचे कनवाळू, गरिबींतल्या गरीबालासुद्धां आपण साध्य असलों पाहिजे, ही त्यांची मनीषा. आजपर्यंत देवळांत स्थित केलेला देव तेथून काढून त्याला गरीबाच्या झोंपडींत, जनतेच्या जीवनांत खेळायला लावण्याची बाबांची इच्छा. यास्तव बिनखर्चाच्या व लाखमोलाच्या गोष्टी करण्यास बाबांनीं सांगितल्या आहेत. गरीबाच्या झोंपडींत, टांग्यांत, माती वाहणाऱ्या लॉरींत बाबा असलेले आपण पहातों. कारण, 'जेथें भाव अपरंपार—'

### आजची बहुमोल देवपूजा

बाबांच्या भक्तींत आणखी कांहीं गोष्टी महत्त्वाच्या आहेत. जे संसारी आहेत. त्यांनीं संसार सोडून देण्याची जरूरी नाहीं. ईश्वरप्रणित कर्तव्यें करणें ही आजची देवपूजा आहे. आपलीं कामें, आपलीं कर्तव्यें, आपल्या जबाबदाऱ्या टाकून देवळाकडे धांव घेण्याची वा अरण्यांत जाऊन बसण्याची जरूरी नाहीं. संसारांत राहून परमार्थ साधणें हेंच आजच्या काळांत उचित आहे. तो कसा साधावा हें बाबांनीं दाखवून दिलें आहे.

बाबांचा हा मार्ग सोपा आहे, त्यांत दोन गोष्टी येतात. एक स्वकर्तव्याचरण व दुसरी भक्ति—मुख्यतः नामस्मरण. आपल्या वाट्यास आलेलीं कामें समाधानानें करावींत. समाधान हा आत्मिकबलाचा पाया आहे. कोणतेंही काम हलकें नाहीं. कौटुंबिक माणसानें आपल्या कुटुंबासंबंधीं कर्तव्यें करणें हा सेवाधर्म आहे. कर्तव्य पार पाडतांना आपण अप्रत्यक्षपणें ईश्वराचीच सेवा करीत आहोंत अशी भावना असावी. कुटुंबाचें पालनपोषण वा कल्याण आपण करीत नसून ईश्वर करीत असतो. त्याच्या योजनेप्रमाणें सर्व घडत असतें. आपण केवळ त्यांचे एजंट आहोंत, भारवाहक आहोंत. माझ्याजवळ जें आहे, तें माझ्या कुटुंबांतील माणसांसाठीं, माझ्या अनेक बांधवांसाठीं ईश्वरानें माझ्या हवालीं केलें आहे. यास्तव त्याचा उपयोग या सर्वांच्या हितासाठीं केला पाहिजे. जें मी करीन त्यांत इतरांचेंहि चांगलें साधलें पाहिजे. या भावनेनें संसारांतील कामें करीत राहिल्यानें आपोआप आपल्या हातून देवपूजा घडते. मात्र जरूर त्या पेक्षां जास्त आसक्ति कशाबद्दलही बाळगूं नये. अनासक्तिपणें नित्याची कामें करावींत. अशा प्रकारें संसार करीत राहणें ही बहुमोल देवपूजा आहे. संसारांत पडून परमार्थ साधण्याचा हा मार्ग आहे. नाथांनीं याच वृत्तीनें परमार्थ केला.

## सर्वांत सोपा उपाय

अनासक्तीयोग कठीण आहे हें खरें. संसारी माणसास तो पूर्ण साध्य होणें अशक्य आहे. असें असलें तरी तो योग संसारी माणसास बराचसा साध्य करून घेतां येईल. यासाठीं सोपा उपाय म्हणजे नामस्मरण. नामस्मरणानें आपल्या भक्तीचें वर्तुळ जसजसें वाढत जाईल, तसतसा निरनिराळ्या वासनांचा क्षय आपोआप होऊन चित्तशुद्धी होईल. त्यासाठीं मुद्दाम नाकें दाबण्याची जरूरी नाहीं. नामस्मरणाचा मार्ग संथपणें चालणारा व कालावधि घेणारा असला तरी तो खात्रीचा, बिनखर्चाचा व संसारी माणसाला पेलण्यासारखा आहे. कुठेंतरी स्थगित होणाऱ्या सशाच्या वेगापेक्षां धिमे धिमे ध्येय गांठणारा कासवाचा वेगच संसारी माणसाला तारक आहे. म्हणूनच स्वकर्तव्य व त्याबरोबरच नामस्मरण हा मार्ग बाबांनीं सांगितला आहे. यास्तव श्रीसाईसच्चरितकार गर्जना करितात कीं—

म्हणवूनि देह प्रपंचाला सोपा । चित्त साईचरणीं समर्पा ।
मग तयाची होईल कृपा । उपाय सोपा हा एक ॥

समर्थ रामदास सर्व कलांत प्रवीण होते. एकदां शाहिरांचें व गवयांचें गर्वखंडन त्यांनी मोठ्या युक्ति प्रयुक्तीनें कसें केलें पहा !

# समर्थांचें सामर्थ्य

**शाहिरांचें गर्वहरणः—**

कांहीं शाहीर गांवोगांवीं जाऊन आपलीं कवनें गाऊन दाखवून लोकांचें मनोरंजन करीत. एकदां जयपत्रें घेत घेत एका पौष महिन्यांत ते चाफळास येऊन पोचले. ते चाफळासही जयपत्राचा हट्ट धरून बसले. समर्थांनीं त्यांना सांगून पाहिलें कीं, 'असला अहंकार चांगला नव्हे. गावयाचें तें गा. मंडळींची करमणूक करा. मिळेल तें द्रव्य घ्या आणि आनंदानें जा.' पण ते ऐकेनात. 'बरें तर, तुम्ही सवाल टाकतां कां आम्ही टाकूं ?' असें त्यांना समर्थांनीं विचारतांच, 'तुम्ही आधीं पुसा, आम्ही तुमच्या प्रश्नाचा परिहार करूं आणि मग आम्हांस काय पुसावयाचें तें पुसूं,' असें शाहीर म्हणाले. समर्थांनीं लागलीच डफ सज्ज करण्याची, झालर, तुणतुणी घेण्याची कल्याणादि शिष्यांना आज्ञा केली. सर्व सिद्धता होतांच श्रीसमर्थ सरसावून बसले आणि डफ गाणें गाऊं लागले. तें गाणें त्यावेळीं श्रीसमर्थांच्या तोंडून सर्व भाग्यवंतांनीं ऐकलें आणि आज आपण तें नुसतें वाचून कां होईना पण अहंता सोडून श्रीसमर्थचरणीं लीन होऊन रहावयाचें आहे.

किती पृथ्वीचें वजन । किती अंगुळें गगन । आहे सिंधूचें जीवन किती टांक ॥ १ ॥
वायुसरिसे उडती । सांग अणुरेणु किती । लक्ष चौऱ्यायसी उत्पत्ति । रोम किती ॥ २ ॥
किती आकाशींचा वारा । किती पर्जन्याच्या धारा । तृण भूमीचें चतुरा ।
किती आहे ॥ ३ ॥
सर्व सरितांची वाळू । सप्त सागरीं केवाळूं । किती आहे ती हरळु । सांग मज ॥ ४ ॥
बीज वडीं आणि पिंपळीं । किती आहे भूमंडळीं । सर्व धान्याची मोकळी ।
संख्या सांग ॥ ५ ॥
अठरा भार वनस्पति । भू मंडळीं पानें किती । फळें फुलें मज प्रति । सांग आतां ॥६॥
जें जें पुसिलें म्यां तुज । तें तें सांग आतां मज । अनंत ब्रह्मांडीं बेरीज । किती जाली ॥७॥
सांग माझें डफगाण । नाहीं तरी सोडी जाण पण । देह बुद्धीचें लक्षण । सोडवीन ॥८॥
रामदासाच्या विनोदें । सोडा अहंतेचीं ब्रीदें । मग स्वरूपीं स्वानंदें । सुखी राहा ॥ ९ ॥
श्रोतीं व्हावें सावचित । आतां सांगतों गणित । सर्व आहे अगणित । सत्य वाचा ॥१०॥

हें गणित शाहीरांना कोठून सांगतां येणार ? ते निरुत्तर झाले. त्यांचा गर्व गळाला ते समर्थांना शरण आले. समर्थांनीं त्यांना दुर्मुजी रुमाल देऊन संतुष्ट केलें.

## श्रीसमर्थांची गायनकला

एकदां एक गायक बरोबर आपले साथकरी घेऊन जयपत्र मिळवावें व त्याजबरोबर द्रव्य मिळावें म्हणून श्रीसमर्थांकडे आला. समर्थांनीं कल्याणाच्या हातीं वीणा देऊन त्यास गावयास सांगितलें. कल्याणांनीं मोहन मोहक आलाप काढला. तो स्वर गायकाच्या हृत्कमळीं बिंबला आणि तो तात्काळ मूर्च्छित होऊन पडला. त्याच्याबरोबर आलेले साथकरी हाय हाय करूं लागले. श्रीसमर्थांचें हृदय कोमल होतें. त्यांना त्या गायकाचा थोडाच अंत पहावयाचा होता ! त्यांनीं वेणाबाईंस उतारांचें गाणें गाण्याची आज्ञा केली. तें गाणें ऐकतांच तो शुद्धीवर आला. त्याचा गर्व उतरला. तो समर्थांना शरण आला आणि कृतार्थ झाला. असेच जे येत ते कृतार्थ होऊन जात.

गायनकलेंत श्रीसमर्थ किती निपूण होते हेंहि या गोष्टीवरून कळतें.

परेची पश्यंती । ध्वनी मध्यमा नाद । नादेंचे जाले शब्द । शब्दांचे भेद ॥ १ ॥
गगनीं भरला पवन । जाइलें तान । तानीं विगुंतलें मन । मनमोहन ॥ २ ॥
मनाची होती उन्मत्ती । विवेकीं जनीं । जनी पुसावें सज्जनीं । तत्त्वनिर्शनीं ॥३॥
संसारीं व्हावें उदास । सज्जनीं वास । वासें विवेकें अभ्यास । सांगतो दास ॥ ४ ॥

## पूजन

हृदयाचें मंदिर केलें, आंत सद्गुरु स्थापिले ।
निश्चय उंबरठा त्यासि, तेणें रोखिलें कुमतीसी ॥
जीव शिवाचा तो तंटा, तोच दणाणली घंटा ।
सुबुद्धि ती दासी उभी, चरणसेवे काळा नच भी ॥
परोपकाराचा अंकुर तेंचि झळके उंच शिखर ।
वर फडकते पताका, गुरुभक्ति माझी भाक ॥
शतपाय चीरे दीले, मग देऊळ दृढतर केलें ।
वासनेचें धुपारणें, जाळून घालूं लोटांगणें ॥
जरी भावें देवा खाद्य, दंडवत तो नैवेद्य ।
पंचभूतें वेगळीं केलीं, तीच पंचारती तेवढी ॥
दुष्कृतीचें भरलें कणगें, तेंचि हरिचें बाजारबुणगें ।
गंध पुष्पादि अक्षता, मद मत्सर कामक्रोध ॥
ऐशा परी मांडुनि धंदा, मग कैंचि अशुभ बाधा ।
नेणों भक्ति ती नवविध, ज्ञानाविण डोळस अंध ॥



# ज्ञानेश्वर माऊलीचें पसायदान

ज्ञानेश्वरीमध्यें गीतार्थाचें मर्म आपल्या मायबोलींत सांगून श्रीज्ञानदेवमहाराजांनीं भगवंताचें मनोगत व्यक्त केलें; व महाराष्ट्रांतील संस्कृतानभिज्ञ अशा अनंत जीवांना जवळजवळ गेलीं पावणेसातशें वर्षें आपल्या अनुपम वाङ्मयकृतीनें सतत स्फूर्ति देऊन मार्ग दाखविला. त्रिविध तापानें पोळलेल्या असंख्य दीन जीवांना आपल्या ओजस्वी शब्दसामर्थ्यानें मंत्रमुग्ध करून, खडतर अशा संसारी जीवनांत असंग, तसेंच कसें राहावें हें सांगून त्यांना अनायासें शांतीचें शिखर कसें गांठतां येईल तेंहि स्पष्टपणें सांगितलें. त्यांची प्रेमळ वाणी आजही लाखो संतत जीवांना सुख व समाधान देत आहे व पुढेंही यावच्चंद्रदिवाकरौ ती तशीच "अपार जीवजंतूंना" या संसार सागरांतून तारून नेण्यास कारणीभूत होईल यांत तिळमात्र शंका नाहीं.

कवि व रसिक जनांच्या मनाला प्रमुदित करणारा मुमुक्षु आणि साधकांना सुखाची लाखोली वाहणारा आणि संतसत्पुरुषांच्या प्रशांत मनाला आल्हाद उत्पन्न करून त्यांना ब्रह्मपदीं अखंड नाचविणारा असा ह्या अलौकिक ग्रंथ रचून ज्ञानदेवमाउलीनें जगापुढें आनंदाचें 'आवार' मांडलें. ग्रंथाची रचना हेंच 'धर्मकीर्तन' सुखरूपणें शेवटास गेलें. तें केवळ त्यांच्याच कृपेमुळें असें भरत वाक्यांत वर्णन करून व नम्रपणानें पाईकपणा आपल्या पदरीं घेऊन महाराजांनीं आपण केलेल्या वाङ्मयरूपी यज्ञानें प्रसन्न होऊन श्रीगुरूंनीं आपल्यास प्रसाद द्यावा असें मागितलें. तो विषय 'पसायदान' म्हणून अठराव्या अध्यायाच्या शेवटीं आठ नऊ ओव्यांत त्यांनीं लिहिला आहे.

महाराजांनीं पसाय दानांत मागितलें —

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ १७९४ ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ १७९५ ॥
वर्षत सकळ मंडळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ १७९६ ॥
चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणींचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयुषाचे ॥ १७९७ ॥
चंद्रमे जें अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ १७९८ ॥

किंबहुना सर्व सुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजि जो आदि पुरुषीं । अखंडित ॥ १७९९ ॥
आणि ग्रंथो पजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ॥ १८०० ॥

थोडक्यांत या मागण्या अशा ( १ ) दुष्टांचा वाकडेपणा जाऊन ते सरळ होवोत, ( २ ) त्यांच्या अंतःकरणांत सत्कृत्याबद्दल प्रेम उत्पन्न होवो, ( ३ ) सर्व भूतमात्रांमध्यें परस्पर दृढ मैत्री होवो, ( ४ ) पापाचा अंधार नाहींसा होवो, ( ५ ) स्वधर्मरूपी सूर्य उगवून सर्व विश्व प्रकाशमय होवो, ( ६ ) प्राणिमात्रांच्या सदिच्छा पूर्ण होवोत, ( ७ ) सर्वांना संत सत्पुरुषांच्या अखंड संगतीचा लाभ होवो, ( ८ ) त्रिभुवन अद्वैत-सुखानें भरून जाऊन आदिपुरुषाच्या भजनाला सतत लागो, आणि ( ९ ) या ग्रंथावर ज्यांची उपजीविका आहे त्यांना इहपरलोकीं सुख प्राप्त होवो.

वरील सात ओव्यांतील गोडभिक्षा पदर पसरून त्यांनीं विश्वरूपात्मक आपल्या श्रीगुरूंजवळ मागितली. सर्वांचा संसार आपल्याच प्रमाणें सोन्याहून पिवळा व्हावा, इतकेंच नव्हे, तर तो त्यांनीं तसा करावा ही कळकळ त्यांच्या 'पसायदानांत' अभिप्रेत आहे. केवढी त्यांची विशाल दृष्टि आणि केवढें हें त्याचें अद्वितीय विश्वप्रेम !

लहान मुलाच्या
आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध
जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी
सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १
: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं.
दवाबझार, मुंबई २

अर्नाळकर ब्रदर्स
चष्म्यांचे व्यापारी
आमच्या येथें डोळ्यांची मोफत तपासणी करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.
: मालक :
बाबूराव अर्नाळकर
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४
वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# माता मदालसेचा पुत्रांस सदुपदेश

मदालसा ही ऋतुध्वज राजाची राणी. ती उत्तम राजाची उत्तम राणी होतीच, ती उत्तम पत्नीही होती. तिचें मोठेंपण कशांत होतें तर आपल्या मुलांना लहानपणीं अध्यात्माचें बाळकडू पाजून आत्मस्वरूपाची ओळख पटवून देऊन त्यांना जीवमुक्त स्थिति प्राप्त करून देणें यांतच तिचा श्रेष्ठपणा दिसून येतो. ती एक आदर्शमाता होती. तिचा जन्म देखील वैचित्र्यपूर्ण असाच होता. पातालकेतु राक्षसाच्या मायावी कृत्यामुळें ऋतुध्वज राजाच्या पहिल्या मदालसेनें अग्निकाष्ठ भक्षण करून देह विसर्जन केला. यामुळें राजाला वैराग्य उत्पन्न होऊन तो रानावनांत फिरूं लागला. तेथें त्याची कंबल आणि अश्वतर नागांची भेट होऊन त्यांच्याबरोबर त्याची मैत्री जडली. आपल्या मित्राचें दुःख हरण करण्यासाठीं या दोन नागऋषींनीं शिवाराधना करून अगदीं पहिल्याच मदालसेसारखी दुसरी मदालसा श्रीभगवानशंकराकडून प्राप्त करून घेऊन ती आपल्या मित्राला दिली. मदालसा प्रत्यक्ष शंकराचाच अंश असल्यामुळें वैराग्यशील व जीवन्मुक्त स्थितींत होती. प्रारब्धानुसार आतां आपल्याला पुढें जीवन जगावयाचें आहे असें मानून ती ऋतुध्वज राजाबरोबर संसार यात्रा आक्रमूं लागली. त्यांना चार पुत्र झाले. सुबाहु, शत्रुमर्दन, शुभकीर्ति आणि अलर्क.

प्रथम पुत्राच्या नामकरणाच्या वेळेस मदालसा आपल्या पतीला म्हणाली— 'अहो, या नश्वर देहाला नांव ठेवून काय करावयाचें आहे ? मृत्तिका आणि शरीर या दोहोंची योग्यता सारखीच.' यावर राजानें नामकरण व आत्मोन्नति याविषयीं आपल्या पत्नीला माहिती सांगितली. त्याचा परिणाम मदालसेच्या मनावर निराळाच झाला. आपल्या मुलांनीं राज्यशकट हाकण्यापेक्षां—म्हणजे संसारांत पडण्यापेक्षां आत्मोद्धाराचा प्रयत्न करावा, असें तिला वाटूं लागलें. सुबाहू लहान असतांनाच ती त्याला पाळण्यांत घालून झोके देण्याचेवेळीं अध्यात्मपर व निवृत्तिविषयक अंगाई गीत म्हणून त्याला रिझवीत असे. हें तिचें अध्यात्मनिरूपण फारच उद्बोधक आहे.

एके दिवशीं राजा शिकारीला गेला असतां ती आपल्या मुलाच्या पाळण्याजवळ बसून ओव्या म्हणूं लागली,—

'बाळा सुबाहू उगा; रडूं नकोस. आपणच आपल्याला बांधून घेतलेलें आहे. तेव्हां रडून कां शिणतोस बरें ! मनुष्य आपल्या पूर्व-जन्मींच्या संचितानेंच पुन्हां पुन्हां स्वतः मायाजाळांत सांपडतो. म्हणून म्हणतें आतां सावध हो, आणि अंतःकरण स्थिर करून स्वस्थ नीज; पण झोंप घेऊं नकोस. डोळे मिटून घे; पण दृष्टि प्रभूकडे ठेव. शोक करण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण स्वतः ( आत्मा ) मुक्तच आहेस. तूं या भवबंधनांत अज्ञानानें सांपडला आहेस. मोह ही संसारबंधनें अधिक दृढ करितो. हीं मायेचीं बंधनें

तुटणें फार कठीण आहे. त्या बंधनांत तूं सांपडला नाहींस तोंच सावध हो. तूं अद्याप शुद्ध आहेस. पूजा, जन्म पांच पंचकांचा संबंध होऊन झालेला आहे. बाळा सुबाहू, ब्रह्म हें शून्य आहे. आकाश हेंच ब्रह्म. तें सर्वत्र आहे. या ब्रह्मापासून प्रथमतः माया उत्पन्न झाली. त्या मायेनें हें अखिल विश्व निर्माण केलें. आकाशांत वायु निर्माण झाला. वायूपासून तेज उत्पन्न झालें. तेज व वायु यापासून पाणी उत्पन्न झालें; आणि पाण्यापासून सृष्टि निर्माण झाली. या सर्वांस विश्व असें म्हणतात.

हें विश्व मायेचें खेळणें आहे. अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार हे मायेचे उद्गार असून यापासून हा सर्व विस्तार उत्पन्न होतो, आणि त्याचा नाशहि यांपासूनच होतो. शब्द स्पर्श, रूप, रस, व गंध हीं मुख्य पंचतत्त्वें असून या पांचांच्या कमी अधिक प्रमाणानें निरनिराळे गुणभेद प्रकृतीचे ठिकाणीं दृष्टीस पडतात. तसेंच व्यान, उदान, प्राण, समान व अपान असे पांचवायु आहेत. यानाच पंचप्राण म्हणतात. उपप्राणही पांच असून ज्ञानेंद्रियें पांच आहेत. तीं श्रोत, त्वचा, नेत्र, जिव्हा व घ्राण हीं होत. तीं पंचभूतांचीं सूक्ष्मस्थानें आहेत. मुख, हस्त, पाद, लिंग व गुद हीं पांच कर्मेंद्रियें, अशी दहा इंद्रियें असून मनाला अकरावें इंद्रिय समजतात. त्यास ज्ञान आहे व क्रिया आहे म्हणून त्याला ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियापेक्षां निराळें इंद्रिय मानतात. मन हें विषयबद्ध असून तें मनुष्याला एकसारखें चाळवीत असतें.

मनुष्यास जागृति, स्वप्न, निद्रा, गतावृत्ति व तुर्या अशा पांच अवस्था आहेत. विषय, संसार अथवा आत्मज्ञान याविषयीं जें कार्य आपण ज्या अवस्थेंत करीत असतों ती जागृतावस्था होय. जेव्हां आपण जागृतावस्थेंत सुषुप्तावस्थेंतही नसतों, तेव्हां त्या अवस्थेला स्वप्नावस्था असें म्हणतात. जागृतावस्थाही नाहीं, स्वप्नावस्थाही नाहीं, अशी जी अवस्था तिला सुषुप्तावस्था असें म्हणतात. या अवस्थेंत ज्ञान हें मुख्य होय. ही अवस्था श्वासोच्छवासाच्या अभ्यासानें प्राप्त होते. तिचा अनुभव योग्यावाचून इतरांना येत नाहीं. गतावृत्तिवस्था क्वचित्च दृष्टीस पडते. शरीरांतून पंचतत्त्वें व पंच प्राण नाहींसे झाल्यावर शरीर मृत्तिकेसमान होतें. केव्हा केव्हां मृतावस्था प्राप्त झाली असतां देखील हीं तत्त्वें त्या शरीरांत पुन्हां प्रवेश करितात व त्या अचेतन शरिरांत चैतन्य उत्पन्न होतें. या अवस्थेला गतावृत्ती अवस्था असें म्हणतात.

जड देह नाश पावला तरी लिंग देह कायम रहातो. तो अगोचर आहे. या सूक्ष्म लिंग देहास कांहीं काळ सूक्ष्म स्थळीं वास करून भोग भोगावे लागतात. ही जी लिंग देहाची अवस्था तिला तुर्यावस्था असें म्हणतात. या अवस्थेंत चांगले व वाईट दोन्हीं प्रकारचे भोग असतात. हे भोग भोगल्यानंतर पुन्हां ह्या लिंग देहास स्थूल शरिरांत प्रवेश करावा लागतो. पूर्वजन्मांतील संचितावर अवलंबून नवीन देह प्राप्त होतो. पूर्वजन्मींच्या कर्मांचें चांगलें अथवा वाईट फल या नवीन देहास भोगतें लागतें. अशा प्रकारें या आत्म्याचें रहाट गाडगें सतत सुरू असून त्याला चौऱ्याऐंशी योनींच्या चक्रांतून फिरावें लागतें. सहावी उन्मनी नांवाची अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त झाली म्हणजे प्राणी गर्भवासाच्या

दुःखांतून सुटतो. ही उन्मनी अवस्था म्हणजे मुक्ति होय. आत्मा–प्राण हा परमात्म्याचा अंश आहे. तो अंश परमात्म्यात जाऊन मिळणें याचेंच नांव मोक्ष. मोक्ष प्राप्त झाल्यानंतर प्राणी जन्म मरणाच्या त्रासांतून अनायासेंच सुटतो.'

**वासना व कर्म :—**

मदालसा म्हणते, "बाळा सुबाहू, शरीर हें सोळा गुणांचें आहे. पैकीं पंधरा गुण तत्त्वांचे आहेत व एक गुण मनाचा आहे. या पंधरांपैकीं पांच गुण पृथ्वींतील आहेत; चार पाण्यांतील आहेत; अग्नीचे तीन, वायूचे दोन व एक गुण आकाशांतील आहे. तसेंच शरीर हें एक सोळा पाकळ्यांचें पुष्प आहे. अकरा इंद्रियें या अकरा पाकळ्या आहेत व शब्द, स्पर्श रूप, रसवण गंध ह्या पांच पाकळया होत. अशा या शरीराच्या षोडशकला आहेत. जन्मधारणेस व सुखदुःखादि भोगांस कर्म हें प्रधान होय, जसें कर्म करावें तसें त्याचें फळ मिळतें. मनुष्यास जशी वासना–इच्छा–उत्पन्न होते, त्याप्रमाणें त्याच्या हातून कर्मे होतात. इच्छा ही मनापासून होते. यासाठी मनास ताब्यांत ठेवावें म्हणजे तें उच्छृंखल होणार नाहीं व त्यापासून वाईट वासना उत्पन्न होणार नाहींत. मनुष्य वासनेच्या अनुरोधानें कर्म करीत असतो. आत्मा अर्थात चैतन्य आपणांस दिसत नाहीं तथापि तें आहे हें खरें. कारण चैतन्य हें आपण प्रत्यक्ष अनुभवित असतों. चैतन्य हें शरीरांत म्हणजे सर्व अवयवांत असतें आणि सर्व अवयव मिळून देह झालेला आहे. चैतन्याचा सांठा आत्मा हा हृदयांत असतो. चैतन्य हें सर्व अवयवांना या साठ्यापासून मिळतें. आत्मा पहिलें शरीर जीर्ण झालें म्हणजे त्या देहाचा त्याग करून दुसऱ्या नव्या देहांत प्रवेश करतो.'

**आत्म्याचें अमरत्व :—**

मदालसा नंतर म्हणते, 'आत्मा हा अत्यंत सूक्ष्म आहे. तो अगोचर आहे; व घटांतील आकाशाप्रमाणें लिप्त आणि अलिप्त असा आहे. आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. तो शरीर व लिंगदेह यापासून दूर होऊन परमात्म्याच्या स्वरूपात जाऊन मिळतो. जोंपर्यंत शरीरांत चैतन्य आहे, तोंपर्यंत आत्मा शरीरांत असतो. चैतन्य नाहींसें झाल्याबरोबर आत्मा निघून परमात्म्यांत जाऊन मिळतो. या सूक्ष्म आत्म्यास लिंगदेह म्हणून एक सूक्ष्म घर असून या लिंग देहास निराकार असे पंचवीस अवयव आहेत. हे अवयव म्हणजे पंचवीस गुण होत आणि त्या गुण समूहास प्रकृति असें म्हणतात. या पंचवीस गुणांच्या कमीअधिक मिश्रणामुळें प्रत्येकाची प्रकृति भिन्न भिन्न होते. प्रकृतीप्रमाणें सुख अथवा दुःख असणें हेंहि पूर्वकर्मांवरच अवलंबून असतें. मोक्षाचा प्रयत्न न केल्यास चक्राच्या फेऱ्याप्रमाणें कर्मानुरोधानें पुन्हां पुन्हां आत्म्यास चौऱ्याऐंशीं योनी हिंडाव्या लागतात व सुख अथवा दुःख हीं कर्मांचीं फळें प्रकृतीस प्राप्त होतात. तथापि आत्मा हा सुख–दुःखापासून अलिप्त असून तो अक्षय आहे. आधि, व्याधि, जरा, जन्म हीं सर्व स्थूल शरीरास आहेत. सूक्ष्म म्हणजे लिंगदेहास मृत्यूचा व कर्मानुरोधानें मिळणाऱ्या सुखदुःखांचा संसर्ग मुळींच होत नाहीं. आत्म्याचा वास सर्व प्राणीमात्रांचे ठिकाणीं आहे.

विश्व हें जसा एखादा आरसा आपल्यासमोर धरल्यास त्यांत आपलें प्रतिबिंब दिसतें व आरसा दूर केल्यास तें नाहींसें होतें, त्याप्रमाणें आहे. त्यांतील सर्व प्राणिमात्र हीं विश्वरूपी आरशांतील प्रतिबिंबें आहेत. क्षणोक्षणीं प्रतिबिंबें नाहींशीं होत असतात व दुसरीं अनेक उत्पन्नही होत असतात. तथापि आत्मा हा जसाच तसा अमर आहे. तो अविनाशी आहे. तो केवळ निर्गुण व निराकार आहे. त्याला जन्म नाहीं व मृत्यूही नाहीं. त्याला स्थिति नाहीं म्हणून छाया नाहीं, छाया नाहीं म्हणून त्याचें दर्शन होत नाहीं.

पुढें मदालसेनें सुबाहूला गर्भ व शरीर रचनेविषयीं शरीरांतील सर्व स्थानांची, नाड्यांची, प्राणायामाची व षट्चक्रांची सविस्तर माहिती सांगून ती म्हणते ' बाळा मनुष्यास जागृति, स्वप्न, निद्रा, गतावृत्ति व तुर्या अशा ज्या पांच अवस्था आहेत, त्या अपान, समान, व्यान, प्राण व उदान या पांच वायूपासून प्राप्त होतात. जागृतावस्था म्हणजे जाणीवता, अहंकारच होय. अंतःकरण चतुष्टयाच्या ज्या चेष्टा, तो हा अहंकार होय. हा अहंकार अपान वायु व गुदद्वार यानें येणारा पृथ्वीचा जो गंध त्यापासून उत्पन्न होतो. चित्त हें समान वायूंत असतें. या वायूचें व जीवाचें सानिध्य झाल्यास जी अवस्था निर्माण होते तिला स्वप्नावस्था असें म्हणतात. बुद्धि व उदानवायु यांच्या समीकरणानें निद्रावस्था प्राप्त होते. मन व उदानवायु या एकीकरणानें गतावृत्ति अवस्था प्राप्त होते. ज्ञान, वायु, व आकाशतत्त्व यांपासून तुर्या अवस्था प्राप्त होते. शेवटची मोक्ष ही अवस्था प्राण व अग्नि यांच्या संकरानें होतें. मनुष्यास योगाभ्यासानें वर सांगितलेल्या अवस्था, आणि वायु नाड्या, चक्रें व प्राण यावर आपली सत्ता चालवितां येतें. पद्मासन घालून व तर्कमुद्रा करून उन्मनीकडे लक्ष लावणें हें योगांतील मुख्य तत्त्व होय. इडा, पिंगळा वगैरे स्थूल व सूक्ष्म नाड्यांच्या द्वारें स्नायूंची मदत घेऊन योगाचा अभ्यास करावा लागतो. इडा व पिंगळा या दोन नाड्यांतील वायु प्रथम अपान वायुच्या स्थानांत आणतात व तेथून तो सुषुम्नेच्या स्थानांत आणतात. वायु सुषुम्नेंत आल्यावर षट्चक्रांना


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

गति मिळते. नंतर सर्पिणी अथवा कुंडलिनी जागृत होते. व ती शरीर उर्ध्व करते. त्यायोगानें पश्चिमेचा मार्ग म्हणजे पाठीचा कणा यांतून बाहत्तर हजार नाड्यांतील रस वाहूं लागतात. त्या रसानें एकवीस स्वर्ग म्हणून स्थान आहे तें भिजून जातें. नंतर पुढें अभ्यासानें आत्मज्योतीचें दर्शन होतें आणि या दर्शनानंतर प्रयत्नानें मोक्ष प्राप्त होतो.

अशा तऱ्हेचें हें अध्यात्म ज्ञान मदालसा आपल्या मुलाला लहानपणापासून पाजीत गेल्यामुळें तो सुबाहु राजपुत्र राज्यवैभवाचा मोह न धरितां योगाभ्यासासाठीं अरण्यांत निघून गेला. त्याचे दोघे भाऊ शत्रुमर्दन व शुभकीर्ति या दोघांनींही त्याचेंच अनुकरण केलें. मात्र चौथा मुलगा अलर्क याला राजाच्या विनवणीवरून मदालसेनें राजनीतीचे पाठ दिले. याचा उपयोग अलर्कास राज्यावर बसल्यावर फारच चांगला झाला. परंतु याच्याही उद्धाराची त्याच्या मातेला काळजी होती. म्हणून अतिशय मोठें संकट आलें असतांना त्याच्यासाठीं एका पेटींत पत्र घालून दिलें होतें. तो एक निर्वाणीचा संदेश होता. अलर्कानें पुष्कळ वर्षे राज्य केलें. थोरल्या भावानांही अलर्काचा उद्धार व्हावा असें वाटत होतें. याच कारणासाठीं त्यांनीं राज्याच्या त्यांच्या वाट्यासाठीं अलर्काबरोबर युद्ध केलें. अलर्क लढाईत हरला. त्यावेळीं त्याला मातेनें दिलेल्या पेटीची आठवण झाली. तो सह्याद्रि पर्वतावर श्रीदत्त प्रभूंकडे जाण्याचा संदेश होता. या आदेशाप्रमाणें अलर्कानें श्रीदत्तात्रेयांकडे जाऊन त्यांचा अनुग्रह व कृपा प्राप्त करून घेतली व मुक्त झाला. धन्य ती माता मदालसा !

---

## श्रद्धा आणि भक्ति

जगांतलीं आजचीं पुष्कळशीं दुःखें माणूस अश्रद्ध बनल्यामुळेंच उत्पन्न झालीं आहेत. ईश्वरावरील श्रद्धेमुळें मनुष्याचें आत्मबल वाढतें, शंका कुशंका आणि भीति हीं नष्ट होतात. श्रद्धावान् माणसाला कुठल्याही कठीण परिस्थितींत मनोधैर्य टिकवितां येतें आणि पराभवाची भावना त्याच्या मनांत निर्माण होत नाहीं. अशा माणसाला कुठल्याही अवघड समस्येची सोडवणूक करून घेणें शक्य होतें, कारण असें म्हटलेंच आहे कीं, 'ईश्वरानें आपणांस भीति न देतां सामर्थ्य, प्रेम आणि विचारशीलता दिली आहे.'

माणसाच्या आयुष्यांत श्वासाइतकेंच श्रद्धेला महत्त्व आहे. संपत्ति आणि शक्ति यांच्या पराक्रमा पेक्षांही श्रद्धा आणि भक्ति यांनीं मानवी जीवनांत अधिक चमत्कार घडवुन आणलेले आढळतात. श्रद्धा आणि भक्ति यांचा ओलावा नसता तर मानवी जीवनाचें रुक्ष माळरान झालें असतें. श्रद्धा—भक्तीचा हा प्रवाह इंग्लंड, अमेरिकेसारख्या विज्ञानवादी, सुखसंपन्न देशांतही झुळझुळत आहे.

---

'बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडी घडी-' बाळपणींच्या खेळकर व खोडकर आठवणी किती रम्य असतात नाहीं? श्रीसाईबाबा शिरडींत आले तेव्हांचे त्यांचे एक सवंगडी तात्याबा कोते यांनीं सांगितलेल्या पुढील रम्य आठवणी साई-भक्तांच्या मनोरंजनांत व भक्तिभावांत भर घातल्याशिवाय रहाणार नाहींत.

# कै. तात्याबा कोते यांचे अनुभव

श्री. संपादक 'श्रीसाईलीला, यांसी स. न. वि. वि.

कै. पूज्य वडिलांनीं वरील मथळ्याखालीं लिहून ठेविलेला लेख सांपडला तो आपणां-कडे प्रसिद्धीसाठीं पाठवीत आहे.

—वा. बा. बाळ

बाबा येथें (शिरडींत) आले तेव्हां मी ६–७ वर्षांचा होतों. हल्लीं मला ६५–६६ वें वर्ष आहे. बाबा आले तेव्हां ते मशिदींतच राहत नव्हते. इकडे तिकडे रहात असत. त्यानंतर ते माशिदींत राहूं लागले. तेथें ते ८–१० महिने राहिले. व नंतर ते लिंबाच्या झाडाजवळ राहूं लागले. (तेथें जवळच त्यांच्या गुरुरायांची समाधि आहे म्हणून रहात असावे हा माझा नव्हे पण बा. वि. देव यांचा तर्क आहे.) तेथील समाधि मी पाहिली नाहीं. लिंबाच्या झाडाखालीं कांहीं महिने राहून बाबा पुन्हां मशिदींत राहूं लागले. तेथें समोर हल्लीं संस्थानच्या घोड्याचें घर आहे; तेथें मराठी गांवठी शाळा होती. नंतर कांहीं वर्षांनीं ती सरकारी झाली. पूर्वी आम्हीं मारुतीच्या देवळांत शाळा होती तेथें जात होतों. नंतर कांहीं दिवसांनीं जेव्हां घोड्याच्या घरांत शाळा झाली तेव्हां आम्ही तेथें जाऊं लागलों. माधवराव देशपांडे आम्हांस मास्तर होते. तेव्हां मी पहिली किंवा दुसरी इयत्ता शिकत होतों.

## बालपणीं आमची बाबांशीं सलगी

मी मारुतीच्या देवळांतल्या शाळेंत शिकत होतों तेव्हांपासून बाबा आमच्या घरीं भिक्षेस येत असत. त्यावेळीं माझे घरीं माझे वडील (दादा) व म्हातारी (आई) अशीं दोन माणसें व मी असे तिघेच होतों. तें आमचें जुनें घर. हल्लीं मी रहातों हें नवें घर २२–२३ वर्षांपूर्वी बांधलें. रघु शिंदा व मी बाळपणाचे मित्र आहोंत. तो माझे बरोबर शाळेंत जात असे. आमची दहा वाजतां शाळा सुटली म्हणजे मी, रघु शिंदा व दुसरीं २–४ मुलें मशिदीचें दाराचे हल्लीं जेथें फाटक आहे, तेथें उभे राहत असूं. तेथें आम्ही बाबांची चेष्टा करण्याकरितां उभे रहात होतों. त्यावेळीं बाबा १८–२० वर्षांचे

ऑक्लीन. त्यांना भिगुर फुटली होती. बाबांची चेष्टा आम्हीं येथें आल्यावर ३–४ वर्षांनी करूं लागलों. बाबा मशिदींतील खांबाजवळ बसलेले असावयाचे. रघु पाटील त्यांना फाटका पासून खडे मारावयाचा. मग त्यांनीं धावावयाचें. शिव्या द्यावयाच्या. मग आम्ही हंसावयाचे व पळून जावयाचें. मग मी घरीं येऊन जेवीत असे.

## बायजा मामी आबादी आबाद

माझें जेवण होतें न होतें इतक्यांत बाबा भिक्षेस येत. ते दारापाशीं उभे रहात व 'आबादी, आबाद, बायजा मामी रोटी लाव' असें म्हणत– मग ती म्हणे, "बाबा, आंत या. (घरांत)" ते आंत येत व ओसरीवर बसत. नंतर तिनें (माझ्या आईनें) सर्व काम सोडून बाबांच्या जवळ बसावें. त्यावेळीं मी त्यांचे अंगावर खांद्यावर मांडीवर लोळावयाचा. ते 'कांहीं बोलत नसत. आई म्हणत असे कीं, असा काय बाबांच्या अंगावर लोळतोस? तर ते म्हणत, 'कांहीं हरकत नाहीं. लोळूं दे.' मग माझी म्हातारी त्यांना म्हणे, 'बाबा, आतां येथेंच दोन घास खा.' लहरीस आले तर जेवीत. मग ती विचारी, बाबा काय आणूं? मग ते कधीं दूध, कधीं दहीं व कधीं ताक मागत; बाकीचे केलेले पदार्थ, म्हणजे कधीं भाकरी, भाजी, कोड्यांसही खात. पण दूध, दहीं, ताक, पापड, लोणचे व कांदा यावर त्यांचे प्रेम फार असे; व ते अगदीं मुद्दाम मागून घेत. त्यामुळें हे सर्व पदार्थ म्हातारी नेहेमी घरांत मुद्दाम बाळगून ठेवीत असे. हे पदार्थ ताजे केलेले असत.

बाबा पहिल्यांदा पाटील बुवा गोंदकर (बामन गोंदकराचा बाप) यांचे घरीं जात. नंतर तिसरें घरीं म्हणजे नंदराम सवाईराम मारवाडी याचे घरीं जात. नंतर चवथें घर म्हणजे आमचे घरीं येत. दोन दोन तीन वेळीं या चार घरीं ते भिक्षेस जात. ते हिंदु खेरीज करून मुसल्मानांच्या घरीं कधींही भिक्षेस गेलेले नाहींत.

पुढें २–३ वर्षांनीं बाबा शिवेचा ओढा व लेंडीचा ओढा यांचे मध्यें सडकेच्या कडेस जी बामळीची झाडें होती त्यांत ते २–२॥ वर्षें रहात असत. त्यावेळीं तेथें कोणी तरी त्यांना भाकर नेऊन देत पण माझी म्हातारी देत असें किंवा नसे हें सांगतां येत नाहीं.

## बाबांचा पूर्वींचा पोषाख

बाबा येथें आले तेव्हां हिरवा फेटा व हिरवी कफनी घालीत असत. चार–पांच महिने त्यांनीं हा पोषाख केला. नंतर डोक्यास फडकें व पांढरी कफनी हा पोषाख समाधिस्त होईंपर्यंत होता.

बाबा बामळीचे झाडींत रहात असत, तेव्हां मी किंवा रघू पाटील किंवा दुसरीं मुलें त्यांच्याकडे कधीं कधीं जात असूं. पण तेव्हां रघू पाटील त्यांना खडे मारीत नसे. त्यांचेकडे तेथें (बामळींत) त्यावेळीं नानाराव डेंगळे वगैरे मंडळी जात असत.

त्यानंतर बाबा पुन्हां मशिदींत आले. ते आमचेकडे भिक्षेस येत. पण मी त्यांचे-कडे मशिदींत जात नसे किंवा आमचे घरीं भिक्षेस आले म्हणजे त्यांचे अंगावर पूर्वी-प्रमाणें बसत किंवा खेळत नसे.

**गंगागीर बाबांचा सप्ताह**

नंतर शके १८१८ सालीं श्रीगंगागीर बाबा येथें सप्ताह करण्याच्या हेतूनें आले. परंतु गांवकरी लोकांनीं त्यांना धुडकावून लाविलें. ते फार रागावले व मशिदींत बाबांचें दर्शन घेऊन म्हणाले, "हा तर हिरा आहे. पण हा उकिरड्यावर पडला आहे. पण लक्षांत ठेवा कीं पुढें ह्या ठिकाणीं कांहींच्या कांहींच होऊन जाईल." नंतर गंगागीर चालते झाले. मला वाईट वाटलें. मी त्यांना रुईगांवाजवळ गांठलें व विनंती केली कीं, आपण शिर्डीस चला. ते म्हणाले, 'येत नाहीं.' ते रुईस गेले. तेथें सप्ताह केला. मी रोज रुईस जाई व त्यांचे जवळचे मंडळीस बुवांनीं शिरडीस यावें असें सांगे. माझे घरीं त्यावेळीं ७ पेवें गहूं होते. मी त्यांना सांगितलें कीं सात दिवस आपले सर्व टाळकरी मी जेवावयास घालीन. ८ वे दिवसाचें मात्र मी सांगत नाहीं. त्यांनीं कबूल केलें. ते येथें आले. मी म्हाताऱ्यांस सांगितलें. तो म्हणाला, बरें आहे. सप्ताह झाला. गांवकरी लोकांना लाज वाटली. त्यांनीं १४०० रु. जमा केले. श्रावण व. ५ पासून ८ दिवस पार पडले. मी मग त्यांचेबरोबर बरेच ठिकाणीं सप्ताहास गेलों. नंतर शेवटीं दसऱ्याचे सुमारास घरीं आलों. बाबाकडे गेलों. तेव्हां मी १७–१८ वर्षांचा असेन. मी सप्ताहांची हकीकत बाबांना सांगितली; व तेव्हांपासून मी बाबांच्याकडे जास्त जाऊं लागलों. इतकेंच नव्हे तर मला ते कोठेंच जाऊं देत नसत. मी अक्षय्य तेथेंच पडून राही. ते माझी थट्टा-मस्करी करीत. मी मशिदींतच निजत असें. ते खांबाचे आड दडत व मला हळूच ढकलून देत. मी म्हणे मला कोणी ढकलून दिलें! मग बाबा हंसत. एखादे वेळेला खांबाचे मागून माझे डोळे झांकीत व कोणी डोळे झांकले म्हणून मी म्हटले कीं, पुन्हां खांबाआड दडत. कधीं कधीं गुदगुल्या करीत.. कधीं कधीं माझे दोन्ही हातांचे पांची बोटांत ते आपल्या दोन्ही हातांची बोटें घालीत व माझी बोटें दाबीत. मी जरा त्यांची बोटें जास्त दाबलीं म्हणजे अरेरे, माझी बोटें मोडलीं असें म्हणत. हें सर्व मशिदीत चाले पण मंडळी नसे तेव्हां या खोड्या करीत. माझ्याशीं फुगडीं खेळत, माझ्याशीं झोंबी खेळत, कुस्ती खेळत. मी त्यांना हातावरच उचली. मग अरे, नको नको, तुझ्या पोटांत दुखेल, नको मला उचलूं, असें म्हणत व हंसत. मी त्यांना खांद्यावर घेई. ते म्हणत अरे नको मला उचलूं, अरे गांठ येईल, अरे गांठ येईल. ते मला, तात्या, कोत्या किंवा घोडमुख्या असें म्हणत.

शके १८१८ चें नंतर २–३ वर्षें दुष्काळाचीं गेलीं. तेव्हां आमचे घराखेरीज करून सर्व घरची भिक्षा बंद झाली. नंदराम फक्त एकच वेळ अर्धी भाकर ( गव्हाची किंवा बाजरीची ) घाली. मग आमचे घरीं दिवसांतून १२, १४, १६ वेळ सुद्धां येत. तितके वेळां आमची म्हातारी त्यांना अर्धी अर्धी भाकरी घाली. बाबासर्व तुकडे मातीचे

कोळंब्यांत ठेवीत व त्यावर एक लहान परात झांकण टाकीत. त्यांतून आपण ४—५ वेळां एकेक तुकडा, मिरची कांदा कोळ्यांस घेऊन खात. बाकीची भिक्षा, कुत्रे कावळे खात. ते त्यांना कधीं हांकीत नसत.

## पायांची गुंतागुंत

नंतर पुण्या मुंबईची भक्त मंडळी दर्शनास येऊं लागली. ती पेढे, बर्फी, आंबे आणीत असत. मी तेथं असलों तर बाबा मला खूप पेढे, बर्फी, आंबे देत; पण जर रानांत गेलों असलों तर मजकरितां पेढे, बर्फी, व आंबे, फडक्यांत बांधून कोठें तरी कोपऱ्यांत लपवून ठेवीत व मीं रात्री निजावयास गेलों म्हणजे मला चोरून देत. मजबरोबर म्हाळसापती सोनार पण मशिदींत निजावयास येत असे. पण त्याला पेढे, बर्फी व आंबे किंवा पैसे देत नसत. हल्ली जेथें मोठा फोटो आहे, तेथें बाबा पश्चिमेस डोळे व पूर्वेस पाय करून निजत. त्यांचे पायथ्यास, उत्तरेस डोकें, व दक्षिणेस पाय करून कटड्यास लेंटून मी निजें. म्हाळसापती बाबांचे दक्षिण बाजूस पण बाबांप्रमाणेंच पश्चिमेस डोकें व पूर्वेस पाय करून निजत. झोपेंत तिघांचे पाय एकमेकांचे पायावर येऊन गुंतागुंत होत असे. जागे होऊन पहावें, तो ही गुंतागुंत; मग आम्ही सगळे सकाळीं जागे झाल्यावर पाहत असूं व खूप हसूं. ही गुंतागुंत सहज होत असे कीं बाबा करीत हें कळत नव्हतें. बाबांचे पायही आमचे पायांत किंवा पायांवर किंवा आमचे पाय त्यांचे पायांवर पडत असत.

## बाबांची सेवा

आम्ही तिथे याप्रमाणें मशिदींत निजत असूं— रात्रीं ९—९॥ वाजतां निजत असूं. सुमारे एक झोंप झाली म्हणजे भगत (म्हाळसापती) उठे, दिव्यांत तेल घाली. वाती सारी. कोळंब्यांतील भाकरीवर झांकण वगैरे ठेवी. धुनींत लांकडें टाकी. नतर बाबा त्यांना माझें आंग चेपण्यास सांगत व आपणही माझें आंग चेपीत. याप्रमाणें ७—८ दिवस झाल्यावर मी भगताला सांगितलें कीं हें चांगलें नाहीं. मी बाबांची व तुमची सेवा करावयाची त्या उलट तेच माझी सेवा करतात हें बरें नाहीं. मी मशिदींतही येणार नाहीं व निजावयासही येणार नाहीं. असें म्हणून १०—१२ दिवस मशिदींत गेलोंच नाहीं. बाबा दुरून दुरून मला हांक मारीत, मी त्यांना येत नाहीं म्हणून खुणेने सांगे. नंतर कै. काकासाहेब दीक्षित आले. त्यांना हें कळलें. त्यांनीं माझी समजूत घातली, मग मी पुन्हां निजावयास जाऊं लागलों. तो सुमारें २ वर्षें जाऊं लागलों. बाबा व म्हाळसापती दोघेही दोन वर्षे माझें आंग चेपीत; कित्येकवेळीं बाबा माझें डोकें आपले हातावर घेत, मी झोपेंतच असे. मी जागा झालों म्हणजे मला तें समजे. मी धुनीजवळ निजें व दिवस गरमीचे. बाबा माझे आंगावर घोंगडी टाकीत. माझें आंग घामानें डबडबे. मी जागा होई. घाम पुशी व पायरीवर बसे. बाबा तपास करीत 'कोत्या कोठें गेला.' मी म्हणे लघवीला गेलों होतों— पुढे म्हाळसापती ३—४ वर्षे आजारी पडले. मी त्यांचें काम (दिव्यांत तेल घालणें,

खाती सारणें वगैरे ) करीत असे. नंतर बाबांनीं म्हाळसापतीस घरीं जाण्यास सांगितलें. तेव्हांपासून बाबांनीं त्यांना निजावयास येऊं दिलें नाहीं. मी मात्र मशिदींत सतत १४–१५ वर्षे निजावयास जात असे. बाबा समाधिस्थ होण्यापूर्वी फक्त ४–५ वर्षे गेलो नाहीं इतकेंच.

मी त्यांचें आंग रगडी. पाय रगडीत रगडीत मांडीच्यावर चेपीत जाई. मला बाबा म्हणत, हा उपर हात मत लगाडो–उपर हात मत लगाडो. मी वर वर चेपीत जाई. पुन्हां मला तसेंच म्हणत व हांसत. एकदां लोक ताजे आले. लोक खेळूं लागले. बाबांनीं मला बोलाविलें व विचारलें, 'लोक काय करीत आहेत! म्यां म्हटलें, ते हायदोस धुल्ला खेळत आहेत. बाबा मशिदीच्या खालीं आले; व मध्यें जो दगड आहे त्याचे जवळ मला बोलावून दुपारीं सुमारें ४ वाजतां माझे हातांत हात घालून त्या दगडाच्या भोंवतीं, हयदोस धुल्ला, हयदोस धुल्ला असें म्हणत दोन तीन फेऱ्या त्यांनीं केल्या व मला म्हणाले, कीं काय, आपला हायदोस धुल्ला झाला कीं नाहीं! मी म्हटलें झाला. मग बाबा म्हणाले, हां आतां जा. असें फक्त एकदांच केलें.

एकदां बाबांनीं होळीजवळ, माझ्या खांद्यावर हात ठेविलें. नंदूवाण्याच्या घराजवळ ठेविलें; बाबा आनंदांत होते. मी त्यांना तसेंच उचललें व खांद्यावर घेतलें व थेट मशिदींत आणून ठेविलें. बाबा म्हणत, अरे कोल्या, मेलो. अरे कोल्या, नको, तुझी गांठ सरेल. तुझ्या पोटांत दुखल. मी त्यांना उचलून मशिदींत आणून ठेविले. याप्रमाणें एकंदर २–३ वेळां केलें. मग कधींहि केलें नाहीं.

**उपरणें दडविण्याचा खेळ—**

बाबांनीं थट्टेनें माझें उपरणें पोत्याचे मागें लपवून ठेवावयाचें व मी विचारूं लागलों कीं माझें उपरणें कोणी चोरिलें, म्हणजे म्हणावयाचें कीं, अरे मला काय माहीत! मी काय उपरणें चोरतों काय! मला माहीतच कीं ह्यांच्याखेरीज दुसरें कोणी ठेवावयाचें नाहीं. मग जरा इकडे तिकडे केल्यावर सांगावयाचें कीं तें बघ तेथें आहे. याप्रमाणें मी निजावयास जात असें, त्यावेळीं नेहमी करीत; कित्येकवेळां माझें उपरणें घेऊन माझ्यासारखें आपण पांघरींत–मी जसा चाले तसे चालत. मी जसे हावभाव करीत असे तसे आपणही करीत; कित्येकवेळां आपल्या उजव्या हाताचा पंजा माझ्यापुढें करीत व आपण पंजा खेळूं म्हणून म्हणत. मग मीही आपल्या पंज्याची बोटें त्यांच्या बोटाच्या पंज्यांत घालीत असें व ते माझी बोटें दाबीत. मीही त्यांची बोटें हळूहळूच दाबी. मग ते माझी बोटें जोरानें दाबीत. मग मीही जरा जास्त जोरानें दाबीत असें. मग म्हणत, अरे माझी बोटें मोडतो कीं काय? प्राप्रमाणें मजा, गंमत, थट्टा व खेळ करीत; पण खुशींत असत तेव्हां!

( पुढें चालू )

कमलनयननीलवर्ण गोंडस बालकाचा अतीव सुंदर, मोहक हास्ययुक्त असा नीलवर्ण राजीवासारखा चेहरा आपल्याला दिसत आहे व बांसरीसारख्या नाजुक कोमल स्वरानें 'बाबा बाबा' म्हणून आपणांस तो प्रेमसाद घालीत आहे व दूध देतां देतां आपली शुभांगी धेनू इन्याकडे वांकडी मान करून व आपले दोन्ही सुवर्णकर्ण उभारून सुंदर टपोऱ्या डोळ्यांनीं हेंच दृश्य अनुभवित आहे. नंदराजाच्या बाजूच्याच दालनांत यशोदामाई नुकतीच मूर्तिमंत जगन्मायेला जन्म देऊन अंगाला आळोखे देत होती. ती क्षणार्धात पुन्हा योग समाधींत जाऊन प्रसूतीचे श्रम विसरून गेली. तिच्या शेजारीं परब्रह्माची आदी सांगातीण आपल्या मोहिनीनें ऋषीमुनी देवादिकांची सुद्धां उडविणारी योगमाया–सुंदर कुमारिकेचे रूप घेऊन हातपाय वर करीत व आपल्या मृग नेत्रानें भिरभिर इकडे तिकडे पहात–हांसत हांसत पहुडलेली होती.

## आदिमायेचा खेळ

आपलें मानवी जीवन याच आदिमायेनें जन्मापासून अन्तापर्यन्त भारलेलें असतें. याच आदीमायेच्या प्रचंड ओघाबरोबर आपलें मानवी मन वहावत जाऊन असाह्य स्थिती-प्रत येतें व त्याची वाऱ्यासारखी चंचलता आपली स्थितप्रज्ञता हरघडी बिघडवून आपल्याला नीट कोणत्याच तऱ्हेचा विचार करूं देत नाहीं. आपण जन्मापासून मृत्यूपर्यन्त शेंकडों, हजारों, लाखो, क्रोडों, विचार अर्धवट करून सोडून देतों. क्वचित् एखादाच विचार, शेवटापर्यन्त नेऊं शकतो–जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल–व या सर्व तुटक तुटक असंबद्ध विचारांचें एक ठिकठिकाणीं तुटके विस्तीर्ण जाळें–म्हणजेच आपलें मानवी जीवन होय. या सर्वांस कारण हीच आदिमाया होय. हिचा सर्व उद्योगच मानवी मनाला शक्य तेवढे विवेकी बुद्धीपासून दूर ठेवण्याचा असतो. मनाला वारंवार भोंवतालच्या सुंदर वस्तूंचा मोह पाडायचा व त्याला भूतकाळांतल्या रम्य स्मृतींचा पतंग, वर्तमानकाळाच्या दोरानें बांधून भविष्यांत फेकावयास लावायचा. मनाला पूर्ण बहिर्मुख करण्यांत तर हिचा हातखंडा आहे. मनाला विषयसुखाबाबत फुलपाखरांप्रमाणें या विषय फुलावरून त्या विषय फुलावर झेप घालण्यास लावून त्यांतील विविध जातीच्या मधूचे आपल्या जिव्हेनें पान करण्यास लावण्यांत, या आदिमायेचा कोणीहि हात धरूं शकणार नाहीं. कां तर निराशा–कां तर अतृप्ति–या दोन्ही स्वरूपानें मानवी मनाला सतत बेचैन करून–त्याला सुख शांति समाधान न मिळवून देणें हा तर हिनें उचलेला पैजेचा विडा आहे. आपल्या मनांत हरघडी निर्माण होणाऱ्या विचार तरंगांनीं, कल्पनांनी अंतर्यामी इतकें जोराचे वादळ उठवायचें कीं, आपली विवेकी बुद्धि सहजच डावलली जावी, व आपले स्वतःचें आत्मस्वरूप आपणांस न दिसावें, हा या आदीमायेचा नित्याचाच विलास आहे. आपणांस बाहेर दिसणारे– "नाना जीव वनस्पति जड" असें हें जगत् व आपणामध्यें असलेलें चंचल मन व विवेकी बुद्धी हे सर्वच ह्या आदी मायेच्या प्रभावानें झाकाळून गेलें असल्यामुळें, या जड अजडा मागील व आपल्या मन बुद्धीला चालना देणारा तो, चराचराला अधिष्ठान असलेला आदी पुरुष नारायण "आदि

नारायण " आपणांस दिसत नाहीं. चित्रपटगृहांत आपण चित्रपट पहात असतों तेव्हां चित्रपटांतील चालना आपल्या चंचल मनबुद्धि चालनेशीं एकरूप होते व आपण चित्रपटांत दाखविलेल्या सृष्टींतच वावरत आहोंत असें आपणांस चित्रपट संपेपर्यंत सातत्यानें वाटतें. परंतु चित्रपट संपल्यावर व विशेषतः चित्रपट गृहाबाहेर आल्यावर आपण आपल्या नेहमींच्याच स्थिर जगांत परत प्रवेश करतों. अगदीं तसेंच या आदीमायेमुळें बाहेरील जगाचें सर्व दृश्य आणि व्यवहार यांचें चलत् चित्र आपल्या मनबुद्धि चांपल्याशी एकरूप होऊन आपल्या जीवनाचा चित्रपट चालूं लागतो.

## दोन घडीचा डाव

मानवी उत्क्रांति पूर्णावस्थेला पोहचल्यामुळें किंवा "यततानांमपि सहस्राणाम् कश्चित् " या नियमाप्रमाणें स्वतःच्या पौरुष प्रयत्नानें एखादाच, या मनबुद्धी पलीकडल्या स्थिर आत्मस्वरूपाचें दर्शन करतो व आपल्या खऱ्याखुऱ्या स्वानंदस्वरूप माहेराप्रत पोहोचतो. इतर सर्वजण अजूनही या आदीमायेच्या चित्रपटगृहांत आपल्या जीवनाचा चित्रपट पहाण्यांत रंगून जातात व त्या जीवनचित्रपटांतील हरएक हालचाली वरखालीं होणाऱ्या भावनांशीं–सुखदुःखाशीं एकरूप होऊन चित्रांतल्या किंवा नाटकांतल्या नटासारखे जीवनांत कार्य व हावभाव करीत राहातात. 'दोन घडीचा डाव त्याला जीवन ऐसें नांव ' या यथार्थ उक्तीमधील दोन घडीचा जीवनांचा हा डाव ही आदीमायाच आपणांस खेळावयास लावते. हा जीवनाचा चित्रपट प्रत्येकाला सारखाच दिसत नाहीं तर " पिंडीं तें ब्रह्मांडीं " या नियमाप्रमाणें प्रत्येकांत, प्रकृति, चैतन्य संलग्नता ज्या प्रमाणांत कमी अधिक झाली असेल त्या प्रमाणांत तो वेगळा वेगळा दिसतो. आपल्या प्रत्येकाच्या शरीर, मन व बुद्धि या त्रयींचा समन्वय सारखाच नसतो. तो भिन्न भिन्न असण्याची विविध कारणें आपल्या पूर्व उत्कान्तीच्या इतिहासांत सांठवलेली असतात. मानवी योनींत प्रवेश करण्यापूर्वी आपण ज्या खनिज वनस्पति, कीटक, पक्षी, पशु वगैरे योनींतून मानवांत आलेले असतों–त्या त्या योनींच्या संवयी क्रिया हावभाव यांचें स्वच्छ परंतु निद्रित रूपान्तर आपल्या संस्कारमय मन बुद्धींत सांठवलेले असतें व त्यामुळें जीवनांचा बाह्य व अंतरीय चित्रपट ह्या संस्काराच्या वेगवेगळ्या क्रिया प्रतिक्रियामुळें आपणांला वेगळा वेगळा दिसतो. आदिमाया म्हणूनच प्रत्येकाला निरनिराळ्या वेषांत दिसते व म्हणूनच प्रत्येकाचें स्वरूप, स्वभाव आवडी निवडी–आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, वगैरे सगळेंच विविध असतें.

## आदि पुरुषाचें दर्शन

'व्यक्ति तितक्या प्रकृति ' ह्याचा हाच अर्थ आहे. मानवाच्या बाह्य तसेंच अंतर सृष्टींत अशी विविध रूपानें नटलेली ही आदिमाया आहे. या आदिमायेचें हें आपल्या डोळ्यांवरील पटल दूर करण्यासाठीं व त्या मागील आदिपुरुषाचें दर्शन घेण्यासाठीं आपल्याला विवेक–वैराग्य–नीतितत्वें यांच्या सहाय्यानें आपल्या दैनंदिन जीवनाचा खरी जीवनमूल्यें कोणतीं ती शोधून काढण्यासाठीं सखोल अभ्यास करावा लागतो.

आपलें शरीर पंच–महाभूतांपासून निर्माण झालें असून ते सर्वांत जडस्वरूपांत असतें. त्याहून सूक्ष्म आपले मन, मनाहून सूक्ष्म आपली बुद्धि आणि बुद्धीहून सूक्ष्म आपल्यांतील चैतन्य किंवा खरेखुरें आपलें रूप म्हणजे आत्मस्वरूप जड शरीर व चैतन्य यामधील प्रांतांत आपलें मन व बुद्धी स्वैर संचार करीत असतात. विशेषतः ज्याचें 'मन एव मनुष्याणां कारणं बन्ध मोक्षयोः' "मन हीच माया" अशी वर्णने किंवा व्याख्या केलेल्या आहेत. असें मन तर फारच थैमान घालीत असतें: 'निःसंशयं महाबाहो प्रमाथि बलवद्मनम्" असें श्रीकृष्णानें अर्जुनाला वर्णन केलेलें हें मन आपल्याच ठिकाणीं शेंकडों विचारांची वादळें उठवितें. व त्याहून सूक्ष्म असलेली विवेकी बुद्धि हीं वादळें शमविण्याचा प्रयत्न करीत असते. मन बुद्धीच्या या ओढाताणीच्या प्रयत्नांत जड व चैतन्याच्या मधल्या प्रांतांत नेहमींच काळोखी, वारा, पाऊस, धुकें इत्यादि पसरलेली असतात व त्यामुळें जडाची व चैतन्याची संलग्नता होण्यास फारच मोठी अडचण निर्माण होते. खरं म्हणायचें म्हणजे मन न बुद्धि ही केवळ वायुस्वरूप असल्यामुळें आपल्या मनांत निर्माण होणारा प्रत्येक विचार कल्पना–कल्पना समूह–हे सर्व वायूच्या विशिष्ट आकारधारी चलनवलनाचेच प्रकार असतात, व शब्दशः आकाशांत किंवा हवेंत लिहिलेला धडा जसा ताबडतोब पुसून जातो त्याप्रमाणें हे विचार–कल्पना इत्यादि अगदीं अस्थिर स्वरूपांत असल्यामुळें क्षणार्धात बदलून निराळी परंतु अगदीं अस्थिर अशी रूपें सतत घेत असतात. बुद्धि त्यास स्थिर करण्याचा प्रयत्न करीत असते. पण तो प्रकार वाऱ्याची मोट बांधण्यासारखा असतो. जड व चैतन्य यांच्यामधील धूसरता हीच आदिमाया होय व या सतत बदलणाऱ्या विचारांच्या कल्पनांच्या वादळामुळें आपल्यांतील जडाला, चैतन्याशीं डोळस संयोग करतां येत नाहीं. इतकी ही आदिमाया जबरदस्त बलवान् व पराक्रमी असते. परंतु आपल्याच मनांत उठणाऱ्या या विचारतरंगाचें व कल्पनासमूहांचें आपणच सतत निरीक्षण करीत गेलों व त्यांतील योग्य अयोग्याची आपणांस निवड करण्याची संवय जडल्यास एका सेकंदाला हजारों दिशांनीं उठणारे हे विचारकल्पनांचे वादळ आपण अभ्यासाने हळुहळू शमवूं शकतो व जितक्या कमी अधिक प्रमाणांत या प्रयत्नांत आपण यशस्वी होतो तेवढ्या प्रमाणांत या वादळामागें लपलेल्या व या विचार कल्पनांनीं झाकलेल्या आदि पुरुषाचें आपणांस दर्शन होण्याची शक्यता निर्माण होते.

## रामरंगीं रंगलें मन

या विचित्र मायेचें आवरण जसें जसें आपल्या मनबुद्धीवरून दूरदूर होत जातें तसे तसे आपणांस आपण एखाद्या दिव्य आनंदमय प्रदेशांत पदार्पण करून पुढें पुढें जात आहोंत असें वाटू लागतें. आपले विचार व आपल्या कल्पना यांत जड व चैतन्य यांचें नेहमीच मिश्रण असतें यांचें कारण मनबुद्धि जरी आपल्या शरीराहून सूक्ष्म तत्त्वाची बनलेली असतात तरी देखील यांत चैतन्याचा पूर्ण भाग नसतो व शरीर बद्धतेमुळें तीं चैतन्याच्या प्रांताकडे स्वाभाविकच कमी झुकतात व त्यांचा नैसर्गिक कल

शरीरांतील जाड्याकडेच झुकण्याचा असतो. जितकी मनबुद्धी शरीरावर भर देतात तितका त्यांत जाड्याचा अंश जास्त येतो. व जितकी ती चैतन्याच्या बाजूला वळतात तितकी ती चैतन्य स्वरूप जडरहित होऊं लागतात. तमानें भरलेले विचार आलस्य निर्मिती करतात. रज स्वरूपांत ती मद, मोह, मत्सर निर्माण करतात. तर सत्वाचा आश्रय केल्यास शांत गंभीर शहाणपणानें परिपूर्ण भरलेली अशी स्थिति त्यास प्राप्त होते. आपल्या जीवनांत मन व बुद्धि या म्हणजे सत्व, रज, तम या तिन्ही अवस्थांत वारंवार फिरत असतात, व नकळतच त्यांतील सुखदायी अवस्था कोणती याचा निर्णय करीत असतात व शेवटीं एक वेळ अशी येते कीं आपली बुद्धि, मनावर ताबा मिळवून, सत्त्व स्थितींत फार सुख आहे अशा निश्चयाप्रत येते. परंतु वारंवार जड व रज प्रांताची छाया तिच्यावर पडल्यामुळें तिचा हा निश्चय वारंवार बिघडतो. शेवटीं कंटाळून सत्व, रज आणि तम या त्रयी पलीकडील सच्चिदानंद प्रभूचें दर्शन घेण्यास उतावीळ झाल्यामुळें स्वतः लीन होऊन मनाला, तसेंच करण्यास लावून सत्त्व रज व तम या त्रयीतील कोणाचाहि आश्रय न घेतां तटस्थ स्थितीत जाते व काळ्या ढगांमागून एखाद्या वेळेला चटकन् वीज चमकून जावी, त्याप्रमाणें या अवस्थेंत तिला परमात्मप्रभूचें दर्शन होतें. यास साक्षात्कार म्हणतात. हा विचार–कल्पना मागे दडलेला–अर्थाचा अर्थ–एकदां कां मन बुद्धीच्या नयनांत भरला कीं सत्व, रज, तमामागील तटस्थावस्था कशी धारण करावी हे त्यांस कळूं लागतें. सत्त्व, रज, तमामागील हा प्रभु पुन्हा पुन्हा बघण्याची त्यास इच्छा होते. सर्व विचाराचे व कल्पनाचे माहेरघर, त्या विचार कल्पनाना सतत सुखावते व ती या परमात्म प्रभूच्या दर्शनाने व नादानें इतकी भारावून व मोहरून जातात, कीं त्या परमात्म प्रभुचा घननीळ वर्ण त्या विचार कल्पनावर सुद्धा चढूं लागतो. प्रभात काळच्या रक्तीमात बुडून ती गुलाबी बनतात व ' रामरंगीं रंगले मन ' अशी प्राप्त झाल्यामुळें मनाला व बुद्धीला पूर्ण परामात्म रंग चढतो व ती परमात्म स्वरुपांत सहजच राहू लागतात. मग मन बुद्धीच्या नयनावरील आदी मायेचें पटल सहजच फाटून जाते व त्यांस सतत् त्या निराकार, निर्गुण शांत अचल परमात्म्याचें दर्शन होत राहातें. व त्यामुळें बुद्धी त्या सत्व स्वरुपाकडे पहात स्थित प्रज्ञेच्या स्थितीप्रत पोहोचतें व परमात्म स्वरुप हेंच एक सर्व ब्रम्हांडांचे स्वरुप असून तेच एक सत्य आहे त्या स्वरुपावर वर्तमान भूत आणि भविष्य हे तिन्हीही काल आपली सत्ता चालवू शकत नाहींत. तें कधींही जन्माला आलेले नाही म्हणून त्यास मृत्युही नाही आणि तेच माझे स्वरुप आहे, म्हणजे मी स्वतः देशकाल नाम रुप या पलीकडे आहें व मी अमर्त्य आहे अशा त्या बुद्धीस बोध होतो, व हळू हळू तो बोध आपल्या चंचल प्रमाथिबलवद् अशा आपल्या मनांच्या ठिकाणी रुजून ' मन एव मनुष्याणां कारणं बंध–मोक्षयो ! अशा मनाचेच ब्रम्ह बनून बंध मोक्ष या दोहोंचे कारण होण्याची स्थिती संपून तेच बंधमोक्ष या कंदाच्या पलीकडल्या मोक्षाप्रद आपणांस नेते मग सहजच आपल्या नयनावरील या आदीमायेचे पडदा फाटतो व " सर्व खलु इदं ब्रह्म " असें आपणांस वाटूं लागतें.

---

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



## अध्याय सहावा

पुढें चालू

दुसरे दिवशीं बाबा लेंडीला गेले असतांना सभामंडपांत पाळणा बांधण्यांत येऊन कीर्तनाची तयारी करण्यांत आली. वेळ होतांच श्रोते जमले व बाबाही परतले असें पाहून भीष्म उठले व काका पेटी वाजवावयास सिद्ध झाले. इतक्यांत काकांना बाबांचें बोलाविणें आलें 'बाबा तुम्हास बोलावितात' हें ऐकतांच काकांचें हृदयांत धस्स झालें. त्यांचे मनास काय होत आहे हें त्यांनाच कळेना. कथेचा विरस न होवो असें त्यांना वाटूं लागलें. बाबांचें निमंत्रण ऐकून काकांची भीतीनें गाळण उडाली. बाबा क्षुब्ध का बरें व्हावेत? कीर्तन निर्विघ्न पार पडेल ना असें विचार काकांचे मनांत सुरू झाले. मागें पुढें पाहत भीतीनें काका मशिदीच्या पायऱ्या चढूं लागले. काळजीमुळें त्यांचीं पावलें मंद पडत होतीं. पाळणा कशासाठीं बांधण्यांत आला आहे असें बाबांनीं त्यांना विचारलें आणि त्याचें कारण आणि योजना कळतांच बाबांना संतोष वाटला. जवळचाच एक हार घेऊन त्यांनीं तो काकांच्या गळ्यांत घातला आणि दुसरा भीष्मासाठीं दिला. पाळण्याचा प्रश्न विचारण्यांत येतांच सर्वांना मोठी चिंता लागून राहिली होती. परंतु काकांच्या गळ्यांत हार पडलेला पाहतांच सर्वजण निश्चिंत झाले. भीष्म बहुश्रुत असून निरनिराळ्या कथा त्यांना चांगल्याच अवगत असल्यामुळें त्यांचें कीर्तन सुश्राव्य व रसाळ असें झालें आणि तें ऐकून श्रोत्यांसहि अपरिमित असा आनंद झाला. बाबाही त्यावेळीं प्रसन्नमुख असे होते. जशी त्यांनीं आज्ञा दिधली त्याचप्रमाणें त्यांनीं कीर्तन भजनासह उत्सव साजरा करवून घेतला. रामजन्माच्या वेळीं गुलाल उधळण्यांत आला. तो बाबांच्या नेत्रांत पडला त्यावेळीं बाबाच जणूं काय नरहरी श्रीराम होऊन कौसल्येच्या मंदिरांत प्रगट झाले आहेत असें वाटत होतें. गुलालाचें केवळ निमित्त. रामजन्माचा तो आवेश अहंकाररूपी रावणाचा नाश होऊन दुर्वृत्ति राक्षस मरतील असें दिसूं लागलें. झालें. बाबा एकाएकीं कोपायमान झाले. नृसिंहरूप धारण करून शिव्याशापास सुरुवात झाली व त्यांचा अमूप वर्षाव झाला. आतां पाळण्याचे तुकडे होतील, तो घड कसा राहील हें सांकडें राधाकृष्णाबाईपुढें उभें राहिलें. आधीं लवकर पाळणा सोडा म्हणून तिनें प्रत्येकाच्या मागें लकडा लावला. काका पाळणा सोडण्यासाठीं पुढें सरकले आहेत हें पाहून बाबा अतिशय कातावले व काकांच्या अंगावर धांवून गेले. पाळणा सोडणें राहिलें आणि बाबाही शांत झालें. पुढें दुपारीं बाबांची

अशा विचारतांच ते आश्चर्यानें म्हणतात, 'अरे, इतक्यांतच पाळणा सोडण्याची घाई कशाला ? अजून जरूरी आहे त्याची." ही आवश्यकता कसली. साईवचन अन्यथा नसणार. थोड्या विचाराअंतीं उत्सवाची पूर्णता झाली नाहीं हें उमजून आलें. येथपर्यंत उत्सव पार पडला. दुसरा दिवस उगवला. जोंपर्यंत गोपाळकाला झाला नाहीं तोंपर्यंत उत्सव पूर्ण झाला असें कसें म्हणतां येणार? ह्या प्रमाणें दुसऱ्या दिवशीं काल्याचें कीर्तन झालें, आणि मग बाबांनीं पाळणा सोडण्याची परवानगी दिली.

पुढील वर्षी भीष्म नव्हते. बाळाबुवा सातारकरांना कीर्तनासाठीं आणावयाचें होतें; परंतु त्यांना दरवर्षाप्रमाणें रामनवमीसाठीं कवठ्यास जावयाचें होतें. अर्वाचीन तुकाराम म्हणून प्रसिद्धीस आलेले भजनी बाळाबुवा यांना काका महाजनी घेऊन आले व त्यांच्या हातून उत्सव करविण्यांत आला. हेही आले नसते तर काकाच कीर्तनाला उभे राहणार होते. दासगणूकृत "नवमीचें आख्यान" त्यांना पाठ होतेंच. तिसरे वर्षी रामनवमीचे वेळेवर बाळाबुवा सातारकरांचें शिर्डीस कसें येणें झालें तें ऐका. श्रीसाईबाबांची कीर्ति ऐकून त्यांचें दर्शन घेण्याची इच्छा त्यांचे मनांत आली परंतु वाटेंत सोबत मिळाल्याशिवाय ही इच्छा पूर्ण कशी होणार ? बाळाबुवा हरदास होते. त्यांचे मूळ गांव साताऱ्यास असून ते परळ येथें रहात असत. सातारा जिल्ह्यांत 'बिन्हाड सिद्ध कवठे' गांवाच्या देवस्थानाचें रामनवमी कीर्तनाचें बुवांस वर्षासन असे. या गांवाच्या चैत्रांतील रामनवमी आणि आषाढी एकादशी या दोन वार्षिक उत्सवाशीं बुवांचा संबंध येत असे. या देवस्थानास अकबर बादशहापासून सनद असून चौवीसशें रुपये खर्चाकरितां मिळत, अशी मूळ व्यवस्था होती. सर्व खर्च सांप्रत सांगली संस्थानतर्फे चालतात. वरील दोन्हीं उत्सवाप्रीत्यर्थ बुवांस एकूण तीनशें रुपये मिळत परंतु यावर्षी कवठ्यास महामारीचा उपद्रव सुरू झाल्यामुळें सर्व गांवकरी मोठ्या अडचणींत होते. लोक गांव सोडून गेले असून रामनवमी राहिली आहे व पुढील वर्षीं यावें अशा आशयाचें बुवांना पत्र आलें होतें. तात्पर्य, रामाची सेवा चुकली व बिदागीही बुडाली. शिर्डीला जावयास संधि मिळणार म्हणून बुवांनी दीक्षितांची भेट घेतली. दीक्षित बाबांचे परमभक्त होते. त्यांनीं मनांत आणलें तर शिरडीला जाण्याचें मनोगत

**जैसें डोळ्यां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगटे । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४** यांचा सल्ला घेऊन निरधास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

पूर्ण होऊन स्वार्थ आणि परमार्थ दोन्हीही साधतील असें बुवाचे मनांत आलें. यंदा वर्षासन राहिलें आहे, करितां शिर्डीस येऊन बाबांचें दर्शन घ्यावें असें वाटत असून रामनवमीचें कीर्तनही तेथें करावें असें त्यांनी दीक्षितांना सांगितलें. 'बिदागी मिळेल किंवा नाहीं याबद्दल निश्चित असें कांहींच नाहीं. सर्व कांहीं बाबांचे हातीं आहे. तसेंच कीर्तनासाठीं त्यांची संमति मिळवावी लागेल,' असें दीक्षित बुवांना सांगत आहेत तोंच काका महाजनी शिर्डीचा उदीप्रसाद घेऊन अवचित तेथें आले. शुभशकुनच होता तो. काका शिरडीहून आले होते. तेथील क्षेमकुशल कळवून ते घरीं परतले. दीक्षितांनीं मोठ्या प्रेमानें बुवांस सांगितलें, 'मी बाबांना विचारतों, आणि त्यांनीं संमति दिल्याबरोबर आपणांस निश्चित कळवितों, पत्र येतांच शिरडीस या. वाटखर्चाबद्दल घाबरण्याचें कारण नाहीं. कोणतीहि शंका मनांत आणूं देऊं नका.' असो; पुढें दीक्षित शिर्डीस गेलें. बाबांनीं अनुमोदन दिल्यामुळें बाळाबुवा शिर्डीस आले व त्यांचें यथेष्ट दर्शनहि झालें. आपल्यासमोर बाळाबुवांच्या हस्तें रामनवमीचा उत्सव श्रीसाईंनीं मोठ्या प्रेमानें करून घेतला. इच्छित कार्य पार पडलें म्हणून बुवांना संतोष वाटला. बाबाही प्रसन्न चित्त होते. सर्वांचे मनोरथहि पुरले. बुवांची संभावनाहि यथास्थित करण्यांत आली. त्यांना पांचशें रुपये देण्याची आज्ञा झाली. बुवांना अतिशय आनंद झाला. कवठ्याला पांच वर्षांत जी प्राप्ति होणार ती बाबांनीं एका उत्सवांत त्यांस दिली म्हणून बुवांना का बरें आनंद होणार नाहीं ? बुवा बाबांचे आभारी होते. असो; पुढें एके दिवशीं दासगणू शिर्डीस येतांच बाबांनीं दरवर्षीचा उत्सव त्यांनाच देऊन टाकला. तेव्हांपासून आजपर्यंत समाधि महाद्वारांत मंगल वाद्यांच्या गजरांत आणि साईनामाच्या घोषांत जन्मोत्सव मोठ्या उत्साहानें व आनंदानें साजरा करण्यांत येत असून मोठ्या प्रमाणावर अन्नसंतर्पणही त्यादिवशीं होत असतें.


दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :-DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.-DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबीलदास रोड, दादर ( W. R.), मुंबई २८.

यात्रा व उरुस करण्याची जशी गोपाळगुंडांना स्फूर्ति झाली, तसेंच मशिदीचा जीर्णोद्धार करावा असें त्यांच्या मनानें घेतलें. मशिदीचा जीर्णोद्धार आपल्या हातूनच व्हावा असा त्यांनीं निर्धार करून त्याप्रमाणें या कामासाठीं पाषाण करवून घेतले. परंतु या जीर्णोद्धारांत गुंडांचा भाग नसावा असें दिसून आलें. हें कार्य बाबांनीं आपल्या मनाप्रमाणें पुढें करून घेतलें. बाबांच्या मनांत होतें कीं, हे कार्य नानांनीं करावें व त्यानंतर काका दीक्षितांनीं फरसबंदी करावी. तसेंच पुढें घडून आलें. आज्ञा मागतां मागतां मंडळी थकली. म्हाळसापतींना मध्यस्थी घातलें आणि बाबांनींही अनुमति दिली. एका रात्रींत मशिदीची फरशी झाली आणि दुसरे दिवशीं बाबा गादीवर बसले. एकुणिसशें अकरा सालीं सभामंडप झाला. केवढा तो प्रचंड खटाटोप! केवढा महाव्याप! सगळ्यांचा थरकांप झाला होता. अशाच परिस्थितींत अशा रीतीनें एका रात्रींत भक्तांनीं तें काम मोठ्या प्रयासानें पार पाडलें. महत् प्रयत्नांना रात्री खांब लावावे. सकाळीं बाबांनीं ते उपटून काढावे. संधि मिळतांच पुन्हां चिणावें अशा रीतीनें सर्वांनीं शीण करावेत. मनाचा करावयाचा हव्यास पुरविण्याकरितां अतिश्रम करून रात्रीचा दिवस करावयाचा असें ठरवून सर्वांनीं कंबर बांधली होती. आधींच येथें उघडें अंगण असून लहानसें पटांगण होतें. सभामंडपास हेंच योग्य स्थान आहे असें दीक्षितांना वाटलें. लागेल तितका पैसा खर्चून लोहाचे खांब व कैच्या आणून बाबा चावडीस गेले आहेत असें पाहतांच हें काम साधून घेतलें. भक्तांनीं रात्रीचा दिवस करून मोठ्या सायासानें खांब चिणावे आणि चावडींतून परतण्याचा अवकाश कीं बाबांनीं ते उपटण्यास लागावें. एकदां ते अतिशय क्रोधायमान झाले. एका हातानें त्यांनी तात्यांची मान पकडली आणि दुसऱ्या हातानें ते खांब हालवून उपटून काढूं पाहत होते. खांब हालवून हालवून ढिला केला. तात्यांच्या माथ्याचा फेटा काढून त्याला कांडें लावून पेटवून दिला व तो रागानें खड्यांत टाकला. त्यावेळीं रागानें त्यांचे डोळे अग्नीप्रमाणें लाल दिसत होते. कोणाची छाती होती त्यांच्या डोळ्याला डोळा लावण्याची? सर्वजण गर्भगळित झाले होते. खोंच खिशांत हात घालून एक रुपया काढला आणि तोहि तेथेंच फेंकून दिला. जणूं काय मुहूर्तच केला त्यांनीं. शिव्याशापांचा सारखा वर्षाव होत होता. तात्याहि मनांतून फारच घाबरले होते. प्रसंग फार बिकट आला होता. हा प्रकार घडला तरी कसा! हें आज काय दुश्चिन्ह आहे? तात्या पाटलांवरचें हें संकट कसें निवारण होईल? सर्वजण आश्चर्यचकित झाले होते. भागोजी शिंद्यानें धीर केला. तो हळुहळू पुढें सरकूं लागला. आयताच सांपडला बाबांच्या हातांत आणि त्यांनींहि चांगलाच चोपून काढला त्याला. माधवरावहि हातीं लागले बाबांच्या आणि त्यांनाहि विटांचा प्रसाद मिळाला. जे जे मध्यस्थी करावयास गेले त्या सर्वांना वेळींच बाबांनीं प्रसाद दिला. बाबांच्या पुढें कोण जाईल आणि तात्यांची सोडवणूक करील? सर्वांनाच विचार पडला. मग बाबांचा राग मावळला आणि ते शांत झाले. ताबडतोब दुकानदाराकडून जरीकांठी फेटा आणवून त्यांनीं स्वतः तात्यांचे डोक्यास बांधला. जणूं काय मानाचें पागोटें दिलें त्यांना. लोकांना आश्चर्य वाटूं लागलें. या रागाला कारण तरी

काय ? बाबानीं कशासाठीं तात्यावर हल्ला करून इतका गोंधळ उडविला ? क्षणांत कोणत्या कारणामुळें कोपायमान झाले व क्षणांत प्रसन्नचित्त झाले यांचे यत्किंचित्‌हि कारण कोणीच समजूं शकले नाहींत. शांतचित्त असतांना बाबा प्रेमानें गोष्टी सांगत असत तर कांहींएक निमित्त न लागतां अवचित ते प्रक्षुब्ध होत असत.

अशा या बाबांच्या कथा आहेत. एक सांगतांना दुसरी आठवत असते. कोणती सांगावी व कोणती ठेवावी ही प्रपंचवृत्ति बरी नाहीं. मलाही आवडनिवड करतां येत नाहीं, जशी जी कथा आठवेल ती सांगून श्रोत्यांचें श्रवण कोड पुरवीन.

पुढील अध्यायीं वृद्धांच्या मुखांतून ऐकलेलें साईपूर्वकथन श्रवण करावें. साईबाबा हिंदू होते कीं यवन होते, याचें यथामति निरूपण होईल. दक्षिणेच्या मिषानें पैसा घेऊन जीर्णोद्धाराच्या कार्यासाठीं कसा लाविला, धोती पोती खंड दुखंडानें कसा देह दंडित करीत होते आणि दुसऱ्यासाठीं आपला देह कसा झिजवीत होते व आपल्या भक्तांची संकटें कशी निवारीत असत, हें पुढील अध्यायांत स्पष्ट करण्यांत येईल; तें ऐकून श्रोते संतुष्ट होतील अशी आशा आहे.

अशा रीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरित केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाई समर्थ सच्चरितलाचा " रामजन्मोत्सवादिकथनं " नामें सहावा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्रीसग्दुरुसाईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

—: ● :—

## नरदेहाचा अधिकार

नरदेह हें एक अद्‌भुत यंत्र आहे. हें यंत्र नीट चालणें हें आरोग्य व बिघडणें हा रोग होय. नरदेहरूप यंत्राला पाणी, अन्न दिलें पाहिजे, त्याला वारा पाहिजे, तें स्वच्छ ठेवलें पाहिजे, ह्या सर्व गोष्टी अवश्य केल्याच पाहिजेत; कारण आपणांस " सुयंत्र " शरीर पाहिजे आहे. पण या नरदेहरूप यंत्राचा चालक, प्रेरक, मालक कोण व त्याची चिच्छक्ति कोण आहे हें मुख्यतः जाणलें पाहिजे. जडाच्या ज्ञानावरच तृप्त होणारे जड-वादी आहेत, पण जडाला चालविणारा जो चिन्मय श्रीहरि त्याचें सख्य जोडलें तरच नरदेहाचें सार्थक ! "

" पशुपक्ष्यादि खालच्या योनींतून वर येत येत नरदेहाची प्राप्ति होते. या नरदेहाच्या साह्यानें अनेक संत महानुभाव उद्धरून गेलें. " जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धितें " एवढा अधिकार नरदेहाचा आहे. समर्थांनीं म्हटल्याप्रमाणें कोणी भक्तिपंथाला लागून, कोणी वीतरागी पुरुष गिरीकंदरे सेवून, कोणी तीर्थाटणें करून, कोणी योगाभ्यास, वेदशास्त्राध्ययन व निष्काम कर्माचरण करून, अशा अनेक मार्गांनीं अनेक पुण्यात्मे नरदेहाचें सार्थक करून उद्धरून गेले "

—समर्थ रामदास

श्री ज्ञानेश्वरी अनुवाद—

# अष्टांग योगवर्णनाची " झलक "

अनुवादक : वि. पां. सातपुते, मुंबई

**नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वाचितां टीका ।**
**ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥** श्री. एकनाथ महाराज.

—: * :—

" पुढील अध्यायांतील सकल सुखदुःख निवृत्त करणारा ब्रह्मविद्यायोग भाग्यवाना-वांचून प्राप्त होत नाहीं. तशी स्थिति आतां व्यासांच्या अनुग्रहानें युद्धांत होणारी हकीकत संजयास कळवून ती धृतराष्ट्रास सांगत असतां ब्रह्मविद्या सांगण्याच्या उद्देशानें श्रीकृष्णार्जुन युद्धांत गेले नसतां आणि श्रीकृष्णार्जुन या उभयतांचा निकट संबंध असतांही अर्जुनास ब्रह्मविद्येचें उपोषण होतें, म्हणून अर्जुनास मोह उत्पन्न होऊन तो श्रीकृष्णास शरण गेला तेव्हां त्याच्या मोहनिवृत्तीकरतां ब्रह्मविद्या सांगण्याचा श्रीकृष्णास सहजच प्रसंग आला. त्यामुळें अर्जुनाचें ब्रह्मविद्या उपोषणाचें पारणें फिटलें तेव्हां तो ब्रह्मविद्या श्रवणाचा लाभ संजय व धृतराष्ट्र यांस पाहुण्याप्रमाणें आयताच प्राप्त झाला. "

वरील अवतरण ब्रह्मीभूत विनायक महाराज साखरे संपादित ज्ञानेश्वरींतील ५ व्या अध्यायाच्या तळटीपेचें आहे.

## अभ्यासयोगाचें महत्त्व

ज्ञानेश्वरी सहाव्या अध्यायास सांप्रदायिक संकल्पामध्यें अभ्यासयोग किंवा ध्यान योग असें नांव आहे. पुढें दहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं 'विनोदें वाखाणिलेल्या' नऊ अध्यायांच्या विषयाचा अनुवाद करितांना ज्ञानेश्वरांनीं सहाव्या अध्यायासंबंधीं, 'तैंचि षष्ठामाजीं प्रगट । आसना लागोनि स्पष्ट । जीवात्मभाव एकवट । होती जेणें ॥ तैसी जे योगस्थिति । आणि योगभ्रष्टां जे गति । ते आघवीचि उपपत्ती । सांगितली षष्ठीं' ॥ ( ज्ञा. ६/२६-२७ ) असें म्हटलें आहे.

गीता व ज्ञानेश्वरी या दोहोंच्याही सहाव्या अध्यायाचा प्रतिपाद्य विषय योगाभ्यासवर्णन हा आहे; परंतु प्रत्यक्ष वर्णनाचे गीतेंतील श्लोक एकंदर ४० पैकीं फक्त सहा ( १० ते १५) आहेत परंतु यावरील ज्ञानेश्वरी टीका २४० ओंव्यांची, म्हणजे एकंदर अध्यायाच्या सुमारें निम्या विस्ताराची आहे. या विस्ताराचें कारण अष्टांगयोग ज्ञानेश्वरांना अनुभवगत होता व अवतरणांत म्हटल्याप्रमाणे जर कोणा भाग्यवानाची या अभ्यासाकडे प्रवृत्ति झाली तर त्यास या कामीं प्रक्रियेचें व खांचखळग्यांचें सांकडें पडूं नये म्हणून कृपाळू माउलीनें आपला अनुभव गीतेंतील उपरिनिर्दिष्ट सहा श्लोकांच्या

टीकेच्या निमित्तानें जगास उपलब्ध करून दिला. ज्ञानेश्वरांस योगाभ्यास अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा होता; म्हणून त्यांनीं या मार्गास "पंथराज" अशा वर्णनानें गौरविलें आहे.

कांहीं प्रसंगीं असें पाहण्यांत वा ऐकण्यांत येतें कीं, ज्ञानेश्वरीच्या निरूपण-प्रवचनांत हा अध्याय धांवता किंवा सारांश रूपानें ( cursorily ) सांगितला जातो व क्वचित् प्रसंगीं योगविषयक भाग डावललाही जातो ( by pass ). या मुख्य वर्णनाच्या आधारें ज्ञानेश्वरींत अनेक ठिकाणीं टीकेच्या ओघांत योगाभ्यासाचीं लहानमोठीं वर्णनें आहेत, पण मूळ वर्णनाशीं पुरेसा परिचय नसल्यामुळें याही इतर ठिकाणच्या वर्णनांचें रसग्रहण व्हावयास हवें तसें होत नाहीं. असो.

## झलक म्हणण्याचें कारण

एवंगुणविशिष्ट अष्टांग योगवर्णनाचा अगदीं थोडक्यांत ( म्ह. ६ ओंव्यांत ) समर्पक उपमांनीं सारांश सांगितला आहे व याचाच विस्तार पुढें सुमारें २५० ओंव्यांत केला आहे. प्रथम सारांश व नंतर त्याचा विस्तार ही व्याख्यानाची पद्धतीच आहे. वारकरी कीर्तनांतही पूर्वरंगांत निरूपणाच्या अभंगाचा ' गोलार्थ ' व उत्तरार्धांत ' स्पष्टार्थ ' सांगितला जातो. रेडिओंतही ' आजच्या कांहीं ठळक बातम्या ' व ' आतां सविस्तर बातम्या ऐका ' हे शब्दप्रयोग सर्वांस सुपरिचित आहेत. म्हणून सारांशरूप या सहा ओंव्यास या लेखाच्या शीर्षकांत ' झलक ' असें म्हटलें आहे. सदर ओंव्या अशा:—

येणें यमनियमांचे तळवटें । रिगे आसनाचिये पाउलवाटे । येई प्राणायामाचे नि आडकांठें । वरौता गा ॥ मग प्रत्याहाराचा अधाडा । जो बुद्धिचियाही पाया निसरडा । जेथ हटिये सांडिती होडा । कडेलग ॥ तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्याहारीं निराळें । नखी लागेल ढाळें ढाळें । वैराग्याची ॥ ऐसा पवनाचेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें । क्रमी ध्यानाचें चंवरें । सांपडे तंव ॥ मग तया मार्गाची धांव । पुरेल प्रवृत्तीची हांव । जेथ साध्यसाधना खेंव । समरसें होय ॥ जेथ पुढील पैसे पारुखें । मागील स्मरावें तें ठाके । ऐसिये सरिसीये भूमिके । समाधि राहे ( ज्ञा. ६।५५–६० ).

या सहा ओंव्यांत योगाच्या अष्टांगांचें दिग्दर्शन व त्यांच्या साध्यतेची समर्पक उपमांनी कमी अधिक कष्टसाध्यता गोंविली आहे. थोडक्यांत असें म्हणतां येईल :— ( १ ) यम व ( २ ) नियम—तळवटें, ( ३ ) आसन—पाऊल वाट, ( ४ ) प्राणायाम—आडकंठ, ( ५ ) प्रत्याहार ( इंद्रियें अंतर्मुख करणें ) आधाडा, ( ६ ) धारणापैसारा, ( ७ ) ध्यान—चवरें व ( ८ ) समाधि—शिखर किंवा माथा. आतां या उपमांतच या अंगांचा लक्ष्यार्थ कसा सामावला आहे तें पाहूं.

अभ्यासकाच्या भूमिकेवरून या अभ्यासमार्गाचें दूर अंतरावर असलेल्या चढणीच्या डोंगराची उपमा दिली आहे. मराठींतील ' दुरून डोंगर साजरे ' या म्हणीप्रमाणें नुसते पाहतांना, पथीं वाचतांना किंवा विचार करतांना योगाभ्यास सोपा आहे किंवा असावा

असें वाटतें पण हें वाटणें व प्रत्यक्ष अनुभव यांतील अंतर प्रत्यक्ष अभ्यासास लागल्या-वरच अनुभवास येऊं लागतात—दुरून हिरवागार गोंडस दिसणाऱ्या डोंगराजवळ जों जों जावें तों तों त्या मार्गांतील खांचखळगे व काटे–कुटे अनुभवास यावेत त्याप्रमाणें ज्ञाने-श्वरांच्या वरील उपमा समजावून घेतांना ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

**अनेक आडवळणांचा मार्गः—**

यम–नियम म्हणजे ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांचा संयम किंवा निग्रह. या अभ्यासास "तळवट" म्हणण्याचें कारण असें कीं या सपाटीच्या मार्गांत चढण नसली तरी कांटे व खळगे असण्याचा संभव आहे. आणखी, हा मार्ग क्रमिण्यासाठीं रुळलेली अशी वाट नाहीं. अनेक आडवळणांनींहि या मार्गाच्या पलीकडे जावें लागेल. तात्पर्य यमनियमांचा मार्ग जरी इतर पुढील टप्यांइतका क्रमण्यास कमी कष्टप्रद असला तरी हा अभ्यास दीर्घकालानें साध्य आहे. कदाचित हा कालावधि, अनंत काळाच्या तुलनेनें, कांहीं जन्मांचाही असेल कांहीं पूर्वाभ्यास संचिताच्या जमेस असेल तर हा कालावधि त्या प्रमाणांत कमी होईल.

यानंतर आसनास 'पाऊलवाट' म्हटलें आहे. ही सुद्धां भली लांबलचक आहे, संपत संपण्यासारखी नाहीं, परंतु यमनियमांच्या सिद्धीनंतर आसनाच्या पायरीस आल्यानंतर योगाभ्यासास कांहीं निश्चितता येते असें म्हणण्यासाठीं, मागील तळवटाच्या तुलनेनें आसनास पाऊलवाट म्हटलें आहे. आसन जयाचा कालावधि ज्ञानेश्वरांनीं तत्संबंधीं या सहाव्या अध्यायांतील १२ व्या श्लोकावरील टीकेंत सुरवातीसच अहंकाराचें काठिण्य विरेपर्यंत एकाग्र चित्तानें सद्गुरुस्मरण करावें व नंतर आसनस्थ व्हावें (ज्ञा. ६–१८७) हें काठिण्य केव्हां विरेल हें व्यक्तीवर अवलंबून आहे. नंतर प्राणायामास आडकंठ म्हटलें आहे. एक तर प्राणायामाचा मार्ग कंठ हा आहे व तो सूक्ष्महि आहे म्हणून,व डोंगराच्या उपमेच्या दृष्टीनें आसनानंतरचा प्राणायामाचा मार्ग चिंचोळा आहे म्हणजे काळजीपूर्वक क्रमावयाचा आहे, अशा दोनहि अर्थांनीं प्राणायामास 'आडकंठ' असें अन्वर्थानें म्हटलें आहे. ज्या अर्थानें आपण इंग्रजीमध्यें (Bottle Neck) शब्द वापरतो तोच अर्थहीं येथेंहि अभिप्रेत आहे.

**इंद्रियांची अंतर्मुखता**

यानंतर प्रत्याहार म्हणजे बहिर्मुख इंद्रियें अंतर्मुख करणें. यास "आधाडा" म्हणजे अर्धवट तुटलेला सरळ कडा म्हटलें आहे. हा अभ्यास अत्यंत कठीण आहे. एवढी बळकट बुद्धि पण तिचेही पाय या कड्यावर ठरत नाहींत म्हणून कित्येक अभ्यासक या कड्याच्या पायथ्याशीं येतांच याच्या दुर्गमतेमुळें योगाभ्यासाचा "होडा सांडतात" म्हणजे प्रयत्न सोडून देतात. ज्ञानेश्वर म्हणतात, असें असलें तरी वैराग्याच्या बळकट नखांचें (घोरपडी प्रमाणें) साह्य असेल तर या कड्यावरसुद्धां वैराग्यनखांच्या आधारानें हळू हळू निश्चयाच्या बळावर चढता येतें.

यापुढील पायरी धारणा म्ह. चित्त स्थिर करण्याची. चित्त जात्या चंचल असल्यानें त्यास स्थिरता असणें म्हणजे वाऱ्यास कोंडण्याइतकें कष्टपद आहे. म्हणून या अभ्यासास "पवनाच्या पाठारा" वर म्हणजे वायुरूप घोड्यावर स्वार होणें असें ज्ञानेश्वरांनीं उपमा ओंवींत म्हटलें आहे. चित्तस्थैर्य झाल्यानंतर त्यापुढील ध्यानाच्या पठारांतून समाधीच्या शिखराकडे जाण्याचा मार्ग आहे. हा ध्यानाच्या पठाराचा विस्तृत मार्ग, चित्तस्थैर्यरूपी वाऱ्याच्या घोड्यावरची मांड कायम ठेवून, समाधीच्या शिखराप्रत पोंचेपर्यंत दीर्घकाल क्रमावयाचा आहे. हाही कालावधि किती असेल तें अभ्यासकाच्या पूर्वतयारीवर अवलंबून असेल व तो एका मानवी आयुष्यापेक्षां जास्तही असेल.

## शिखराची प्राप्ति

अशा प्रकारें, यमनियमांपासून ध्यानापर्यंच्या सात पायऱ्यांचा यथाक्रम यथाकाल व यथायोग्य अभ्यासक्रम झाल्यानंतर मग समाधि–अवस्थेचें जें अपेक्षित शिखर त्याची प्राप्ति होते. त्या अवस्थेंत गेल्यांनंतर पुढें अभ्यासच नसल्यामुळें प्रयत्न आपोआपच विराम पावतात. आतांपर्यंत केलेल्या पूर्वाभ्यासाचा विचार करण्याचीही, ज्याप्रमाणें पालखीपदस्थास पादत्राणांचा विचार करण्याची जरूरी वाटत नाहीं, त्याप्रमाणें, अभ्यासकास आवश्यकता वाटत नाहीं. ज्या अवस्थेंत भेद नांवापुरता सुद्धां राहात नाहीं, जेथें सर्वत्र समबुद्धि बाणते, त्या अवस्थेचा लाभ या मार्गाचा संप्रदायपूर्वक व सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखालीं अभ्यास करणारास होतो असा ज्ञानेश्वरांचा अनुभव व आशीर्वाद आहे.

योगाभ्यासाच्या परिपूर्णतेस कांहीं जन्मांचाही काल लागण्यासारखा आहे. एका जन्मांत हा अभ्यास पुरा होणें अशक्य आहे. तेव्हां या मार्गांत असतांना 'माझारीचि आयुष्यभानु हारपला' तर त्या अभ्यासकाचें व त्याच्या अभ्यासाचें काय होतें हा प्रश्न अर्जुनानें स्वतःच्या वतीनें व इतर मुमुक्षूंच्याही वतीनें भगवंतांस विचारला, व त्याचें तें सांकडें भगवंतांनीं 'पार्थ नैवेह नामुत्र' या श्लोकांत (गीता ६–४०) या श्लोकांत, त्याचा अभ्यास वायां जात नाहीं. हाच अभ्यास काय परंतु 'कश्चित् कल्याण कृत्' कोणतेंही कल्याणकारक कर्म दुर्गतीस जात नाहीं इ. अशा शब्दांत फेडिलें आहे.

---

'**श्रीसाई भक्तांस सूचना**'—या मथळ्याखालीं भक्तांच्या सुखसोयीसाठीं कांहीं सूचना गेल्याअंकीं प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. त्यांतील तिसऱ्या सूचनेंत 'सार्वजनिक हॉल' या ऐवजीं सार्वजनिक हॉटेल हा शब्द नजरचुकीनें पडलेला आहे. अनेक भक्तांना आलेले अनुभव लक्षांत घेऊन व बारकाईनें निरीक्षण करीत असतां ज्या अडचणी नजरेस आल्या, त्या लक्षांत घेऊन श्री साईबाबा शिरडी संस्थानचे सन्माननीय विश्वस्त श्री. द. दा. रासने यांनीं सुचविलेल्या त्या महत्त्वाच्या सूचना आहेत.

---

> ‘ कोठेंही जा साधूंचें वर्तन । अथवा त्यांची रहाणी चलन ।
> एकाचें एक एकाचें आन । नसतें समसमान कोठेंही ॥’

# तेथें कर माझे जुळती

ले. नागेश आ. सावंत

आपला महाराष्ट्र सत्पुरुषांनीं व साधु-संतांनीं गेल्या शेंकडों वर्षांपासून गजबजत आलेला आहे. श्री ज्ञानदेवापासून तों श्रीसाईबाबापर्यंतच नव्हे तर आजही संतपदाला पोहोंचलेले व सर्वांना वंदनीय होऊन राहिलेले थोर महात्मे या महाराष्ट्रांत वावरत आहेत व जनतेला शाश्वत सुखाचा मार्ग दाखवीत आहेत.

जनतेला त्यांच्याबद्दल सहाजिकच पूज्यभाव वाटतो. त्यांचें किंवा त्यांच्या समाधि स्थानाचें दर्शन घेणें, त्यांची पूजाअर्चा व आराधना करणें व अशा रीतीनें त्यांच्या कृपाप्रसादास पात्र होण्यासाठीं झटणें हें आपलें एक कर्तव्य आहे असें प्रत्येक श्रद्धाशील भक्ताला वाटत असतें.

जेथें जेथें दिव्यत्व व साधुत्व दिसून येईल, तेथें माणसाची मान आदरपूर्वक वाकते. मनुष्यप्राणी हा दिव्यत्वाचा व सद्‌गुणांचा भोक्ता आहे. ‘ दिव्यत्वाची जेथें प्रचीति । तेथें कर माझे जुळती ’— हा मनुष्य स्वभावच होऊन राहिला आहे.

## सर्वांचें ध्येय मात्र एक

संतांना आत्मसाक्षात्कार झालेला असतो. त्यांच्याठायीं देवत्व आलेलें असतें. अर्थात् सर्वसाधारण माणसांपेक्षां ते श्रेष्ठ असतात; आणि त्या श्रेष्ठत्वामुळें मनुष्य त्यांच्याकडे सहाजिक आकर्षिला जात असतो. परंतु सर्व संतांची रहाणी, वागणें सवरणें एकसारखें असतें असें मात्र नाहीं. प्रत्येकांत कांहीं ना कांहीं भिन्नत्व असतेंच. जितक्या व्यक्ति, तितक्या प्रकृति. त्याचप्रमाणें संतांचेंही असतें. त्या सर्वांचें ध्येय मात्र एक असतें. सर्वांच्याठायीं भूतदया असते. लोककल्याण हेंच सर्वांचें ध्येय असतें. तें साधण्याचे मार्ग मात्र भिन्न असतात.

बाबांनीं सांगितलें आहे कीं, –‘ कोठेंही जा साधूंचें वर्तन । अथवा त्यांची रहाणी चलन । एकाचें एक, एकाचें आन । नसतें समसमान कोठेंही ॥ त्याच प्रमाणें ‘ एका संताचें आचरण । तें न दुजिया संता प्रमाण । योग्या योग्यतेनें अनुमान । कराया साधन हें नव्हे ॥

बाबांनीं केलेलें हें निदान प्रत्येकानें विचार करण्यासारखें आहे. कोणाचें आराध्य दैवत ज्ञानेश्वर माउली तर कोणाचें तुकोबा असूं शकेल; त्याचप्रमाणें कोणाचा

भक्तिभाव साईबाबांच्या ठिकाणीं जडला असेल तर कोणाचा अक्कलकोटस्वामी महाराजांच्या ठायीं दृढ झालेला असेल; व म्हणून आपलें नित्याचें आराध्य दैवत सोडून दुसऱ्या दैवताकडे वळणें यांत कांहीं तरी गैर आहे असें वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं दिव्यत्वाची प्रचीति होईल व साधुत्व आढळून येईल, तेथें तेथें हात जोडले जाणें हा स्वभावधर्म आहे. त्यांत वावगें कांहीं नाहीं. भक्तिभावानें व श्रद्धेनें कोणत्याही संताला नमस्कार करा; तो भगवंताकडेच रुजू होणार याची खूणगांठ आपण बांधून ठेविली पाहिजे. मी अमक्या संताचा भक्त मग दुसऱ्या संताचा किंवा त्यांच्या प्रतिमेची पूजाअर्चा कशी करूं ? अशी शंका मनांत येण्याचें कारण नाहीं. कोणत्याही देवाला नमस्कार केला तरी तो वासुदेवालाच पोहोंचणार.

श्री साईबाबा असोत, श्री रामकृष्ण परमहंस असोत, अथवा श्री रमण महर्षि असोत. तुमची श्रद्धा व तुमचा भक्तिभाव ज्यांच्या चरणीं जडला असेल, त्यांच्या आराधनेंत रत व्हा; परंतु इतर संतांकडेही त्याच पूज्य भावनेनें पहा. कोठेंही द्वैताला आसरा देऊं नका.

कारण बाबांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ केवळ जगाचिया उपकारा। चुकवाया जन्ममरणाचा फेरा। त्यागुन निर्गुण निराकारा। आले हे आकारा संत जगीं ॥ ’

## दिव्यत्वाचे पुजारी बना

पूर्व संस्कारानुसार आपलें मन नाना प्रकारच्या शंका कुशंकांच्या जाळ्यांत गुरफटलेलें असतें. ते जाळें तोडून टाकून व आकुंचित भावनांचा त्याग करून आपण साधुत्वाचे व दिव्यत्वाचे पुजारी बनलें पाहिजे. मग तें दिव्यत्व कुठेंही आढळून येवो.

प्रत्येक सत्पुरुषाचें कांहींना कांहीं वैशिष्ट्य असतेंच. त्यांची वागणूक, खाणें पिणें, फिरणें सवरणें व भक्तांशीं वागणें वैचित्र्यपूर्ण व विविध स्वरूपाचें असतें. जें आपणास गलिच्छ व हीन वाटतें अशा गोष्टीही त्यांच्या आचरणांत कधीं कधीं येतात. श्रीरामकृष्ण परमहंस,श्रीसाईबाबा, श्री साटम महाराज, श्री गुलाबराव महाराज,अक्कलकोटचे स्वामीमहाराज श्रीगजानन महाराज ( शेगांव ) वगैरे अशा कितीतरी सत्पुरुषांचीं नांवें या दृष्टीनें पहातां आपल्यापुढें येतात. म्हणून का त्यांच्या श्रेष्ठपणांत कमतरता येत असते ? ते साक्षात्कारी सत्पुरुष. ब्रह्मतत्त्वाची त्यांना ओळख पटलेली. कोण पाहील त्यांच्याकडे भलत्यासलत्या दृष्टीनें !

या सर्वांकडे पहाण्याचा आमचा दृष्टिकोन व्यापक असला पाहिजे. एकाचें पुण्यस्मरण म्हणजे दुसऱ्याची अवज्ञा, ही समजूत चुकीची व आकुंचितपणाची आहे. तिला आपण केव्हांही थारा देतां कामा नये. ‘सर्वांभूतीं समभाव.’ अशा सत्पुरुषांकडे आपण समदृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. जो एकाला भक्तिभावानें नमस्कार तोच सर्वांना. त्यांच्या ठायीं आपला दुजाभाव असतां कामा नये. ‘ **सर्व संतीं समानत्व** ’ अशीच आपली भावना असावी व तीच तारक होऊन रहाणारी आहे.

# संत तिरुवल्लुवार

लेखक : भवानीशंकर नीळकंठ वागळे.

संत तिरुवल्लुवार या नांवाचा एक महान् साधु इ. स. १०० मध्यें दक्षिण भारतांत होऊन गेला. त्याला मुनिवाहन असेंही एक दुसरें नांव होतें. आणि तो जातीनें चांडाळ होता. तो संगीतविद्येंत प्रवीण असूनही परमेश्वराचा परमभक्त होता. तो कित्येकदां भजन करतां करतां बाह्यज्ञानशून्य होत असे. एके दिवशीं संत तिरुवल्लुवार सुप्रसिद्ध कावेरी तीर्थ श्रीरंगम् मधील नदी किनाऱ्यावरून गात जात असतां रस्त्यांतच बेशुद्ध होऊन पडला. आणि त्याच वेळीं श्रीरंगनाथजींचा एक पुजारी ठाकुरजीच्या पूजेसाठीं कावेरीचें पाणी आणण्यास जात होता. एका चांडाळानें रस्ता अडविल्याचें पाहून पुजारी अत्यंत संतप्त झाला व रागाच्या भरांत त्यानें बेशुद्धावस्थेंत पडलेल्या तिरुवल्लुवारला बेदम मारलें. जवळ जवळ समाधिस्त असलेला संत शुद्धीवर आला व त्यानें रस्त्यावरून गमन केलें. त्यानंतर पुजारी पवित्र हस्तें पाणी भरून मंदिराकडे पोंहचतो न पोंहचतो तोंच त्याला मंदिराचा दरवाजा आंतून बंद झालेला आढळला. पुजाऱ्याला फार आश्चर्य वाटलें व त्यानें लगेच भगवंताची भक्तिभावनेनें प्रार्थना केली व हात जोडून म्हटलें कीं, हे प्रभो! माझ्या हातून जाणून, न जाणून अपराध झाला असल्यास क्षमस्व!' मंदिरांतून त्वरित आज्ञा झाली कीं, 'जर तूं माझ्या त्या चांडाळ भक्ताला तुझ्या खांद्यावर बसवून मंदिराला प्रदक्षिणा घालशील तर लगेच दरवाजा उघडला जाईल.'

पुजारी फार शरमला व त्यानें अति पश्चात्तापपूर्वक भगवंताच्या आज्ञेचें अक्षरशः पालन करतांच मंदिराचा दरवाजा खाडकन् उघडला गेला. भक्ताची लाज भगवंतालाच असते, यांत काय संशय?

---

सुख असो, दुःख असो; आवडत्या गोष्टी घडोत वा नावडत्या गोष्टी घडोत—जें कांहीं भोगणें प्राप्त आहे तें धीटपणें भोगावें. त्याबद्दल कुरकूर करूं नये.

—व्यास महर्षि

धर्माचें मूळ काय?—दक्षता. यशाचें मूळ कोणतें?—दान. स्वर्गप्राप्तीचें एकमेव साधन कोणतें?—सत्य. सुखाचें साधन कोणतें?—शील. माणसाचा आत्मा कोणता?—पुत्र. माणसाला देवानें दिलेला मित्र कोणता?—भार्या. पृथ्वीपेक्षां मोठी कोण?—आई. आकाशापेक्षां उंच कोण?—बाप. उत्तम लाभ कोणता?—आरोग्य. साधु कोणाला म्हणावें?—सर्व भूतमात्रांचा हितकर्ता.

—व्यास महर्षि

---

'श्रीसाईबाबांना का संस्कृत येत आहे? आपण संस्कृतज्ञ!' अशी श्री. नानासाहेब चांदोरकर यांची समजूत; परंतु बाबांनी त्यांचा भ्रमनिरास अत्यंत परिणामकारक रीतीनें केला.

# नानासाहेबांचा भ्रमनिरास

'उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः'

एकदां भक्तश्रेष्ठ कै. नानासाहेब चांदोरकर हे द्वारकामाईंत भगवद्गीतेच्या ४ थ्या अध्यायांतील ३४ वा श्लोक " तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ " म्हणत द्वारकामाईंत गेले. बाबा तेथें बसले आहेत. ते नानांना विचारतात कीं नाना, काय रे गुणगुणतो आहेस ? नानासाहेबांनीं उत्तर दिलें, " बाबा, तें संस्कृत आहे. " सारांश ! बाबांना संस्कृत येत नाहीं तर त्यांना काय समजणार ! बाबांनीं अत्यंत नम्रपणानें उत्तर दिलें, " अरे, संस्कृत येत नसलें म्हणून काय झालें ! सांगशील तर खरा. मला नाहीं समजलें तर तूं मला समजावून सांग. "

नानासाहेब हे संस्कृत घेऊन त्यावेळीं बी. ए. झाले होते व त्यांचें संस्कृतचें वाचन व अभ्यास खरोखरच चांगला होता. बाबांनीं वरीलप्रमाणें म्हटल्याबरोबर नानासाहेबांना जरा अभिमान वाटला व त्या तोऱ्यांत त्यांनीं उत्तर दिले कीं 'बाबा, सोपा आहे अर्थ या श्लोकाचा; 'तुला जर ज्ञानाचा उपदेश पाहिजे असेल तर तत्त्व जाणणारे जे लोक आहेत, त्यांना सारखें विचारून व त्यांची सेवा करून, तुला मिळूं शकेल.'

बाबांनीं हा अर्थ ऐकून घेतला व एकेक प्रश्न विचारावयास सुरुवात केली ' नाना, ज्या श्रीकृष्णांनीं ७०० श्लोकी गीता सांगितली कीं ज्या गीतेची महति, त्याची जगतांत माहिती असलेल्या सर्व भाषांमध्यें भाषांतरें झालीं आहेत, त्या श्रीकृष्णानें तत्त्व जाणणाऱ्या लोकांच्याकडे कां बोट दाखवावें ? "

## हा मायेचा खेळ

नाना विचार करावयास लागले कीं खरेंच, ज्यांना संस्कृत येत नाहीं असा आपला समज, त्या बाबांच्याकडून अशा रीतीचा खोल अर्थ असलेला प्रश्न विचारला जावा हें आश्चर्य आहे; हा विचार मनांत येतो तोंच बाबांचा दुसरा प्रश्न त्याहूनही विस्मयजनक—बाबा म्हणतात, ज्ञानाचा कसला उपदेश करायचा ! उपदेश करावयाचाच असेल तर तो अज्ञानाचा. कारण अज्ञान कोठें आहे हें समजलें कीं ज्ञानाचा आपोआप उदय होतो. ज्ञान हा बोलण्याचा अगर वाचेचा विषय होऊंच शकत नाहीं; ज्याप्रमाणें गर्भावर वार, किंवा आरशावर मळ किंवा वन्हीवर राख त्याचप्रमाणें ज्ञानावर अज्ञानाचें आवरण असतें. एवढ्याकरितांच वार, मळ, किंवा राख याचा ज्यावेळेला नाश होतो किंवा केला जातो, तेव्हां गर्भ,

आरसा किंवा वन्ही ह्यांच्या खऱ्या स्वरूपाचा आविष्कार होतो; ज्ञान हें स्वयंसिद्ध आहे, व ज्याप्रमाणें शेवाळींनीं युक्त असलेलें पाणी, शेवाळें काढून टाकल्याबरोबर, शुद्ध पाणी रहातें; चंद्र सूर्यांच्या ग्रहणांचें उदाहरण घेऊं; चंद्र व सूर्य हे सर्वकाळ प्रकाशमान आहेत; राहु व केतू आड येऊन आमच्या डोळ्यांच्यावर पडदा निर्माण करतात; त्या पडद्यामुळें चंद्रसूर्यांना कधींच बाध येत नाहीं; तो फक्त आमचा दोष आहे; स्वयंसिद्ध वस्तू जेथल्या तेथें अबाधित अशाच आहेत व रहातात. डोळ्याची बघण्याची शक्ति हें ज्ञान; त्या डोळ्यावर येणारा पडदा हें अज्ञान; ह्या अज्ञानाचें निरसन करणें हें अवश्य आहे व तें निरसन झाल्यावर डोळ्यांची उपजत असलेली शक्ति कायमच आहे. ती शक्ति निर्माण करण्याचा अगर त्या शक्तीचें ज्ञान करून घेण्याचा प्रश्न उद्भवतच नाहीं; जें जें आपल्या डोळ्यांला दृग्गोचर होणारें विश्व हा सगळा मायेचा खेळ आहे—तिलाच अनादि, अविद्या अगर अज्ञानाचा विलास असें म्हणतात. सबब ज्ञान ही वस्तु उपदेश करण्यासारखी नव्हे; ती उदय पावणारी व अनुभवास येणारी अशी वस्तु आहे; प्रणिपात व परिप्रश्न व सेवा ही गुरुकृपा संपादन करावयाचीं केवळ साधनें आहेत. विश्व—डोळ्यांना दिसणारें, समजणारें विश्व—सत्य मानणें हाच मोठा भ्रम आहे, व हेंच ज्ञानाच्यावर असलेले तम म्हणजे अज्ञान आहे. ( म्हणून तमसो मां ज्योतिर्गमय—म्हणजेच अंधारांतून मला प्रकाशाकडे ने असें श्रुतिवचन आहे. )

खऱ्या ब्रह्माचा उलगडा व्हावयास वरील अज्ञानाचा पहिल्याप्रथम निकाल लावावा लागतो. संसाराचें बीज अज्ञान आहे; पण आपल्या डोळ्यांमध्यें ज्यावेळीं गुरु कृपेचें अंजन पडतें त्यावेळीं मायेचें आवरण उडून, जें रहातें तें स्वाभाविक ज्ञान; ज्ञान ही कांही साध्य गोष्ट नव्हे, ती मूळपासूनच स्वयंसिद्ध आहे हें वेदांनीं व श्रुतिस्मृतींनीं सांगितलेलें आहे. देव व भक्त यांच्यांत भिन्नपणा आहे, अगर तो दिसणें हेंच मोठें विलक्षण अज्ञान आहे; त्या अज्ञानाचा नाश झाला कीं जें शिल्लक रहातें तें पूर्ण ज्ञान; जोपर्यंत मी व माझे सद्गुरु असा भाव शिल्लक आहे, तोपर्यंत तें द्वैतच आहे. ज्यावेळीं मी व सद्गुरु यांत कांहींही फरक नाहीं याचें ज्ञान होऊन अनुभव येतो, त्यावेळीं त्या आनंद स्थितीचें वर्णन करणें अशक्य आहे. ज्याप्रमाणें खडीसाखरेची गोडी वाणीनें वर्णन करण्यापेक्षां, त्याच्या अनुभवानेंच पूर्णपणें समजूं शकते, ह्यावरून साईसच्चरित अध्याय १९ ओवी ११७ ची आठवण झाली. ' ती सवंच शर्करा माझे हातीं । बाबा रिचविती आणि वदती । या साखरेवाणी होईल स्थिती । ठेवितां चित्तीं ही गोष्ट

**ज्ञानोदयाचा क्षण**

वेदांतामधील नेहमींच्या परिचयाचें उदाहरण द्यावयाचें झालें तर काळोखांत पडलेल्या दोरीच्या ठिकाणीं जसा सापाचा आभास होणें हें मूळ स्वरूपाचें अज्ञानच नाहीं कां ! तें अज्ञान गेल्यावर काय राहिलें ? दोरीचें ज्ञान—तेथें दोरीच होती व दोरी राहिली. पण मध्यंतरींच्या आपल्या अज्ञानामुळें त्या ठिकाणीं सापाचें अस्तित्व निर्माण होऊन आपल्या मनांत भीति निर्माण केली; अंतरीं शंभर नंबरी सोनें पण वर मळ सांठलेला,

तो मळ काढून टाकावयाला अग्नीचा आश्रय करावा लागतो; या मृत्यु लोकांतील देहाचा जन्मच मायेच्या पोटीं. त्या देहाचा व्यापार अदृष्टाच्या हातीं; द्वंद्वामुळें सर्व गोष्टी अदृष्टाधीन वाटतात; व अशा देहाविषयीं अभिमान हें मोठें अज्ञान; म्हणून जे स्वतः निराभिमान असतात, त्यांना सुखदुःखाचें भान नसतें, म्हणजेच ज्यावेळेला अहंकाराचा लय होतो, तोच क्षण अज्ञान नाशाचा व ज्ञानोदयाचा. आपल्याला स्वरूपाचें अज्ञान हीच मायेची जननी आहे व ज्यावेळीं गुरुकृपारूप औषध मिळतें त्याचवेळीं ह्या जन्म-मरणाचा क्षय होतो. भगवद्भक्तीशिवाय ह्याला दुसरें उत्तम साधन नाहीं. ब्रह्मदेवसुद्धां मायाजालांत गुंततो व भक्तीशिवाय त्याला त्याच्यातून सुटका नाहीं. लोक म्हणतात कीं माया हा भ्रम आहे; ती खोटी आहे. परंतु ती महाचेटकी आहे; ज्ञानी लोकांनासुद्धां घटकेघटकेला, क्षणाक्षणाला भ्रमांत पाडते; परंतु भक्त मात्र तिला चुटकीप्रमाणें नाचवितात; जेथें ज्ञानी लोक फसतात तेथें भाविक लोक टिकतात; कारण ते हरिचरणांना शरण गेलेले असतात व ज्ञानाचा अभिमान निर्माण झालेले ज्ञानी असतात. इंद्रियरूपी रथाला मनरूपी लगाम आहे व तो बुद्धीनें आवरावयाचा असतो. शब्दरूपी विषयाला हरीण भुलतो व आपला प्राण गमावून बसतो. स्पर्शरूपी विषयानें हत्ती आकर्षित होतो पण अंकुशाचा मार सहन करावा लागतो. रूपविषयानें पतंगाला भ्रम होतो व तो आपलें अंग जाळून घेतो. रसास्वादाकरितां मासा आपले प्राण घालवितो; व गंधामध्यें गुंतून भ्रमर कमलकोशांत अडकतो; ह्या एक एक विषयाची ही अवस्था, तर ज्या ठिकाणी पांचांचा समुदाय आहे तेथें केवढें संकट आहे याची कल्पना करावी. तेव्हां चित्तानें हरिगुरूचिंतन, कानानें हरिकथा अगर सद्गुरुलीलांचें श्रवण, नामस्मरण जिव्हेनें व मनानें हरीचें किंवा सद्गुरुचें ध्यान, चरणांनीं हरीच्या अगर सद्गुरूंच्या तीर्थक्षेत्रीं गमन व प्रदक्षिणा, नाकानें सद्गुरूंच्या निर्माल्याचा सुवास ग्रहण करणें, हातानें सद्गुरु चरणांवर वंदन, व डोळ्यांनीं सद्गुरूंचें दर्शन, ह्याप्रमाणें इंद्रियांना संवय लाविली, तर भगवद्भक्ती काय वेगळी आहे कां ?

## ज्ञान व अज्ञान यांचें मिश्रण

ज्ञानी माणसांच्या मनांतही जर विकल्प अगर संशय निर्माण झाला तरी ज्ञानाचा नाश होतो. दुधानें भरलेली घागर ज्याप्रमाणें आंबलेल्या पेजेच्या थेंबानें नासते, ज्या ज्ञानी माणसाला पैशाचा व वैभवाचा मोह आहे, विषयसेवनांत ज्याचें मन अतृप्त आहे, स्त्रीपुत्रांचें सदैव चिंतन चालू आहे अशा मानवाचें ज्ञानही अज्ञानानें आच्छादिलेलें आहे; म्हणजेच ज्ञानाचाही उदय झाला असतांनासुद्धां पुन्हां त्या ज्ञानावर अज्ञानाचा पडदा अगर शेवाळ येणार नाहीं याचीही खबरदारी घ्यावयास पाहिजे. जो आपल्याला ज्ञानी म्हणून मिरवितो, परंतु वेदबाह्य अगर वेदनिषिद्ध आचरण करतो त्यास जाग आली आहे असें म्हणतां येणार नाहीं. तो अज्ञानाच्या निद्रेंत कुंभकर्णासारखा गर्क आहे असेंच समजावें. दुधानीं तुडुंब भरलेल्या सडाजवळच गोचिड घट्ट चिकटलेलें असतें, पण त्याला आवड अज्ञानाची—रक्ताची—त्याला

शेजारींच असलेल्या शुद्ध दुधानें भरलेल्या सडाची आवड कशी व केव्हां निर्माण होईल! जोंपर्यंत ती निर्माण होत नाहीं, तोंपर्यंत तो अज्ञानरूपी कूपांतच रममाण होत रहाणार; बेडूक व भ्रमर या दोघांचेंहि घर कमळ, परंतु भुंग्याला आहार परागांचा तर दर्दुराला चिखलाचा; पायाळू माणसाच्या डोळ्यांत अंजन पडल्याबरोबर ज्याप्रमाणें भूमिगत धन त्याला दिसतें, त्याप्रमाणें अज्ञान नाशानें ज्ञानधनाचा गड्डा मिळूं शकतो; ज्ञान व अज्ञान यांचे झालेलें मिश्रण विभक्त करावयास पाहिजे, ज्याप्रमाणें तांदुळांत असलेले खडे निवडून काढून, फक्त तांदूळ वैरावयास घेतात; पण हल्लीं सर्व धान्यांत मिसळलेले खडेहि इतक्या कौशल्यानें मिसळलेले असतात कीं ते निवडून काढणेंहि अशक्य होतें. ह्या ज्ञानयज्ञाची सामग्री खालीलप्रमाणें:— 'अहं ब्रह्मास्मि' हा यूप; पंचमहाभूतें हा यज्ञाचा मांडव; जीव व ईश्वर यांमध्ये भेद मानणे हा पशु कीं ज्याचा बली द्यावयाचा; पांच इंद्रियें, व पांच प्राण ही यज्ञाची सामग्री; मन व बुद्धि यांचे कुंड, व त्या कुंडामध्यें अग्नीचें चेतवणें तें ज्ञानाग्नीचें; यजमान, जीव; व यज्ञामध्यें अज्ञानरूपी घृताची आहुति; आत्मानंदरसामध्यें निमग्न राहून ज्ञानाचें स्नान घडतें.

चंदनाच्या वृक्षाच्या मुळाशीं काळसर्पांची वेटोळीं असतात. आपल्या ज्ञानवृक्षाच्या मुळाशीं कामक्रोधरूपी सर्पांची वेटोळी असतात. आपल्याला जर चंदनाची जरूरी असली तर त्याप्रमाणें सापाला वंदन करावयास पाहिजे. त्याचप्रमाणें ज्ञानप्राप्तीसाठीं अज्ञानाचा नाश करावयास पाहिजे, सूर्याच्या किरणांच्यामुळें ज्याप्रमाणें मृगजळाचा भास होतो, एखादें तेजःपुंजरत्न ज्याप्रमाणें केरांत पडून त्याची विस्मृति व्हावी व तो केर काढतांना त्याची प्राप्ति व्हावी, त्याप्रमाणें अज्ञात पडदा बाजूला सारल्याबरोबर ज्ञानाचा उदय होतो. संध्याकाळच्या वेळेस वाटेंत पडलेल्या दोरीवर जसा आपण सर्पाचा संशय घेऊन स्वतः घाबरे होतो पण खिशांतील गुप्तदीप काढून लावून बघतां आपला जसा भ्रम निरास होतो तसेंच या जगाच्या अज्ञानाचें आहे. रात्र पडल्यानंतर दिव्याची जरूरी भासते, पण तोच सूर्योदय झाल्यानंतर ज्याप्रमाणें दिवा तसाच ठेवणें याचें हंसे होतें व तो आपण विझवून ठेवून देतों, एवंच, ज्ञानाचा उपदेश करण्याऐवजीं अज्ञानाच्याच नाशानें ज्ञानमूर्ति प्रकट होते, ह्याच श्लोकाचा अर्थ जास्त संयुक्तिक व व्यावहारिक वाटतो. अर्जुनानेंहि सांगितलें, "यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम" मोहाचा नाश झाला असेंच सांगितलें.

—बाबांच्या बाळाचें बाळ

---

जें कांहीं या जगांत आहे, त्या सर्वांमध्यें ईश्वर व्यापून राहिला आहे. तो आमचें सर्व आचरण पहात आहे. आमच्या मनांत विचार येतांच तो विचार त्याला समजतो. असा ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. त्याला नकळत आम्हीं कांहींएक करूं शकत नाहीं.

—इशोपनिषद्




**************** संकलक : **आमचे प्रतिनिधि** ****************

**शेवटीं उदीच रामबाण ठरली—**

**बा**बांच्या बाळाचें बाळ-गुरुछाया, ठाणें हे घाटकोपर येथील श्री. साळवी यांस बाबांच्या लीलेसंबंधीं आलेले अनुभव कळवितांना लिहितात कीं,

सन १९६० च्या सद्‌गुरु श्रीसाईनाथाच्या गुरुपौर्णिमेचा सोहळा पाहून ठाण्यास परत निघालों असतां मनमाड स्टेशनवर एक दोन्ही पायांनीं दुबळा असलेल्या व हातांत काठी घेऊन लटपटणाऱ्या पायांनीं चालत असलेल्या गृहस्थांस एक स्त्री हात देऊन मनमाड स्टेशनवरच्या भुसावळ पॅसेंजरमध्यें बसवतांना पाहिली. मनांत उत्सुकता निर्माण होऊन त्या साधारण पन्नाशीच्या वयांत असलेल्या गृहस्थाबद्दल अनुकंपा उत्पन्न झाली. पण ती मंडळी दुसऱ्या डब्यांत व आम्हीं दुसऱ्या डब्यांत. ठाणा स्टेशनवर पहांटेस ज्यावेळीं उतरलों त्यावेळीं तीही मंडळी तेथेंच उतरतांना पाहून थोडें आश्चर्य वाटलें व जागृत झालेल्या कुतूहलानें त्या गृहस्थांना त्यांचे नांव विचारलें. त्यांनीं आडनांव साळवी असें सांगितलें व घाटकोपर येथें पोस्टांत नोकरी करीत असल्याचेंही सांगितलें. मीही त्यांना सवडीप्रमाणें ठाण्यास आल्यास घरीं यावें असें सांगितलें. त्यानंतर कुर्ला प्रेसिडेन्सी मॅ. कोर्टांत दि. २५।८।६० रोजीं त्याची पुन्हां गांठ पडली. व त्याही वेळीं त्यांनीं आपण होऊन ठाण्यास येणार असल्याचें सांगितलें. दि. २८।८।६० रोजीं सायंकाळीं सुमारे ७॥ वाजतां माझ्या घरीं श्री. साळवी एकटेच आले. मी दार उघडलें. माझी कल्पना अशी झाली कीं, ते बहुतेक कांहींतरी आर्थिक मदत मागावयास आले असावेत. पण त्याबद्दलची कल्पना न देतां मी त्यांना आंत बोलावून बसविलें व येण्याचें कारण विचारलें. त्यांनीं सांगितलेल्या हकिकतीनें मला अत्यंत आश्चर्य वाटलें व ती हकीकत साईलीलेंत प्रसिद्ध करावी असें वाटल्यावरून हें पत्र आपणांस लिहीत आहें. ती हकीकत अशी—

श्री. साळवी यांची ३२ वर्षें पोस्टांत नोकरी झाली आहे. २० वर्षांपूर्वीं ठाणें येथें पोस्टांत नोकरीस असतां श्री. देशपांडे या पोस्टमास्तरांच्या एका नातेवाइकास स्टेशनवर पोहोचविण्यास निघाले असतां जांभळी नाक्यावर मोटारचा जबरदस्त धक्का लागला व दोन्ही पाय गुडघ्यापाशीं निकामी झाले. श्री. साळवी हे टेंपररी नोकरींत असल्यानें त्यांना आपल्या

नोकरीची भीति वाटली व श्री. देशपांडे पोस्टमास्तर यांनाही वाईट वाटलें व आपल्यामुळें त्या गरीब शिपायावर दुर्धर प्रसंग उद्भवला म्हणून त्यांनीं वरिष्ठांना लिहून श्री. साळवी यांची नोकरी कायम करण्याची शिफारस केली व ती मंजूरही झाली. श्री. साळवी यांची पुढें घाटकोपर येथें बदली झाली व २ वर्षपर्यंत ते पत्रें देण्याचेंहि काम करीत होते; अजून ते कामांत आहेत. पण सध्यां त्यांना ऑफिसमध्यें बसूनच काम करावें लागतें.

दि.२७।८।६० रोजीं साळवी यांनीं जी हकीकत सांगितली ती फारच आश्चर्यकारक आहे. ते घाटकोपर येथें राजावाडी पोस्ट ऑफिसांत काम करतात. त्यांचे वरिष्ठ सिंधी गृहस्थ श्री. दादलानी या नांवाचे आहेत. त्या गृहस्थांची प्रकृति मंगळवार दि.२३।८।६० सकाळपर्यंत चांगली होती, पण मंगळवारी सकाळीं एकाएकी प्रकृती बिघडली व श्री. दादलानी यांनीं रजेकरितां अर्ज टाकला—म्हणजे टाकणेंच भाग पडलें. कारण ते अंथरुणावर निजून राहिले. यातना फार व्हावयास लागल्या, व श्री. साळवी तेथें त्यांच्या घरीं गेले तेव्हां डॉक्टरांना बोलावणें पाठविण्यांत आले होते. डॉक्टरांनीं एक इंजेक्शन दिलें व सांगितलें कीं संध्याकाळपर्यंत जर बरें वाटलें नाहीं तर ताबडतोब शस्त्रक्रिया करणें जरूर आहे. श्री. दादलानीं यांची लघवी अडली होती. श्री. साळवींना श्री. दादलानी ९ वाजतां म्हणाले, 'साळवी, हम तो खलास होगया' हें ऐकून श्री. साळवी यांना वाईट वाटलें. ते मुद्दाम घरीं गेलें व तेथून नवीनच विकत घेतलेली श्री साईसच्चरितची पोथी (आदल्याच दिवशी विकत घेतलेली) व उदी घेऊन परत श्री. दादलानी यांचे घरीं आले व त्यांना म्हणाले, 'साहेब सध्यां येथें कोणी नाहीं. या पोथीमधल्या महाराजांच्या छायाचित्राला नम्रभावानें नमस्कार करा; व ही मी उदी आणली आहे. ह्या उदीला राखाडी समजूं नका. याची किंमत लाखो रुपयांपेक्षां जास्त आहे. ही उदी पाण्यांत घालून प्या व अंगाला सगळीकडे लावा.' श्री. साळवी यांच्या सांगण्याप्रमाणें श्री. दादलानी यांनीं केलें व संध्याकाळीं ५ वाजतां श्री. साळवी यांना त्यांनीं सांगितलें कीं त्यांच्या प्रकृतींत थोडा बदल आहे. श्री. साळवींना तरी वाईट वाटलें. ते पुन्हां घरीं आले व त्यांनीं आपल्या पत्नीस कांहीं इलाज माहिती असल्यास सांगण्यास सांगितलें; तिनें सांगितलें कीं पळसफुलें उकळून पोटास बांधावयाचीं व त्यांनीच शेकावयाचें. श्री. साळवी यांनीं येऊन श्री. दादलानींना तो उपाय सांगितला. पण तो अगोदरच केला आहे असें समजलें. संध्याकाळीं ७ वाजतां पुन्हां श्री. साळवी साहेबांच्या घरीं गेले व काय आश्चर्य कीं श्री. दादलानी खडखडीत बरे झाल्याचें त्यांना दिसलें व जननेंद्रियांत अडकलेला खडा लघवीवाटे बाहेर पडला होता. श्री. साळवी यांना आनंद झाला व नेत्रावाटे अश्रु आले. ते म्हणाले, साहेब ही केवळ बाबांची कृपा आहे. श्री. दादलानी यांनीं श्री. साळवी यांना १ रुपया बक्षीस दिला. पण श्री साळवी त्यांना म्हणाले, साहेब, हा तुम्ही दिलेला रुपया मी शिर्डीला समाधीसमोर उदधूप जाळण्याकरितां पाठवून देणार आहे. तुम्ही एकदां बाबांच्या समाधीचें दर्शनास मात्र जरूर जाऊन या.' श्री. दादलानी यांनीं श्री. साळवी यांनी दिलेली उदीची पुडी जपून ठेविली आहे.

मला मात्र हा अनुभव ऐकल्यानंतर श्रीसाईसच्चरित अध्याय ३४ ओव्या १४० ते १४७ पर्यंतच्या ओव्यांची आठवण झाली, 'इद्यांनिजिक एका गांवांत । रहातसे एक वृद्ध गृहस्थ । मूत-खड्याच्या व्याधीनें ग्रस्त । जाहला त्रस्त अतिशय ॥१४०॥ हा रोग शस्त्रक्रियेविण । अन्यथा नाहीं याचें निवारण । म्हणून शस्त्रक्रिया प्रवीण । पहा तरी कोण जन वदती ॥१४१॥ रोगी परम चिंतातुर । कर्तव्यार्थी न सुचे विचार । मरणोन्मुख कृश शरीर । दुःख अनिवार सोसेना ॥ १४२ ॥ शस्त्रप्रयोगा लागे धैर्य । रोगिया अंतरीं नाहीं स्थैर्य । कुदैवें तयाचें नष्टचर्य । संपलें आश्चर्य ते परिसा ॥ १४३ ॥ येरीकडे हा ऐसा प्रकार । तोंच त्या ग्रामींचे इनामदार । साईबाबांचे भक्त थोर । आले गांवावर समजलें ॥ १४४ ॥ तयांपाशीं बाबांची विभूती । नित्य राही हे सर्व जाणती । रोगातीचे आतेष्ट येती । उदी प्रार्थिती तयाते ॥ १४५ ॥ इनामदारांनी उदी दिधली । मुलानें बापास पाण्यांत पाजिली । पांचहि मिनिटें लोटली । तोंच कीं वर्तली नवलपरी ॥ १४६ ॥ उदीप्रसाद अंगीं जो भिनला । मूतखडा ठायींचा ढळला । मूत्रद्वारें बाहेर निसटला । आराम पडला तात्काळ ॥ १४७ ॥

वरील अनुभवावरून बाबांचा भक्तांच्या संकटकाळीं धांवून जाण्याचा कनवाळूपणा दिसून येईल व अशी खात्री पटेल कीं बाबांना आर्तपणानें मारलेली हांक कधींहि वायां जात नाहीं.

× × ×

## माझ्या गुरूनें मला मंत्र दिला नाहीं—

बाबांच्या काळची ही एक जुनी आठवण आहे.

संगमनेरच्या राहणाऱ्या एक राधाबाई देशमुख बाबांचें नांव ऐकून त्यांचें दर्शना-करितां कांहीं लोकांबरोबर शिरडीस आल्या. बाबांचें दर्शन घेतल्यावर त्यांचे मनास फार समाधान झालें व त्या बाईनें बाबांना आपले गुरु करण्याचे मनांत ठरविलें. जोंपर्यंत बाबा आपल्याला गुरुमंत्र देत नाहींत, तोंपर्यंत तिनें उपवास करण्याचें ठरविलें. तीन दिवस झाले, तिनें अन्नपाणी कांहीं घेतलें नाहीं. हें त्या बाईचें व्रत पाहून माधवराव देशपांडे बाबांकडे गेले व म्हणाले—

'देवा, हें काय आपण चालविले आहे? आपण हजारो लोकांना आपल्याकडे ओढून आणतां. त्या बाईनें मरणांतिक उपोषण करण्याचें ठरविलें आहे. जर त्या बाईचें कांहीं वाईट झालें तर लोक आपणांस दोष देतील म्हणून तिच्यावर कांहींतरी दया दाखवा व तिला मार्ग दाखवा.'

तिचा निश्चय ऐकून बाबांनीं तिला बोलावणें पाठविलें व थोडा उपदेश केला—

"हे माते ! अशा तऱ्हेनें तूं वागून आपल्या जिवास त्रास करून मरण ओढवून कां घेतेस ? तूं माझी आई आहेस, मी तुझा मुलगा आहें. माझ्यावर दया कर व माझें नीट ऐक म्हणजे तुझा फायदा होईल. माझा एक गुरु होता. तो फार दयाळू होता. मी त्याची सेवा पुष्कळ दिवस केली पण त्यानें मला मंत्र दिला नाहीं. मी अगदीं

मनापासून त्याची सेवा करीत होतों. एकदां त्यानें माझें मुंडन केलें व माझे जवळ दोन पैसे दक्षिणा मागितली. मी त्यांना ती ताबडतोब दिली. तुम्ही विचाराल कीं तुमचा गुरू पूर्णत्वाला पोंचला होता तर त्याला दक्षिणा काय करावयाची होती ? तर त्याला माझें असें सांगणें आहे कीं, त्यांना त्या पैशाची मुळींच गरज नव्हती तर त्या दोन पैशांचा अर्थ असा होता कीं मजपासून त्यांना दृढ विश्वास व दुसरा सबुरी हे दोन गुण पाहिजे होते. मी हे दोन्हीही त्यांना दिले व ते फार खुष झाले. मी बारा वर्षे माझ्या गुरूजवळ होतों. त्यांनीं मला अतिशय प्रेमळपणानें वागविलें. त्याचें वर्णन मला करता येत नाहीं. ते एक दयेचा पुतळा होते. त्यांच्याशिवाय मला चैन नसे व कांहींही गोड लागत नसे. माझेजवळ त्यांचे शिवाय दुसरा विषय नव्हता. नेहमीं मी त्यांचाच विचार करी. ही एक दक्षिणा होती व सबुरी ही दुसरी दक्षिणा होती. मी माझा सर्व भार त्यांचेवर टाकून शांत रीतीनें वाट पहात होतों. निष्ठा व सबुरी ह्या दोन सख्या बहिणी आहेत. माझ्या गुरुनीं दुसरी कसलीच अपेक्षा मजपासून केली नाहीं. ते कधीं मला विसरले नाहींत. कासवाच्या पिलाप्रमाणें ते माझेकडे अतिशय मामतेनें पहात असत. हे आई, माझ्या गुरूनें मला कधींही मंत्र दिला नाहीं किंवा सांगितला नाहीं, तर मी तुला कोठून सांगूं ? एवढेंच लक्षांत ठेव कीं गुरूची कृपादृष्टि हेंच मोक्षाचें साधन आहे. कोणापासूनहीं मंत्र किंवा उपदेश घेण्याच्या भानगडींत पडूं नकोस. सर्व विचारांचा व कृतीचा मीच तुझा उद्देश आहे असें दृढ समज, म्हणजे खात्रीनें तुला मुक्ति मिळेल. गुरूवर पूर्ण विश्वास ठेव. जो अशा रीतीनें गुरुवर विश्वास ठेविल तोच खरा धन्य आहे. '

ह्या उपदेशानें त्या बाईची पूर्ण खात्री झाली व बाबांना नमस्कार करून तिनें आपला उपवासाचा हट्ट सोडून दिला.

× × ×

**बाबांनींच रक्षण केलें**

श्री. दत्तात्रय गोविंद भाटकर, ९ बी, धोत्रे चाळ, केळेवाडी, मुंबई ४ हे आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितातः—

श्री सद्गुरु बाबा सगुण साकार रुपांत असतांना त्यांनीं आपल्या भक्तासाठीं केळोवेळीं चमत्कार केले; आणि आतां ते निर्गुण निराकार स्वरूपांत असले तरी—

**नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥**

या त्यांच्याच वचनाप्रमाणें ते आजहि आपल्या भक्तासाठीं चमत्कार करतात, संकटकाळीं धांवून येतात.

आमच्या बाबतींत गेल्या दहाबारा वर्षांत असे कितीतरी लहानमोठे चमत्कार घडून आलेले आहेत. परंतु नुकताच आलेला एक अनुभव विशेष उल्लेखनीय आहे म्हणून भक्त बांधवांच्या माहितीसाठीं येथें देत आहे.

आम्ही रहात असलेली चाळ अत्यंत जुनी आहे. प्रत्येक वर्षी पावसाळ्यांत ती पडणार असें वाटतें. आम्ही मानवीप्रयत्न खूप केले. -म्युनिसिपालिटींत अर्ज केले.

मालकांना अर्ज विनंत्या करून झाल्या. चाळ कमिटी स्थापून सामुदाईक प्रयत्नही झाले. पण त्याचा कोणावरही परिणाम झाला नाहीं. सध्यांच्या ह्या बिकट परिस्थितींत जाणार कुठें? म्हणून श्री बाबांवर भरवंसा ठेवून तिथेंच राहिलों आहोंत; परंतु परवांच्या जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यांतील भयंकर पर्जन्यवृष्टींत आमच्या चाळींतील आमच्याच खोलींतील मोरी-खालचा भाग कोसळूं लागला. खालच्या खोलींतील माणसं घाबरून वरती आम्हांला सांगायला आलीं. आम्ही खालीं जाऊन पाहिलें तों मोरीखालचे वासे मोडलेले व इतर सर्व वासे भिंतीपासून सुटलेले. धांवपळ सुरू झाली. मालकांना सांगितलें. ते म्हणाले, 'खोली खाली करून चला. म्युनिसिपालिटींत जाऊन तक्रार नोंदविली. तेव्हां ते म्हणाले, 'कीं ही चाळ रिपेरिंग करण्याची सक्ती मालकांवर करावयाची नाहीं अशी वरून ऑर्डर आहे.' झालं आतां कोणाला सांगायचं? आमची मुंबईतील नातेवाईक माणसें एक एक येऊन पाहून गेलीं. 'इथं राहणं धोक्याचं आहे.' असा प्रेमळ उपदेश आम्हाला सर्वांनी केला. पण आम्ही आयत्यावेळीं जावं कुठें हें कोणालाच सांगतां येण्यासारखं नव्हतं. शेवटी आम्हीं बाबानांच प्रार्थना केली. आमची श्रद्धा होती कीं, माणसांनीं आम्हाला जवळ केलं नाहीं तरी बाबा कांहीं आम्हाला दूर करावयाचे नाहींत. त्या चार दिवसांत पावसाने विश्रांति म्हणून घेतली नव्हती. दिवस कसातरी जायचा. रात्र आली कीं छातींत धडकी भरायची. बाहेर पाऊस तर नामजपाच्या अखंड गजरासारखा घुमत होता. आणि आम्ही सबंध रात्र बाबांच्या नांवाचा जप करीत कॉटवर बसून होतों. दोन दिवस आणि दोन रात्री गेल्या. तिसऱ्या दिवशीं सकाळींच म्युनिसिपालिटीचे दोन इन्स्पेक्टर सोबत एक कॉन्ट्रॅक्टर व दोन सुतार बरोबर घेऊन आले. त्यांनी त्या सुतारांना आमचे खोलींत इथें सपोर्ट द्या व खालच्या खोलींत सांगितल्याप्रमाणें मजबूत काम करा. अशा सूचना दिल्या व ते निघून गेले. दुपारनंतर दुरुस्तीचें सामानही आलें व संध्याकाळपर्यंत सर्व दुरुस्ती पूर्ण झाली. त्या रात्रीं आम्हीं सर्व श्री. बाबांना अश्रुपूर्ण नेत्रांनीं नमस्कार करून शांतपणें झोपलों.

हें सर्व झालें खरें, पण हें झालें कसें हें सर्वांनाच कोडें पडलें. या प्रकारानें सर्वच माणसं आश्चर्यचकित् होऊन गेली आहेत. मालक ( समोरच रहातात ) म्हणतात, आम्हीं रिपेरींग केलं नाहीं. आम्हीं म्हणतों आम्हीं केलं नाहीं. कोणालाही सांगितलं तरी आतांपर्यंतच्या अनुभवाप्रमाणें म्युनिसिपालिटी स्वखर्चानें अशीं कामें करते यावर कोणाचाच विश्वास बसत नाहीं. आतां या गोष्टीला इतके दिवस झाले. आतां नुसते तर्क वितर्कच चालले आहेत. कोणी म्हणतात, म्युनिसिपालिटीनेंच केलें असेल. पण ती मालकाकडून सर्व खर्च वसूल करून घेईल. कोणी कांहीं म्हणतात. कोणी कांहीं सांगतात. आम्हीं मात्र मानतों कीं तें कसंही होवो, कोणीही करो व कोणीही खर्च सोसो. ही सर्व त्या श्रद्धावान् भक्तांच्या हांकेला धांवून जाणाऱ्या जगन्नियंत्या प्रभु बाबांची किमया !

---

# कार्यकुशलता हाच योग

कोणतेंही कार्य एकाग्र चित्तानें व मन लावून करावयाचें याचें नांव योग. एखादा रंगारी घराचें रंगकाम करीत असतो. कुठेंही रंगाचे शितोडे न उडविता अत्यंत सफाईनें जो रंगकाम करतो ,त्याला आपण कुशल रंगारी म्हणतों.

आम्हीं एखादें काम करतों म्हणजे काय कोण करतें ? आमचीं इंद्रियें, आमची बुद्धि व त्यांना प्रेरणा देणारें मन हीं सारीं कामास लागतात. त्यांची एकतानता होते. केवळ इंद्रियें आपण होऊन कांहीं करूं शकत नाहींत. मन सावचित, शांत पाहिजे. कोणतेंही कार्य यशस्वी रीतीनें पार पडण्यासाठीं तें सावधानतेनें करावें लागतें; त्यासाठीं मन शांत असणें जरूर असतें. मन स्थिर नसलें तर हातांतील कार्य बिघडलें म्हणून समजावें.

तेव्हां कोणत्याही कार्याचा कर्ता करविता म्हणजे आपलें मन. त्या मनाची एकाग्रता मनाचा योग साधल्याशिवाय सारें व्यर्थ आहे. एखादा लोहार किंवा सुतार काय करतो तेव्हां त्याच्या हातांत काम करण्याचें कांहीं ना कांहीं हत्यार असतें. तीं हत्यारें जड व निर्माल्यवत् असतात. त्यांना प्रेरणा दुसरीकडून मिळते. तसेंच आहे आपल्या शरीराचें. शरिराला प्रेरणा मिळते ती मनापासून.

मनाची स्वाभाविक प्रवृत्ति शांततेकडे असते. मनाची शांति ही साधीसुधी गोष्ट नाहीं. मनासारखें धांवपळ करणारें व उच्छृंखल दुसरें कांहीं नाहीं. शांतता ही मोठी संपदा आहे.

कोणतेंहि कार्य करीत असतां मन शांत रहावें व कार्य पूर्ण झाल्यानंतरहि मनाची शांति ढळूं नये. ही सावधानता म्हणजेच कोणतेंहि कार्य कुशलतेनें पार पाडणें.

येनकेन प्रकारेण खूप काम करावयाचें, खूप पैसा मिळवावयाचा व अलोट सुख व ऐश्वर्य भोगावयाचें हा आजकालचा जमाना आहे; परंतु हें अलोट सुख व ऐश्वर्य भोगल्यानें मनाला शांततेचा लाभ होत असतो कां ? उलटपक्षीं, मन अधिकाधिक अशांततेच्याच तावडींत सांपडत असतें नाहीं कां ? मग काय बरें त्या सुखोपभोगाचा उपयोग ? मनाची शांतता भंग करणारे सुखोपभोग काय कामाचे ? कोण याचा विचार करीत आहे ?

मनाची शांतता संभाळतां येणें म्हणजेच कार्य करीत असतां योग साधणें. कोणतेंही कार्य करीत असतां मन, शरीर व सारीं इंद्रियें शांत राहिलीं पाहिजेत. त्यांची समतोलता संभाळतां आली पाहिजे.

कोणतेंही कार्य करीत असतां त्यांतूनच आराम व समाधान मिळवितां आलें पाहिजे. महात्मा गांधी सतत कार्यरत असत व त्यांतूनच आराम मिळवीत असत. कारण त्यांनीं स्वतःच्या मनाला तशी संवय लावून घेतली होती. आजकाल आपलें कार्य व आराम यांची आपणांस सांगड घालतां -येईनाशी झाली आहे. हीं दोन्हीं एकमेकांपासून वेगळीं झालीं आहेत. आराम घेण्यासाठीं आपणांस वेगळी योजना करण्याची जरूरी भासतां कामा नये.

हातांतील कार्य, आराम व मनाची शांति हीं एकमेकांपासून भिन्न होतां कामा नयेत. तीं एकमेकांशीं संलग्न होऊन राहिलीं पाहिजेत. आणि हें केव्हां साध्य होतें ? तें कार्य आपण मनोभावें आनंदानें व सर्वस्व पणास लावून करूं तेव्हांच. योगः कर्मसु कौशलम्' या सुवाक्याचें मर्म हे असें आहे. तें आपण ओळखायला शिकलें पाहिजे.

ऐन तारुण्यांत शक्य तेवढे परिश्रम करून उत्तर वयांत मी शांतिसुखाचा अनुभव घेईन, उत्तर वयांत खूप खपून वृद्धापकाळांत शांतिसुख मिळवीन; त्याचप्रमाणें दिवसभर खप खप खपून मी रात्रींच्या वेळीं शांतिसुख अनुभवीन किंवा वर्षांतील आठ महिने कामधाम करून उरलेल्या चार महिन्यांत आराम सुख घेईन, अशा रीतीनें वायदे करीत बसणाऱ्यांच्या वाट्यास आराम व शांति कधींच येत नाहीं. तें सौख्य त्यांच्यापासून दूर दूर पळत जात असतें.

यासाठीं कोणतेंही कार्य करीत असतां मनाचा समतोलपणा साधायला शिकलें पाहिजे. त्या कार्यांत आनंद समाधान व सुख हीं तिन्हीं मिळविण्यासाठीं झटलें पाहिजे. जुलमाच्या रामरामाला कोणतेंही काम करण्याची आपणास संवय जडली आहे. ती मनाची अस्थीरता वाढविते, मनाची ओढाताण करते; मग कसली आली आहे शांति !

कार्य करीत असतां मन आनंदानें फुललें पाहिजे. पुढें काय होईल, यश मिळेल कीं नाहीं. कोण ठपका देईल कीं काय, आपल्या हातून काम पार पडेल कीं नाहीं, अशा प्रकारच्या, नाना चिंता कार्यनाशास व मनाची शांतता नाहींशी करण्यास कारणीभूत होत असतात. सारा भरिभार भगवंतावर टाकून आत्मविश्वासपूर्वक कामास लागलें म्हणजे काय काय चमत्कार घडून येतात तें पहा !

---

## देणगीचा साभार स्वीकार

गं. भा. सिताबाई सिताराम प्रधान ता. ११–५–१९५९ रोजीं अंधेरी येथें सौ. बिमलाबाई जगन्नाथ राजे ह्यांच्या निवासस्थानीं निवर्तल्या. श्री. पी. पी. ताम्हाणे, वकील, दादर यांच्या तर्फे कै. सिताबाई यांच्या तीन मुलीनी पूज्य आईच्या स्मरणार्थ रु. २०१ शिरडी येथें देणगी दिली. मुलींचीं नावें १ सुशीलाबाई एस. बेंद्रे ( यवतमाळ ) २ सौ. विमलाबाई जगन्नाथ राजे ( अंधेरी ) व ३ श्रीमती राधाबाई श्रीधर गडकरी ( विलेंपार्लें )

# रमण महर्षींचा प्रसाद

देवाचें स्वरूप कसें आहे व या जगाचे व्यवहार कसे चालले आहेत ! याचा विचार करण्याच्या भानगडींत पडण्यापेक्षां प्रथम स्वतःला ओळखायला शिका. तुम्हीं कोण आहांत हें समजून घ्या असें श्रीरमण महर्षि आपल्या एका भक्ताला सांगत होते. तेव्हां तो भक्त म्हणाला, 'स्वत्त्वाची ओळख पटल्यानें देवाची ओळख पटली असें म्हणतां येईल का ?'

यावर रमण महर्षि म्हणाले, 'होय; देव तुमच्या अंतःकरणांतच आहे. त्याची ओळख पटवून घेणें हीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे.

**शिष्य :** मग मला स्वतःची किंवा देवाची ओळख कां पटूं शकत नाहीं ? त्या पटण्या आड कोणत्या अडचणी येतात ?

**रमण महर्षि :** तुमचें अस्थिर व इकडे तिकडे भटकणारें मन; आणि तुमचे गैरविश्वासाचे मार्ग !

**शिष्य :** मी एक दुबळा प्राणी आहें. परंतु माझ्याठायीं वास करणाऱ्या सर्व श्रेष्ठ अशा दैवी सामर्थ्यानें माझ्या मार्गांतील अडचणी कां बरें दूर करूं नयेत ?

**महर्षि :** होय खरें आहे. आणि तुमची इच्छा तशी बलवत्तर असली व संपूर्ण श्रद्धा असली तर ते अडथळे चित्शक्तीनें दूर केले जातीलही; परंतु तुमची तशी बलवत्तर आकांक्षा असली पाहिजे.

**शिष्य :** माझ्यासाठीं ती दैवी शक्ति तशी बलवत्तर आकांक्षा कां निर्माण करीत नाहीं ?

**महर्षि :** तें कार्य उगाच घडूं शकत नाहीं. त्यासाठीं संपूर्ण शरणागतीची जरुरी असते.

**शिष्य :** समजा कीं मी शरणांगतीचा मार्ग स्वीकारला तर देवाची आणखी करुणा भाकण्याची किंवा प्रार्थना करण्याची जरुरी आहे का ?

**महर्षि :** संपूर्ण शरणांगति हीच मुळीं महान् प्रार्थना आहे.

**शिष्य :** परंतु शरणांगतीचा मार्ग स्वीकारण्यापूर्वी देवाचें स्वरूप, त्याची आवडनिवड वगैरे समजून घेणें जरूर नाहीं का ?

**महर्षि :** देवानें आपल्यासाठीं जें कांहीं करावें असें वाटतें तें तो जरूर करील अशी जर तुमची सबळ श्रद्धा असेल तरच तुम्हीं शरणांगतीचा मार्ग स्वीकारा. नाहींपेक्षां त्या देवाच्या वाटयाला जाऊंच नका. स्वतःला ओळखण्याच्या प्रयत्नास लागा.

**शिष्य :**— देवाला किंवा गुरूला माझी दया येईल का ? त्याला माझी पर्वा करावी असें वाटेल का ?

**महर्षि :**— ते दोघे भिन्न नाहींत; ते एकच आहेत. त्यांपैकीं एखाद्याचा श्रद्धा-पूर्वक शोध करण्याच्या मार्गे तुम्हीं लागलां व तशी तुमची श्रद्धा असेल तर एका गोष्टीची पक्की खूणगांठ बांधून ठेवा कीं, तुम्हांला कल्पना करतां येणार नाहीं एवढ्या दयेमायेनें ते तुमच्या शोधांत रहातील व तुमच्या सन्निध येतील. जेथें श्रद्धा आहे, जेथें तळमळ आहे, तेथें देव किंवा गुरु आपोआप आकर्षिला जातो. पूर्ण श्रद्धा हीच त्यांना आपल्या-जवळ आणण्याची अट आहे.

**शिष्य :**— परमात्मा ज्याची निवड करतो त्यालाच आत्म्याची ओळख पटते, अर्थात् आत्मसाक्षात्कार होतो, असें उपनिषदें सांगतात. परमात्म्यानें निवड कां करावी व तीहि कांहीं ठराविक माणसांची निवड कां व्हावी ?

**महर्षि :**— असें पहा कीं, सूर्य नारायणाचा उदय होतो त्यावेळीं साऱ्या कळ्या उमलत नाहींत, कांहीं उमलतात व बाकीच्या तशाच रहातात ! म्हणून आपण त्याबद्दल सूर्य नारायणाला कधीं दोष देतों का ? त्याप्रमाणें कोणत्याही कळ्या त्याच्या प्रकाशाशिवाय उमलत नाहींत हेंही सत्य आहे

---

## आमची आर्य संस्कृति—

कोणासही पीडा न देणें, सत्य भाषण करणें, कशाचाही अपहार न करणें, शारीरिक व मानसिक पावित्र्य सदैव राखणें, मनोजय करून इंद्रिय दमन करणें, दुष्ट प्रवृत्तींचें दमन करणें, सदैव शांत रहाणें, कोणत्याही परिस्थितींत मनाचा क्षोभ होऊं न देणें, हाच सर्व मानवजातीचा धर्म आहे. आमच्या आर्यसंस्कृतीनें आम्हांला हेंच शिकविलें आहे.

शंभर वर्षें जगण्याचा नियम करावा. क्षणभंगुर संसार आहे असें न मानतां आपण शंभर वर्षें जगून राष्ट्रहिताचीं कार्यें करीत राहूं, असा विचार प्रत्येकानें मनांत धरावा. राष्ट्रासाठीं माझ्या जीवनाचा हा महायज्ञ व्हावा असें मनांत धरून त्या राष्ट्रकार्यासाठीं आपलें जीवन अर्पावें. —इशोपनिषद

ARSA PRODUCTS

# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# जाउं जाऊंया शिरडी उत्सवा

राग–ललत  ताल–त्रिताल

जाउं जाऊंया शिरडि उत्सवा ।
राम नवमिच्या रघुकुलोद्भवा ॥ ध्रु ॥

ह्रिरालालजी नगरचे मुथा । घालुनि नानाविध सुमंडपा ॥
विद्यूतदीपा चक्रांनीं वा । कुलकर्णीते[१] झटिति निशि दिवा ॥१॥
मधुकर–कुंदा जोशी, भाऊ । शेळ्ये पति पत्नी प्रभु[२] घेऊं ॥
नाम[३] कीर्तना चरित[४] वाचना । मीना गाई, शिरडि–माधवा ॥२॥
शास्त्री[५] रामायण पारायण । करिती[६] सन्निध समाधि बैसुन ॥
दासगणूंचे [७]छगन लाडके । अनंत[८] देती कीर्तन मेवा ॥३॥
समधि मूर्तिं स्नाना घाई । अण्णासुत[९] चिटणीसा होई ॥
अभिषेका श्रीपाद[१०] जाधवा[११] । थोरातांना[१२] जलदि बोलवा॥ ४॥
होमगार्ड ते पोलिस येती । स्वयंसेवका सहाय्य घेती ॥
विनामूल्य ते भोजन मिळण्या । विनंती करिती [१३]नागेशरावा ॥५॥
सुधा वेलकर होई आपटे[१४] । पारायण करितांश्रू दाटे ॥
बाळा[१५] नागापुरे[१६] मनिं भीती । हिशेब द्याया गणपतरावा[१७] ॥६॥
धुर्त भक्त ते अडविती जागा । खोलि सोडण्या करिती त्रागा ॥
देव[१८] रासने[१९] मधुकर[२०] बाळा[२१] । घेति घाटुनि रात्रि विसावां॥१७॥
आरति अपुली करी दिगंबर[२२] । विठ्ठल[२३] कीर्तन गायन सुस्वर ॥
तबला पेटी श्रिपाद विठ्ठल । भक्त मंदिरी घेति[२४] पारवा[२५] ॥८॥

— बाबांच्या बाळाचें बाळ

---

टीप :—१ पॉवर हौसचे कुलकर्णी, २ पुण्याचे, ३ व्यवस्थापक, ४ मुंबईकडील, ५ कु. मोने, ६ श्री दासगणूंचे शिष्य, ७ पेटी वादनकार, ८ श्री दासगणूंचे पट्ट शिष्य डॉ. आठवले, ९ डॉ. दाभोलकर, १० बाबांचे बाळाचे बाळ, ११ – १२ व्यवस्थापक विश्वस्त, १३ व्यवस्थापक विश्वस्त, १४ संस्थान हिशेबनीस, १५ बाळा गुरव कॅशियर, १६ हिशेबनीस शिरडी येथील, १७ श्री चेंबुरकर इन्टरनल ऑडीटर, १८–१९ विश्वस्त, २० श्री जोशी, २१ बाळा गुरव, २२ मुख्य पुजारी, २३ संस्थान गवई श्री.मराठे, २४ बंडु कुलकर्णी, २५ श्री. मांजरेकर.




## ऑगस्ट—१९६०

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्त श्रींचे दर्शनासाठीं कमी प्रमाणांत आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली, ती खालील प्रमाणें :—

**कीर्तन :**— ह. भ. प. दौलत महाराज मु. अंत्री. ता. मलापूर जि. बुलढाणा, श्री. अहिल्याबाई होळकर पुण्यतिथीनिमित्त व एकादशी निमित्त सं. गवई मराठे यांचें कीर्तन झालें.

**प्रवचन :**— ह. भ. प. श्रीगिरी सोलापूरकर यांचें श्री ज्ञानेश्वरीवर प्रवचन झालें. श्री. ह. भ. प. शंकर महाराज कोल्हापूर यांचें हठयोग विषयावर प्रवचन झालें.

**गायन व भजन :**—सौ. कृष्णाबाई गणपतराव हेबळे. मु. अहमदाबाद, श्री. सावित्रीबाई लाखे, जेजुरी. श्री. गेनुबा श्री. दत्तोबा गुरव जळगांव. श्री. महादेव एस. काजरोळकर, मुंबई श्री. पंडितराव नगरकर पुणें. श्री. श्रीकृष्ण अनंत साठे पुणें. श्री. मनोहर केसकर पुणें. श्री. अनंत विष्णू कुलकर्णी पुणें. श्री. पांडुरंग विष्णू साबडे. पुणें.

**श्रीगोकुळअष्टमीः**—( श्रीकृष्णजन्म कीर्तन ) श्रीरथाची गांवांतून मिरवणूक व गोपाळकालादि, हंडी वगैरे कार्यक्रम श्रीमंदिरांत सालाबादप्रमाणें झाले.

**१५ ऑगस्ट स्वराज्य दिन :**—स्वराज्य दिनानिमित्त श्रीमंदिरावरील कळसावर सर्व संस्थान नोकर सेवेकरी, शाळेंतील मुलें, गुरुजीसह, संस्थान व्यवस्थापक अधिकारी यांचे हस्तें ( ध्वजवंदन प्रार्थना ) रात्रौ दिव्यांची रोषनाई ( गायन, कीर्तन, प्रवचन ) शाळेंतील मुलांचे नाट्यप्रयोग, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्यक्रम वगैरे झाले.